स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ । अंक ६ वा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १६ ते ३० नोव्हेंबर २०२२

पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
www.peoplespost.in

# द पीपल्स पोस्ट



# इतिहास कूस बदलतोच...

**इतिहास कूस बदलत असतो आणि तसे केल्याशिवाय त्याला वर्तमानात, भविष्यात पाऊल टाकता येत नाही. त्यांच्याकडे सामर्थ्य असते तेच कूस बदलतात, हेही तितकेच खरे आहे. इथे काँग्रेसच्या इतिहासाने आणि खरगे यांच्या कारकीर्दीनेही कूस बदलली आहे, ती एक नवे वर्तमान घडवण्यासाठी. खरगे यांच्या पक्षनिष्ठेबद्दल आणि त्यांच्या कर्तृत्वाबद्दल कोणीही शंका घेऊ शकत नाही. सारे आयुष्य पक्ष आणि समाजाची सेवा करण्यात त्यांनी खर्च केले आहे. मतदारसंघात आणि संसदीय राजकारणात त्यांनी आपल्या कर्तृत्वाचे डोंगर उभे केले आहेत.**



## संपादकीय

भारताचा ब्रिटिशकालीन इतिहास आणि त्यानंतरचा बराच कालखंड काँग्रेसशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. काँग्रेस स्थापन झाली ती एक सांस्कृतिक संवाद साधणारी संघटना म्हणून. अलॅन ह्यूम तिचे संस्थापक आणि सदस्य होते बहात्तर. ह्यूम हे निवृत्त ब्रिटिश होते. म्हणजे आजच्या आयएएस श्रेणीतल्या अधिकाऱ्यासारखे. १८५७ च्या बंडानंतरची ही घटना होती. भारतातील शिकल्या-सवरल्या व्यक्तींमध्ये नागरी आणि राजकीय संवाद साधण्यासाठीचे एक व्यासपीठ म्हणजे काँग्रेस होती. २८ डिसेंबर १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (इंडियन नॅशनल काँग्रेस 'आयएनसी') स्थापन झाली. मुंबईतल्या गोकुळदासमध्ये स्थापन झालेल्या काँग्रेसचे पहिले अध्यक्ष होते बॅनर्जी. पहिल्या दोन दशकांत काँग्रेसने नागरी हक्क, प्रशासन, अर्थकारण, घटनात्मक बाबी, परराष्ट्र नीती, अशा महत्त्वाच्या विषयांवर चर्चा सुरू केल्या आणि भारतीय राष्ट्रवादाचे बीजारोपण केले. एक जहाल पिढी काँग्रेसच्या नेतृत्वात जशी तयार झाली होती, तशी गोखले, मेहता यांच्या रूपाने एक उदारमतवादी किंवा मवाळ पिढीही होती. गोखलेंनी उघडपणे लोकमान्य टिळकांच्या जहाल भूमिकेला विरोध केला होता. याचदरम्यान प्रथम राजकीय सुधारणा की सामाजिक सुधारणा, यावरही वाद सुरू झाला. यात टिळक राजकीय सुधारणांच्या बाजूने होते. .../पान ३ वर

पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५ ।
अंक ६ । मूल्य : रु. ४० । दिनांक : १६ ते ३० नोव्हेंबर २०२२

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्


**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com


(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकूर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.


**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट
8888541822

- **जाहिरात विभाग संपर्क**
  ९८२११४४५४०९ / ८८०५१५१४५२

अंकाची वार्षिक वर्गणी ८००/– रुपये फक्त

- **द पीपल्स पोस्ट बँक अकाऊंट डिटेल्स्**

द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

**ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे**

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा


**संपादकीय** : इतिहास कूस बदलतोच – १ / मल्लिकार्जुन खरगे व काँग्रेससमोरील आव्हाने – **अनंत बागाईतकर** – ६ / **हवा दिल्लीची** : चीनचे 'जननेते' शी जिनपिंग – **विजय नाईक** – १० / **रेषा आणि फटकारे** : छोटा बच्चा जान के न कोई आंख दिखाना रे – **संजय पवार** १५ / केजरीवालांचा भूलभुलैया – **बी.व्ही. जोंधळे** –१८ / डॉ. रावसाहेब कसबे यांचे दुबईतील भाषण – **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विश्वव्यापी तत्त्वज्ञान** – २० / उत्तम कांबळे यांचे दुबईतील भाषण – **भगवान बुद्धाचे पहिले प्रवचन : एका समग्र परिवर्तनाचा प्रारंभ** – २८ / **ग्रंथ परिचय** : ।। एक अभिजात आत्मकथन ।। **इंद्रजित भालेराव** – ३४ / **आज–कालचे प्रश्न** : आप नावाच्या टोळीचा हिंदुत्ववादी चेहरा । तासाला तीन बलात्कार, किती ऐकायचे चीत्कार... – **पंक्चरवाला** – ३६ / **कविता** : कोण वाघ, कोण शेळी – **श्रीपाद भालचंद्र जोशी** । मास्तर! – **हेमंत दिनकर सावळे** ३९

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए–४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

पुण्यातल्या काँग्रेस अधिवेशनात त्यांनी सामाजिक विषयांवर चर्चा करण्यास विरोध केला. विठ्ठल रामजी शिंदे यांचा त्याबाबतचा बेत हाणून पाडला.



प्रारंभी, काँग्रेसचे अध्यक्षपद फक्त एका वर्षासाठी होते; पण अपवाद म्हणून काहींना ते दोन वेळाही मिळाले होते. अनेकदा परकीय वाटावेत असे लोकही अध्यक्षपदावर आले, जे स्थापनेच्या वेळीही होते. बॅनर्जी, नौरोजी, तयबजी, फिरोज मेहता, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, सयानी, गोखले, मालवीय, वेडरबर्न, ॲनी बेझंट, असा प्रवास करत नेहरू घराण्यात पहिल्यांदा अध्यक्षपद आले ते १९१९ मध्ये. म्हणजे काँग्रेसच्या स्थापनेनंतर चौतीस वर्षांनी. त्यानंतर १९२४ ला महात्मा गांधी अध्यक्ष झाले, ते फक्त एकाच वर्षासाठी. पुढे मी काँग्रेसचा एक पैशाचा सदस्य नाही, असे ते म्हणत. कोलकात्याच्या अधिवेशनात म्हणजे १९२८ ला पुन्हा एकदा मोतीलाल नेहरू अध्यक्ष झाले आणि त्यानंतर त्यांचे पुत्र जवाहरलाल नेहरू १९२९ व १९३० ला अध्यक्ष झाले. त्यानंतर वल्लभभाई पटेलही अध्यक्ष झाले. स्वातंत्र्याची चळवळ महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भरात आली होती आणि तत्पूर्वीच नेहरू-गांधींनी काँग्रेसमध्ये आपले स्थान भरभक्कम केले होते. ते लोकप्रियतेच्या शिखरावर होते. १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा जे.बी. कृपलानी अध्यक्ष होते, तर १९५३ मध्ये नेहरू यांनी पंतप्रधानपदाबरोबरच काँग्रेसचे अध्यक्षपदही स्वीकारले. १९५३ ते ५४ आणि १९५५ ते ५६ ते अध्यक्ष होते. १९५९ ला इंदिरा गांधी यांच्या रूपाने तिसरी पिढी अध्यक्षपदावर आली. फिरोज गांधी यांच्याशी विवाह झाल्याने त्या नेहरूंच्या गांधी बनल्या आणि गांधी घराण्याची कारकीर्द सुरू झाली. इंदिरा गांधी १९७८ ते ८३ अध्यक्ष होत्या. त्यांच्या हत्येनंतर त्यांचे पुत्र राजीव गांधी १९८५ ते १९९१ पर्यंत अध्यक्ष होते. त्यांच्या हत्येनंतर म्हणजे नरसिंहराव व केसरी यांच्यानंतर सोनिया गांधी अध्यक्ष झाल्या. पंतप्रधानपद स्वतःकडे त्यांनी ठेवले नाही; पण १९९८ ते २०१७ आणि २०१९ ते २०२२ अशी त्यांची सर्वांत दीर्घ कारकीर्द झाली. मध्ये त्यांचे पुत्र राहुल गांधी यांची कारकीर्द २०१७ ते २०१९ अशी झाली. काँग्रेसचा इतिहास १३७ वर्षांचा आणि नेहरू-गांधी घराण्याची कारकीर्द पन्नास वर्षांचीही दिसत नाही, तरीही काँग्रेसचे विरोधक काँग्रेसवर घराणेशाहीचा अरोप करतात. काँग्रेसला एकूण ६१ अध्यक्ष लाभले. त्यापैकी गांधी-नेहरू घराण्यातील पाच होते. अर्थात, १३७ वर्षे काँग्रेसचे सदैव बरेच चालले होते, असेही समजण्याचे काही कारण नाही. भारताच्या राजकीय इतिहासात सर्वांत जास्त तुकडे पडले ते काँग्रेसचेच. प्रत्येक तुकड्याने आपापल्या नेत्याच्या नावाने काही काळ हा तुकडा चालता-बोलता ठेवला. काही तुकडे काँग्रेसमध्ये पुन्हा विलीन झाले. काही पुन्हा बाहेर पडले. पहिली फूट १९०७ मध्ये सुरत अधिवेशनात पडली. त्यानंतर ८७ वेळा फूट पडली. १३७ वर्षांत ८७ वेळा फूट म्हणजे प्रत्येक दोन-अडीच वर्षांना एक फूट, असा प्रवास होता आणि जो आजही चालू आहे. समाजवादी, साम्यवादी, हिंदुत्ववादी, प्रादेशिक, असे अनेक घटक बाहेर पडले. त्यांनी स्वतःच्या चुली सुरू केल्या. विशेष म्हणजे केवळ काँग्रेस नव्हे, तर अनेक प्रादेशिक पक्षांत घराणेशाही चालू आहे. तामिळनाडूत एडीएमके आणि डीएमके, आंध्रात तेलुगू देसम, ईशान्य भारतात असेच काही पक्ष, काश्मीरमध्ये अब्दुला अजून किती तरी नावे सांगता येतील, की जेथे अजूनही घराणेशाहीच आहे. पूर्वीच्या अनेक संस्थानिकांमध्येही घराणेशाही आहे आणि अनेक नेत्यांच्या कुटुंबांतही घराणेशाहीच आहे. हे सर्व सोडून नरेंद्र मोदींनीही काँग्रेसमधील घराणेशाहीला लक्ष्य केले. आपल्या पक्षात गेल्या साठ वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या घराणेशाहीकडेही दुर्लक्ष केले आणि काँग्रेसमुक्त भारत तयार करण्याचा म्हणजे विरोधी पक्षमुक्त भारत बनवण्याचा विडा उचलला आणि रोज ते दहा वेळा हा विडा चघळताहेत. लाल किल्ल्यापासून ते गुजरातपर्यंत फक्त ते हेच बोलतात. कारण भाजपला आजही खरा धोका आणि खरे आव्हान आहे ते काँग्रेसचेच. हे आव्हान परतवून लावण्यासाठी फक्त काँग्रेससाठीच घराणेशाहीचा पत्ता वापरला जातोय, जो

यशस्वी होण्याची सुतराम शक्यता नाही.

आता देशात विविध ठिकाणी घराणेशाही का निर्माण झाली? सहकार, उद्योग, संस्कृती अशा अनेक ठिकाणी घराणेशाही आहे. राजकारणात ती थोडी जास्त दिसते. कारण हे क्षेत्र अधिक मोठे आहे. लोकशाही असतानाही लोक घराणेशाही का स्वीकारतात? या प्रश्नाचे साधे उत्तर लोकांना ती आवडते. लोकांनी आपल्या गरजेपोटी ती स्वीकारली आहे. त्यातूनच एकेक नेता दहा-पंधरा वेळा निवडून



येतो. आपली घराणेशाही तयार करतो. कारण लोक त्यांना पाठिंबा देतात. लोक ज्या मानसिकतेचे असतात त्याच मानसिकतेचे नेते बनतात. भारताचा इतिहास दीर्घ असला तरी तो राजेशाहीचा, घराणेशाहीचा, मोगल इंग्रजशाहीचाच आहे. आपल्या देशात लोकशाहीचे वय अवघे ७५ वर्षांचे आहे आणि लोकशाहीशिवायचे वय हजारो वर्षे आहे. लोकशाही नको ठोकशाही पाहिजे म्हणणाऱ्यांनाही लोक पाठिंबा देत होते आणि वडिलांनंतर नातवालाही पाठिंबा देत होते. एखाद्याने किती वेळा निवडून यावे याविषयी आपल्याकडे नियम नाही. सत्ताधारी आणि विरोधक या दोघांमध्येही घराणेशाही मुक्त संचार करताना दिसते. ती संपवायची असेल, तर जनतेला लोकशाहीच्या अंगाने साक्षर बनवावे लागेल. संविधान साक्षर बनवावे लागेल. तसे न करता केवळ सत्तासंघर्ष म्हणून एखाद्याला सतत झोडपणे अनैतिक आणि स्वार्थीपणाचे आहे. स्वतःच्या डोळ्यातील मुसळ दडवून दुसऱ्याच्या डोळ्यातील कुसळ दाखवण्यासारखे आहे. हे करताना काँग्रेसच्या घराणेशाहीने स्वातंत्र्यपूर्ण आणि स्वातंत्र्योत्तर काळात देशाचे कुठे आणि कसे नुकसान केले, हेही सांगितले पाहिजे. 'भारत दौड़ रहा है' असे म्हणणाऱ्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे, की धावण्यासाठी रस्ता काँग्रेसनेच बनवला आहे. काँग्रेसच्याच अनेक नेत्यांनी सर्वोच्च त्याग केला आहे. भाजपचे असे कोणते नेते आहेत, की ज्यांनी तुरुंगवास भोगला आणि बलिदान केले. काँग्रेसचा त्याग, त्यांची धर्मनिरपेक्षता, देश अखंड ठेवण्याचे प्रयत्न, विकासाचे प्रयत्न लोकांना भावले म्हणून लोक काँग्रेसच्या बाजूने आणि तिच्यातील कथित घराणेशाहीच्या बाजूने उभे राहिले. निवडणुकीत ती मागे पडली असली तरी लोक तिच्याच बाजूने उभे आहेत. राहुल गांधींच्या 'भारत जोड़ो यात्रेच्या निमित्ताने हे पुन्हा एकदा सिद्ध होते. निवडणूक निकाल हेच फक्त एखाद्याच्या अस्तित्वाचे चिन्ह नसते. भाजप दोनवरून दोनशेपर्यंत पोहोचण्यास पन्नास वर्षे लागली. याचा अर्थ पन्नास वर्षांत भाजपचे अस्तित्व नव्हते, असे समजायचे काय? कोणतीही शासन पद्धती लोकांच्या मनात जन्माला येते, राष्ट्रही तेथेच जन्माला येते आणि हो घराणेशाहीही तेथेच जन्माला येते.

शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाकडे चाललेल्या काँग्रेसमध्ये घराणेशाही किती काळ होती, हे आपण पाहिलेच आहे. काँग्रेसचे राजकीय चारित्र्य काय? काँग्रेस शेठजी-भटजींची आहे, अशी टीका खूप वर्षांपासून तिचे विरोधक करतात; पण तेही फारसे खरे नाही. महात्मा गांधींचा भारतात उदय झाला आणि शेठजी-भटजी दूर फेकले गेले, असाही इतिहास आहे. स्वातंत्र्यासाठी उत्सुक झालेल्या सर्व जाती-धर्मांतला फाटकातुटका माणूस गांधींच्या मागे उभा राहिला आणि काँग्रेसचे राजकीय, सामाजिक चारित्र्य बदलू लागले. काँग्रेस दलितांची झाली, अल्पसंख्याकांची झाली आणि सत्ताकेंद्रात तेथूनही वेगवेगळे घटक येऊ लागले. बाबू जगजीवन राम काय, त्यांची कन्या काय, महात्मा गांधींनी मोठ्या आदराने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे दिलेल्या जबाबदाऱ्या काय, सीताराम केसरी काय, ख्रिस्ती, मुस्लीम, जैन आदी अल्पसंख्याक ठरवल्या गेलेल्या धर्मांतील लोक काय, या सर्वांना घेऊन काँग्रेस चालत राहिली. कारण तिचे घटक तिची राजकीय शक्ती होते. प्रश्न होता तो काँग्रेसच्या नेतृत्वाचा. स्वातंत्र्यानंतर बरीच वर्षे या पक्षाचे नेतृत्व नेहरू-गांधी घराण्याकडे राहिले; पण ७५ वर्षे ते त्यांच्याकडेच होते, असे म्हणणे बरोबर नाही. निम्म्याच्या जवळपास होते, असे म्हणणे संयुक्तिक ठरेल. याच काळात अन्य पक्षातही वरच्या वर्गाचे नेतृत्व होते. त्याला भाजप, कम्युनिस्ट, असे कोणी अपवाद नाही. भाजपने एकदा-दोनदा नेतृत्व बदलण्याचा प्रयत्न केला होता. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने अगदी अलीकडे आपला राष्ट्रीय नेता दलितवर्गातून आणला. भाजपने आंबेडकरी नेतृत्वात फूट पाडून बरेच नेते आपल्याकडे खेचले. या सर्व पार्श्वभूमीवर गेली २०-२५ वर्षे काँग्रेसचा अध्यक्ष गांधी घराण्यातीलच होते. आजोबा, वडील, मुलगी, नातू, सून, पणतू, असा हा प्रवास आहे; पण तो सलग नाही, पन्नासेक वर्षांचा आहे. काँग्रेसचे नेतृत्व हे येथील जनतेच्या जगण्याचा आविभाज्य भाग बनले आहे. याच नेतृत्वाच्या



नावाने निवडणुका जिंकल्या किंवा हरल्या जातात. जसे भाजप हिंदुत्वाच्या नावाने आणि डावे मार्क्सच्या नावाने लढतात. या सर्व पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या दीर्घ इतिहासाने कूस बदलली आणि सलग बावीस वर्षांनंतर निवडणुकीद्वारे अध्यक्षपदाची निवड केली आणि खुल्या निवडणुकीत मल्लिकार्जुन खरगे यांचा विजय झाला. कोणत्याही पक्षात अध्यक्षपदासाठी राखीव जागा नाहीत, हेही लक्षात ठेवावे लागेल. खूप वर्षांनी काँग्रेसच्या अध्यक्षपदावर दलित समूहातून अतिशय कष्टाने, जिद्दीने आणि दीर्घ लढाई करून आलेला माणूस अध्यक्ष झाला आहे. खरगे यांना मिळालेली प्रचंड मते स्वाभाविकच काँग्रेसच्या सामाजिक प्रतिमेकडे बोट करतात. एका दलिताचा पराभव करणे काँग्रेसमधील लोकांना सहज शक्य होते; पण तसे झाले नाही. वरच्या नेतृत्वापासून खालच्या फळीपर्यंत सर्वांनीच खरगे यांना पाठिंबा दिला आणि एका अर्थाने आपले लोकशाहीवादी आणि धर्मनिरपेक्ष चारित्र्य स्पष्ट केले आहे. भाजपचा नेता आणि नमो असणाऱ्या मोदींना जे जमले नाही, ते काँग्रेसने करून दाखवले आहे.

मोदींनी टीका केली म्हणून काँग्रेसने निवडणूक घेतली, असे समजणे घाईचे होईल. निवडणुकीत पराभव झाला म्हणून निवडणूक घेतली, असे म्हणणेही चुकीचे होईल. कारण गेल्या ७५ वर्षांत बिगर गांधी कुटुंबातील किमान तीस-चाळीस तरी अध्यक्ष झाले आहेत. राजीव गांधी यांच्या हत्येनंतर सोनियांनी पंतप्रधान व्हावे, असे सर्वांनाच वाटत होते; पण त्यांनी ते ठामपणे आणि विनम्रतेने नाकारले. नरसिंहराव पंतप्रधान आणि अध्यक्ष झाले होते. या साऱ्याचा नीट अर्थ समजावून घ्यावा लागेल. एकीकडे पक्षाला आतून आणि बाहेरून तयार होणारी आव्हाने, हिंदुत्वाच्या लाटेला शरण जाणारे अनेक घटक आणि दुसरीकडे सैल जिभेने स्वतःवर होत असलेली टीका सहन करत त्यांनी काँग्रेस नावाचे घरटे जपून ठवले. भाजपने किती दलित मुख्यमंत्री, अर्थमंत्री, गृहमंत्री केले आणि काँग्रेसने किती केले याचा शोध घेण्याचा प्रयत्न त्रयस्ताने केला, तर उत्तर काय येईल? एक दीर्घ परंपरा असलेला पक्ष टिकवण्याचे सामर्थ्य सोनियांनी मिळवले आणि तेथील पद सोडून राहुल गांधी भारत जोडो यात्रेला निघाले. अध्यक्षपदी खरगे विराजमान झाले.

इतिहास कूस बदलत असतो आणि तसे केल्याशिवाय त्याला वर्तमानात, भविष्यात पाऊल टाकता येत नाही. त्यांच्याकडे सामर्थ्य असते तेच कूस बदलतात, हेही तितकेच खरे आहे. इथे काँग्रेसच्या इतिहासाने आणि खरगे यांच्या कारकीर्दीनेही कूस बदलली आहे, ती एक नवे वर्तमान घडवण्यासाठी. खरगे यांच्या पक्षनिष्ठेबद्दल आणि त्यांच्या कर्तृत्वाबद्दल कोणीही शंका घेऊ शकत नाही. सारे आयुष्य पक्ष आणि समाजाची सेवा करण्यात त्यांनी खर्च केले आहे. मतदारसंघात आणि संसदीय राजकारणात त्यांनी आपल्या कर्तृत्वाचे डोंगर उभे केले आहेत. मितभाषी आणि बहुभाषी असलेल्या खरगे यांना काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या भारताच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक नाड्या ठाऊक आहेत. याशिवाय गांधी घराण्याचा त्यांना मनापासून पाठिंबा आहे. देशभर कार्यकर्त्यांचे भलेमोठे जाळेही त्यांच्यामागे कसे उभे आहे, हे निवडणूक निकालाने स्पष्ट केले आहे. राजकारणातील भीष्माचार्य, असे स्वरूप त्यांना प्राप्त झाले आहे. आपण केवळ दलित आहोत, अशी भावना त्यांच्या मनात कधीच नव्हती आणि नाही. भेदाभेदाचे चष्मे काढून समाजाकडे पाहण्याची एक व्यापक दृष्टीही त्यांच्याकडे आहे. या सर्वांचा लाभ त्यांना त्यांच्या नव्या कारकीर्दीसाठी होईल, यात शंका नाही. काँग्रेसमधील महत्त्वाचे वळण त्यांच्यापासून सुरू होते आणि ते काँग्रेसपुरते मर्यादित न राहता भारतीय राजकारणाचा महत्त्वाचा घटक होते. भारत एका नाजूक अवस्थेतून वाटचाल करतो आहे. मूलतत्त्ववादाचे मोतीबिंदू त्याच्या डोळ्यात जाणीवपूर्वक वाढवले जात आहेत, अशा परिस्थितीत नेहरू-गांधी घराण्याची परंपरा, धर्मनिरपेक्षतेची परंपरा लाभलेल्या पक्षाचे अध्यक्षपद खरगे यांना लाभणे हा त्यांचा आणि त्यांच्या परंपरेचाही गौरव आहे, यात शंका नाही. म्हणूनच या निवडीकडे केवळ पक्ष म्हणून न पाहता राष्ट्रीय दृष्टिकोनातून पाहायला हवे.

# मल्लिकार्जुन खरगे व काँग्रेससमोरील आव्हाने






अनंत बागाईतकर


**भाजपच्या प्रचारतंत्राचा मुकाबला करणारी आणि काँग्रेस विचारसरणी लोकांपर्यंत यशस्वीपणे पोहोचवू शकेल, अशी प्रति-प्रचारयंत्रणाही खरगेंना उभारावी लागेल. त्याचप्रमाणे पक्षात सुरू असलेला नवे विरुद्ध जुने किंवा तरुण विरुद्ध वयोवृद्ध यातील पिढी-संघर्ष टाळून त्यात समन्वय कसा निर्माण करता येईल, याकडेही त्यांना विशेष लक्ष पुरवावे लागणार आहे. पक्षात एकदा शांतता निर्माण झाली म्हणजेच पक्षांतर्गत घडी सुरळीत झाल्यास बाह्य आव्हानांचा मुकाबला करणे पक्षाला शक्य होणार आहे.**

मल्लिकार्जुन खरगे काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. २४ वर्षांनंतर नेहरू-गांधी कुटुंबोबाहेरच्या व्यक्तीकडे अध्यक्षपद गेले आहे. यापूर्वी सीताराम केसरी यांनी अल्पकाळ काँग्रेसचे अध्यक्षपद भूषविले होते; परंतु ते काँग्रेसला नेतृत्व देऊ शकले नाहीत. पक्षाला मोठी गळती लागली होती. अखेर त्यांना अध्यक्षपदावरून काढून टाकण्यात येऊन त्यांच्या जागी सोनिया गांधी यांना अध्यक्ष करण्यात आले. त्यांच्या कारकीर्दीत काँग्रेसला २००४ ते २०१४, अशी सलग दहा वर्षे केंद्रात सत्तेची संधी मिळाली. यानंतर काँग्रेसच्या पराभवाची मालिका सुरू झाली आणि अद्याप त्याला विराम मिळालेला नाही. याचा परिणाम म्हणून पक्षाला बेशिस्त, बेदिली, बंडखोरी, अनागोंदी व गळतीसारख्या समस्यांनी पार ग्रासून टाकले. राहुल गांधी यांच्याकडे पक्षाची धुरा देण्याची सोनिया गांधी यांची तीव्र इच्छा होती व त्या दिशेने त्यांनी

पावलेही टाकली; परंतु २०१९ च्या पराभवाचा धसका घेतलेल्या राहुल गांधी यांनी जबाबदारी घेण्याचे नाकारले. त्यानंतर विनाजबाबदारी पक्षावर अधिकार गाजविण्याचा प्रकार सुरू झाला. त्याला वरिष्ठ काँग्रेसजन कंटाळले. ज्याला मागच्या आसनावरून चालकत्व करणे म्हणतात (बॅक सीट ड्रायव्हिंग) तो प्रकार सुरू झाला. पक्षातील बंडखोरी, असंतोष अपरिपक्वतेने हाताळले गेले. पंजाबमध्ये कॅप्टन अमरिंदरसिंग यांच्यासारख्या तालेवार नेत्याला दुखावले गेले व परिणामी पंजाबमध्ये पक्षाला पराभूत व्हावे लागले.

**खरगेंचा विजय अपेक्षितच होता**

राहुल गांधी यांनी आघाडीवर राहून लढण्याऐवजी मागे राहून कळा-चाव्या फिरविण्याचे धंदे सुरू केले आणि त्यातून भलेभले काँग्रेस नेते चिडले आणि त्यांनी राहुल, प्रियांका आणि सोनिया गांधी यांच्या कामकाज पद्धतीबद्दल जाहीर आक्षेप घेण्यास सुरुवात केली. यातूनच असंतुष्ट अशा 'जी-२३' म्हणजे तेवीस काँग्रेस नेत्यांचा गट तयार झाला. त्यातील नेत्यांना सपत्न वागणूक दिली गेली. ते प्रकरण इतके विकोपाला गेले, की काँग्रेसचे व विशेषतः गांधी कुटुंबाचे एकनिष्ठ म्हणविले जाणारे गुलाम नबी आझाद यांच्यासारखे नेते तर पक्ष सोडून गेले. या काँग्रेसअंतर्गत लाथाळ्यांची परमोच्च सीमा सुरू असतानाच भाजप आणि मुख्यतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसच्या घराणेशाहीवर जहरी टीकेची मोहीम सुरू केल्याने पक्षाला बचावाचा पवित्रा घ्यावा लागला. निवडणुकांमधील सततच्या पराभवाने पक्ष जर्जर झाला. अशा तिहेरी संकटांचा मुकाबला करताना काँग्रेस व काँग्रेस नेतृत्वाची दमछाक होऊ लागली. अखेर बाह्य टीका, तसेच अंतर्गत दबावाखाली नेहरू-गांधी कुटुंबाने पक्षाचे नेतृत्व सोडण्याची तयारी केली आणि काँग्रेस अध्यक्षपदासाठी निवडणुकीची घोषणा करण्यात आली. पक्षाचे एक खासदार शशी थरूर यांनी निवडणूक लढविण्याचा निर्णय केला; परंतु त्यांना नेहरू-गांधी कुटुंबाचा आशीर्वाद मिळू शकला नाही. मल्लिकार्जुन खरगे यांच्या नावाची चर्चा सुरू करण्यात आली आणि नेहरू-गांधी कुटुंबांचा वरदहस्त लाभल्यानंतर त्यांनी निवडणूक लढवली आणि अर्थातच ते विजयी झाले. त्यांचा विजय अपेक्षितच होता. निवडून आल्यानंतर त्यांनी पक्षाला गांधी कुटुंबाच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असल्याचे सांगून एक प्रकारे पक्षावर अजूनही नेहरू-गांधी कुटुंबांचीच अप्रत्यक्ष सत्ता असल्याचे स्पष्ट संकेतही दिले. तसेच ते नेहरू-गांधी कुटुंबीयांचे मार्गदर्शन व सल्ला घेऊनच अध्यक्षपदाची जबाबदारी पार पाडतील,





असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळेच ते केवळ नामधारी काँग्रेस अध्यक्ष असतील काय, अशी शंका मनात आल्याखेरीज राहत नाही.

**राजस्थानातील राजकीय समीकरणाची खरगेंना पुरेशी माहिती**

वर उल्लेख केल्याप्रमाणे खरगे यांच्यासमोर अनेक आव्हाने आहेत. सर्वप्रथम म्हणजे त्यांना काँग्रेस पक्षाची संघटनात्मक घडी बसवावी लागेल. संघटनात्मक घडी बसवतानाच पक्षशिस्तीबाबत विशेष दंडक तयार करून त्यावर अंमलबजावणी करण्याचे धारिष्ट्य दाखवावे लागेल. त्याचबरोबर सोनिया गांधी, राहुल गांधी व प्रियांका गांधी यांच्या पक्षातील भूमिका निश्चित कराव्या लागतील. सर्वांत महत्त्वाचे आव्हान आहे, ते म्हणजे पक्षात दुहेरी अधिकार किंवा सत्ताकेंद्र निर्माण होणार नाही, याची काळजी ते घेऊ शकणार आहेत काय आणि त्यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून राहतील. पक्षात शिस्त निर्माण करण्याबरोबरच त्यांना पक्षातील असंतोष आणि बंडखोरीला आळा घालण्यासाठी तातडीची पावले उचलावी लागतील. यामध्ये तूर्तास त्यांना राजस्थानला विशेष प्राधान्य द्यावे लागेल. राजस्थानात तरुण नेते सचिन पायलट यांनी मुख्यमंत्रिपदासाठी आतापर्यंत अनेक अयशस्वी प्रयत्न केले आहेत. पुढच्या वर्षी राजस्थानसह मध्य प्रदेश व छत्तीसगढ या तीन प्रमुख हिंदी भाषक राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका आहेत व त्यादृष्टीनेच त्यांना राजस्थानची हाताळणी करावी लागेल. राजस्थानात अशोक गेहलोत यांना मुख्यमंत्रिपद सोडण्याची इच्छा नाही व त्यामुळेच त्यांनी काँग्रेसच्या अध्यक्षपदाची 'ऑफर' स्वीकारण्याबाबत असमर्थता दाखवली होती. त्यानिमित्ताने त्यांनी स्वतःचे शक्तिप्रदर्शन करून राजस्थानात तेच 'दादा' आहेत, हे दाखवून दिले. त्यामुळेच राजस्थान हाताळताना खरगे यांना त्यांचा प्रदीर्घ राजकीय अनुभवाचा उपयोग करावा लागेल. राजस्थानातील शक्तिप्रदर्शनाच्या निमित्ताने खरगे राजस्थानात विशेष निरीक्षक म्हणून गेले होते. त्यामुळे त्यांना तेथील राजकीय समीकरणाची पुरेशी माहिती आहे. छत्तीसगढमध्ये मुख्यमंत्री भूपेश बाघेल यांनी आपली पकड कायम राखली असली तरी त्यांचे सहकारी मंत्री टी. एस. सिंगदेव हे असंतुष्ट व नाराज आहेत आणि त्यांना मुख्यमंत्री होण्याची आकांक्षा आहे. अर्थात, आमदारांमध्ये त्यांना फारसे पाठबळ नसल्याने त्यांनी आतापर्यंत केवळ नाराजी व असंतोष दाखविण्यापलीकडे फारशी कृती (सचिन पायलट यांच्यासारखी) केलेली नाही. मात्र, निवडणुका जवळ आल्यावर भाजप असंतुष्टांना जवळ करण्याचा प्रयत्न करणार, हे स्पष्ट आहे. राजस्थान व छत्तीसगढ या दोन राज्यांमध्येच काँग्रेसचे स्वबळाचे सरकार आहे. तेथील दोन्ही मुख्यमंत्री आपली पकड राखून आहेत. त्यामुळे त्यांना अस्थिर करणे पक्षाला महागात जाऊ शकते. पंजाबमध्ये राहुल व प्रियांका यांच्या अपरिपक्व हाताळणीमुळे अमरिंदरसिंग यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याला आणि पंजाबला काँग्रेसला गमवावे लागले होते. तो अनुभव ध्यानात घेऊनच खरगे यांना तारेवरची कसरत करावी लागेल. मध्य प्रदेशात तूर्तास कमलनाथ यांच्यासारखा वरिष्ठ नेता पक्षाकडे आहे. शिवाय दिग्विजयसिंगही आहेत. मध्य प्रदेशातील काँग्रेसचे सरकार गाफीलपणा, फाजील आत्मविश्वास आणि गटबाजी यामुळे गमवावे लागले होते. अजूनही मध्य प्रदेशात काँग्रेसची स्थिती वाईट नाही. त्यामुळे ते राज्य पुन्हा यशस्वीपणे काबीज करण्याच्या दृष्टीने खरगे यांना रणनीती आखावी लागेल.

**हुड्डा यांनी भाजपला पूर्ण बहुमत मिळू दिले नव्हते**



हरयाणात भाजपची स्थिती फारशी चांगली नाही. तेथे काँग्रेसचे नेतृत्व भूपिंदरसिंग हुड्डा यांच्याकडे आहे. सलग दोन वेळेस ते मुख्यमंत्री राहिले आहेत आणि जाट समुदायात त्यांचे चांगले वजन आहे. गेल्या निवडणुकीपूर्वी राहुल गांधी यांनी त्यांना बाजूला सारण्याचा प्रयत्न केला होता; परंतु जेव्हा त्यांच्याखेरीज निवडणूक सोपी जाणार नाही, हे लक्षात आल्यानंतर आयत्या वेळी त्यांच्याकडे नेतृत्व देण्यात आले होते. त्यांनीही प्रचंड मेहनत केली आणि भाजपला पूर्ण बहुमत मिळू दिले नव्हते. भाजपला नाइलाजाने चौटालांच्या पक्षात फूट पाडून बाहेर पडलेल्या गटाबरोबर हातमिळवणी करून सरकार स्थापन करावे लागले होते. त्यामुळे हरयाणात हुड्डा यांना 'फ्री हँड' देण्याचा आणखी एक प्रयोग करण्यास खरगे यांना हरकत नसावी.

**भाजप हा लाथाळ्यांनी पूर्णपणे ग्रस्त झालेला पक्ष**

वरील राज्यांमधील निवडणुका पुढील वर्षी आहेत. खरगे यांच्यापुढील तत्काळ आव्हान म्हणजे हिमाचल प्रदेश व गुजरात निवडणुकांचे आहे. त्या निमित्ताने त्यांच्या नेतृत्वाचा पक्षाला कोणता लाभ होऊ शकतो, हे स्पष्ट होईल. त्याचबरोबर पुढील वर्षाच्या सुरुवातीला म्हणजे मे महिन्याच्या आसपास त्यांचे गृहराज्य कर्नाटकात विधानसभा निवडणूक होणार आहे. कर्नाटकात भाजप हा लाथाळ्यांनी पूर्णपणे ग्रस्त झालेला पक्ष आहे. तेथे काँग्रेसला यशाची अपेक्षा करता यावी, अशी अनुकूल स्थिती आहे. खरगे यांचे अध्यक्षपद कर्नाटकात किती उपयोगी पडू शकते, हे निवडणुकीच्या निकालांवरून स्पष्ट होईल. खरगे अनुसूचित जातीचे आहेत. त्यांचा विधिमंडळ कामकाजाचा व मंत्री व प्रशासनाचा अनुभावही दांडगा आहे. कर्नाटकच्या मुख्यमंत्रिपदाची त्यांची मनोमन इच्छा असताना सोनिया गांधी यांनी त्यांना कर्नाटकातून राष्ट्रीय राजकारणात आणले आणि लोकसभा व सध्या राज्यसभेत विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी दिल्यानंतर आता तर त्यांनी खरगे यांना काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्षपद दिले आहे. त्यामुळे खरगे यांना आता मुख्यमंत्रिपदाचे स्वप्न सोडावे लागणार आहे; पण राष्ट्रीय अध्यक्ष या नात्याने ते कर्नाटकात पक्षाला विजयश्री आणून देणार कार्ये हा प्रश्न आहे. त्या आव्हानालाही त्यांना सामोरे जावे लागणार आहे.

**खरगेंना काळाबरोबर शर्यत करावी लागणार आहे**

काँग्रेस आजही प्रमुख विरोधी पक्ष म्हणून गणला जातो. प्रादेशिक पक्षांनी एखादी आघाडी स्थापन केली आणि भाजपला मात देण्याचा प्रयत्न केला तरी काँग्रेसच्या सहभागाखेरीज ते भाजपला टक्कर देऊ शकणार नाहीत आणि भारतीय राजकारणातील काँग्रेसचे ते स्थान अपरिहार्य आहे, हे वास्तव त्यांना स्वीकारावे लागेल. अर्थात, काँग्रेसनेही दादागिरीची भूमिका न करता सामंजस्याचे आणि प्रादेशिक पक्षांना सामावून घेण्याचे राजकारण केल्यास काँग्रेसला यश निश्चितच मिळेल, त्यासाठी देवाणघेवाणीची भूमिकाही त्यांना ठेवावी लागेल. याचे प्रमुख कारण म्हणजे आपल्याला अजून स्वबळाचे बहुमत प्राप्त करण्याइतकी शक्ती प्राप्त झालेली नाही, या वास्तवाची जाणीवही काँग्रेसला ठेवावी लागेल आणि त्याच आधारे सर्व समविचारी प्रादेशिक पक्षांना बरोबर घेऊन चालण्याचा मोठेपणा दाखवावा लागेल. यासाठीही खरगे यांना योग्य व व्यवहार्य अशी रणनीती आखावी लागेल. महाराष्ट्र, बिहार, झारखंड, तामिळनाडू या राज्यांमध्ये काँग्रेसची समविचारी पक्षांबरोबर आघाडी आहे. त्यांनाही बरोबर घेऊन वाटचाल करावी लागेल. २००४ मध्ये काँग्रेसला बहुमत नव्हते; परंतु काँग्रेसला सत्ता मिळाली याचे प्रमुख कारण आघाडीचे राजकारण आणि भाजपला सोडून आलेल्या प्रादेशिक

पक्षांनी काँग्रेसला साथ देण्याची घेतलेली भूमिका हे होते. काँग्रेसला याचा विसर पडून चालणार नाही. भाजप आणि नरेंद्र मोदी यांचा मुकाबला एकट्याने करण्याची ताकद काँग्रेसमध्ये नाही, या वास्तवाचे भान काँग्रेसला ठेवावे लागेल व त्यानुसारच २०२४ च्या

लोकसभा निवडणुकीची रणनीती तयार करावी लागेल. त्यासाठीची पूर्वतयारी आतापासूनच करावी लागेल. म्हणजेच खरगे यांना घड्याळाबरोबर म्हणजेच काळाबरोबर शर्यत करावी लागणार आहे. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाल्यास खरगे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे संबंध चांगले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात तरी दोन्ही पक्षांतील संबंधांवर फारसा परिणाम होण्याची शक्यता नाही व दोघांमधील सहकार्य सुरळीत चालू राहील.

**आर्थिक सुधारणा, धर्मनिरपेक्षता ही काँग्रेसची मूलभूत विचारसरणी**

सर्वांत महत्त्वाचे आव्हान आहे ते काँग्रेसच्या विचारसरणीमध्ये स्पष्टता आणण्याचे. भाजप आणि मोदी यांचे आक्रमक बहुसंख्याकवादी हिंदुत्वाच्या राजकारणापुढे काँग्रेसला नमते घेऊन चालणार नाही. ते आक्रमक हिंदुत्वाचे राजकारण करतात व त्यांना यश मिळते म्हणून स्वतःही त्याचे भ्रष्ट अनुकरण करणे याला रणनीती म्हणत नाहीत. काँग्रेसच्या मूलभूत विचारसरणीशी ती प्रतारणा आहे. मध्यम मार्ग, मानवी चेहरा असलेल्या आर्थिक सुधारणा, धर्मनिरपेक्षता ही काँग्रेसची मूलभूत विचारसरणी आहे; परंतु हिंदुत्वाच्या राजकारणाची चलती आहे म्हणून राहुल गांधी यांनी ठिकठिकाणच्या मंदिरांत जाणे, जानवे घालून ब्राह्मण असल्याचे मिरविणे हे शुद्ध व भ्रष्ट, असे भाजपचे अनुकरण आहे. काँग्रेसने नेहमीच सर्व जाती-धर्मांना समानतेने वागविल्याचे छातीठोकपणे सांगून या देशात भाजप-संघ परिवार पुरस्कृत प्रचलित केल्या जाणाऱ्या तिरस्कारावर आधारित राजकारणाला काँग्रेसचा विरोध आहे, हे सांगण्याचे धाडसही काँग्रेसने दाखवून समाजातील जास्तीत जास्त घटकांना स्वतःकडे आकर्षित करण्याची आवश्यकता आहे. काँग्रेसला हिंदू व मुसलमान हे सारखेच आहेत, हेही ठामपणे सांगून भाजपच्या फूटपाड्या राजकारणाचा प्रतिवाद करायलाही काँग्रेसला शिकावे लागेल.

खरगे यांच्यापुढील आव्हानांचा हा सर्वसाधारण आढावा आहे. खरगे यांचे वय ऐंशी आहे. ते इंग्रजी व हिंदी उत्तम बोलू शकतात. त्यामुळे हिंदी भाषक राज्यांमध्येही त्यांना अडचण होणार नाही. उलट त्यांचे उर्दूमिश्रित हिंदी अनेकांना आवडेल. खरगे हे उत्तम मराठी बोलतात. दिल्लीतील मराठी पत्रकारांबरोबर ते अगदी अस्खलित मराठीत बोलतात. खरगे हे काँग्रेसच्या जुन्या पठडीतील नेते आहेत. काँग्रेसच्या संघटना परंपरागत स्वरूपात टिकून असलेली महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ यासारखी राज्ये आहेत आणि खरगे हे कर्नाटकचे असल्याने ते त्या पठडीतील आहेत. त्यामुळे काँग्रेसच्या परंपरागत विचारसरणीशी ते अवगत आहेत; परंतु राहुल व प्रियांका आणि काँग्रेसमध्ये सध्या आघाडीवर असलेल्या तरुण आणि आधुनिक युगाशी नाळ असलेल्या पिढीबरोबर ते कसे जमवून घेतात तीही त्यांच्यासाठी एक कसोटी असेल. त्याचबरोबर भाजपच्या प्रचारतंत्राचा मुकाबला करणारी आणि काँग्रेस विचारसरणी लोकांपर्यंत यशस्वीपणे पोहोचवू शकेल, अशी प्रति-प्रचारयंत्रणाही त्यांना उभारावी लागेल. या नव्या व आधुनिक माहिती तंत्रज्ञानावर आधारित कार्यशैली व कार्यसंस्कृतीशीही त्यांना जुळवून घ्यावे लागणार आहे. त्यामुळे खरगे आता त्यांची पक्षसंघटनेची 'टीम' कशी निवडतात याकडे



सर्वांचे लक्ष असेल. त्यावरूनही ते किती स्वतंत्र आहेत, हे स्पष्ट होईल. त्याचप्रमाणे पक्षात सुरू असलेला नवे विरुद्ध जुने किंवा तरुण विरुद्ध वयोवृद्ध यातील पिढी-संघर्ष टाळून त्यात समन्वय कसा निर्माण करता येईल, याकडेही त्यांना विशेष लक्ष पुरवावे लागणार आहे. पक्षात एकदा शांतता निर्माण झाली म्हणजेच पक्षांतर्गत घडी सुरळीत झाल्यास बाह्य आव्हानांचा मुकाबला करणे पक्षाला शक्य होणार आहे. थोडक्यात खरगे यांच्यासमोर आव्हानांची संख्या मोठी आहे. आता त्यांनी सूत्रे हाती घेतली आहेत. प्रथम ते पदाधिकारी कसे निवडतात यावरूनच ते या आव्हानांचा मुकाबला कसा करू शकतील याची झलक पाहण्यास मिळेल. •••

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार व विश्लेषक आहेत.)**

# चीनचे ‘जननेते’ शी जिनपिंग



विजय नाईक

**शी जिनपिंग यांनी सुरू केलेल्या भ्रष्ट्राचार विरोधी मोहिमेत सुमारे एक लाख लोकांवर कारवाई करण्यात आली. ८० हजार पक्षसदस्यांनी आपल्या हातून नियमांचे उल्लंघन झाल्याचे गेल्या पाच वर्षांत कबूल केले. पक्षातून हाकलून देणे, तुरुंगात टाकणे आदी शिक्षा ठोठावल्या जातात. १२० उच्चाधिकारी, बारा ते तेरा उच्च सेनाधिकारी, सरकारी कंपन्यांतील अनेक अधिकारी व पाच राजकीय नेत्यांविरुद्ध कारवाई करण्यात आली. परिणामतः त्यांची प्रतिमा ‘कठोर; परंतु जनतेला दिलासा देणारा नेता’ अशी झाली आहे.**

चीनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या (सीसीपी) २० व्या काँग्रेसच्या अधिवेशनाची २२ ऑक्टोबर २०२२ रोजी सांगता झाली. बीजिंगमधील ऐतिहासिक तियानमेन चौकातील ‘ग्रेट हॉल आफ पीपल’मध्ये झालेल्या या अधिवेशनास उपस्थित असलेल्या २,२९६ प्रतिनिधींनी अध्यक्ष शी जिनपिंग यांच्या नेतृत्वावर सलग तिसऱ्यांदा शिक्कामोर्तब केले. त्यांची मुदत पुढील पाच वर्षांसाठी असली, तरी त्यानंतरही ते प्रदीर्घ काळ त्याच पदावर राहतील, या दिशेने चीनचे राजकारण पुढे सरकले आहे. चीनच्या कम्युनिस्ट पक्षाने त्यांच्यावर दाखविलेल्या विश्वासाने त्यांना केवळ माओत्से तुंग यांच्या रांगेत नेऊन बसविलेले नाही, तर गेल्या दहा वर्षांत शी जिनपिंग यांनी चीनवर व कम्युनिस्ट पक्षावर आपली पकड किती घट्ट केली आहे, त्याचे हे द्योतक होय. तिसऱ्या वेळेस ते चीनचे अध्यक्ष पक्षप्रमुख व सरसेनापती झाले आहेत.

**चीनच्या कम्युनिस्ट पक्षाची पिरॅमिडशी तुलना**

चीनच्या घटनेत होणाऱ्या दुरुस्तीनुसार, ‘‘शी जिनपिंग यांना चीनचे ‘जननेते (पीपल्स लीडर-रेनमिन रिंगशिऊ)’ घोषित केले जाईल.’’ चेअरमन माओ झे डाँग यांच्यानंतर हा दर्जा मिळविणारे शी हे एकमेव आहेत. चीनच्या मध्यवर्ती टेलिव्हिजनने प्रसारित केलेल्या वृत्तानुसार, (सीसीटीव्ही) ‘ते पक्षाचा गाभा होत’, तर उपपरराष्ट्रमंत्री मा झावशू व उपपर्यावरणमंत्री झाय चिंग यांनी त्यांचे ‘ग्रेट मार्क्सिस्ट स्टेस्टमन विथ ग्लोबल व्हिजन,’ असे वर्णन केले. १६ ऑक्टोबर रोजी सुरू झालेले अधिवेशन एक आठवडा चालले. त्यातील महत्त्वाची बाब म्हणजे शी जिनपिंग यांचे तब्बल दोन तास झालेले भाषण व त्यातून चीनची विद्यमान स्थिती व भविष्याच्या वाटचालीचा त्यांनी मांडलेला आलेख. भाषण ६४ पानांचे आहे. चीनच्या एकूण १.४२ अब्ज लोकसंख्येपैकी कम्युनिस्ट पक्षाचे ९६.७ दशलक्ष सदस्य



(प्रत्येक २० चिनीव्यक्तींतील एक जण पक्षाचा सदस्य आहे) आहेत. शी जिनपिंग हे चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मी (पीएलए)चे सर्वोच्च कमांडर असून, पक्षाचे महाचिटणीसही आहेत. चीनच्या राजकीय परंपरेत त्यांच्यानंतरचे दुसरे महत्त्वाचे स्थान आहे, ते पंतप्रधान ली कशांग यांचे. १५ जून १९५३ रोजी जन्मलेले शी यांनी वयाच्या पंचविसाव्या वर्षी कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला. तेव्हापासून स्वतः

च्या कर्तृत्वाच्या जोरावर पस्तीस वर्षांत देशाच्या सर्वोच्च नेत्यांचे (चीनचे अध्यक्ष) स्थान मिळविण्यापर्यंत ते पोहोचले. त्यांच्या लोकप्रियतेत सातत्याने भर पडत असून, चीनचे दुसरे 'माओत्से तुंग' असे त्यांचे वर्णन केले जाते. चीनच्या कम्युनिस्ट पक्षाची तुलना पिरॅमिडशी केली जाते. शिखरस्थ शी जिनपिंग असले, तरी चीनचे ३१ प्रांत, स्वायत्त प्रदेश त्यातील ५६ वंशीय व उपवंशीय गट, ३०२ बोलीभाषा, चीनचा भौगोलिक विस्तार, याकडे पाहता पक्षाचे वर्चस्व ठेवून प्रगती साधायची हे काही सोपे काम नव्हते.

**जनतेला कम्युनिस्ट पक्षाच्या एकाधिकारशाहीची सवय झाली आहे**

अधिवेशनातील आपल्या भाषणात त्यांनी चीनच्या 'झीरो कोविड' धोरणाचा वारंवार उल्लेख केला. कोणत्याही परिस्थितीत चीनमध्ये पुन्हा कोरोनाची साथ पसरू नये, म्हणून घेण्यात आलेली खबरदारी, त्यासाठी जारी करण्यात आलेले कठोर नियम, वेळ प्रसंगी, शहरेच्या शहरे प्रतिबंधित करण्यासाठी लादण्यात आलेली संचार बंदी आदींच्या नियमात कोणताही बदल होणार नाही, असा संकेत त्यांनी दिला. अर्थात, त्याचा चीनमधील गुंतवणूक, पर्यटन, काही प्रमाणात बाजारपेठा यांच्यावर विपरीत परिणाम होत आहे; परंतु तो झाला तरी चालेल; पण साथीला पुन्हा येऊ द्यायचे नाही, असा निर्धार त्यांनी केला आहे.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा होता तो हाँगकाँगचा. त्याचे वर्णन त्यांनी 'अनागोंदी ते सुशासन असे झालेले संक्रमण', असा केला. हाँगकाँग हे जगातील एक प्रमुख आर्थिक केंद्र. २६ जानेवारी १८४१ रोजी ब्रिटनने त्याचा ताबा घेतला. त्यानंतर तब्बल १५६ वर्षांनी १ जुलै १९९७ मध्ये ते चीनच्या स्वाधीन करण्यात आले. "२०४७ मध्ये ते राजकीय व आर्थिकदृष्ट्या (वन कन्ट्री टू सिस्टीम्स) चीनमध्ये सामील होईल," असा समझोता होऊनही सुमारे २७ वर्षे आधीच शी जिनपिंग यांनी तेथील लोकशाही २०२० मध्येच जवळजवळ संपुष्टात आणली आहे. चीनमधील शासनप्रणाली लागू केली आहे. त्याचे वर्णन ते 'अनागोंदी ते सुशासन' करीत आहेत. तथापि, तेथील लोकशाहीला मानणारे लाखो युवक आजही सरकारविरुद्ध निदर्शने आदी करीत असतात. गेल्या वर्षा-दोन वर्षांत या मोहिमेंतर्गत अनेक नेत्यांना अटक करण्यात आली असून, वर्तमानपत्रांच्या संपादकांच्या अटकांचे सत्रही चालू आहे. चीनच्या मुख्य प्रदेशातील जनतेला कम्युनिस्ट पक्षाच्या एकाधिकारशाहीची एव्हाना सवय झाली आहे. त्यामुळे, हाँगकाँगमध्ये होणाऱ्या बळजबरी व धाकदपटशेचे त्यांना सोयरसुतक नाही. जिनपिंग यांच्यानुसार, हाँगकाँगला मुख्य राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी केल्या जात असून, तेथे सुशासन आले आहे. याचा दुसरा अर्थ, म्हणजे चीनच्या कम्युनिस्ट पक्षाला अभिप्रेत असलेला हाँगकाँगमधील लोकशाहीवाद्यांचा विरोध पूर्णपणे संपुष्टात आणण्याचा प्रयत्न चालू आहे.


तिसरा मुद्दा होता, तो तैवानच्या विलीनीकरणाचा. अलीकडे अमेरिकन काँग्रेसच्या सभापती नॅन्सी पेलोसी यांनी तैवानचा दौरा केला. त्याला चीनने जोरदार आक्षेप घेत, तैवानच्या सामुद्रधुनीत युद्ध नौका, हवाईदल पाठवून युद्धसदृश कवायती केल्या. त्यानंतर अमेरिकन सिनेटर्सच्या एका शिष्टमंडळाने तैपेईला भेट दिली. त्यामुळे चीनचे पित्त आणखीच खवळले आहे. तथापि, शी जिनपिंग यांनी तैवानविषयीचे धोरण जाहीर करताना 'शांतिपूर्ण पुनर्एकीकरण (पीसफुल रियुनिफिकेशन)' हे शब्द वापरले. त्याचवेळी "हे उद्दिष्ट साध्य (सहजासहजी साध्य न झाल्यास) करण्यासाठी वेळ आली, तर सैन्याचा वापरही केला जाईल," असा इशाराही दिला.

**आमची लोकशाही वाचविण्यासाठी आम्ही सारे सामर्थ्य पणाला लावू**

आज तैवान सेमिकण्डक्टरच्या उत्पादन क्षेत्रातील जगातील सर्वांत आघाडीचा देश असून, तेथे पूर्णपणे लोकशाही आहे. कट्टर लोकशाहीवादी नेत्या त्साई इंगवेन या तैवानच्या अध्यक्ष आहेत.

## भात व पेजेवर तो दिवस काढत होता

"शी जिनपिंग यांचा विस्तारवादी चीन आणि भारत, चढती कमान... वाढते तणाव" हे माझे चीनवरील पुस्तक लिहिण्यासाठी मी संदर्भसंशोधन करीत असताना त्यांच्या बालपणाची उद्बोधक माहिती हाती आली, ती अशी. "बालवयातील जिनपिंग यास लिहांगजिहाये गावात गावकऱ्यांबरोबर काम करण्यासाठी रवाना करण्यात आलं. त्याआधी माओ समर्थकांनी त्याच्या घरावर हल्ला केला. त्यात त्याची बहीण शी हेपिंग हिचा मृत्यू झाला. बाल जिनपिंग याची आई शिन हिच्यावर दबाब आणून शी हा आपला 'मुलगा नाही,' असं तिला जाहीर करावयास लावण्यात आलं. जिनपिंग याची धिंड काढून तो क्रांतिविरोधी आहे, असाही आरोप करण्यात आला होता. तब्बल सात वर्षे तो गुहेत राहत होता. पंधरा वर्षांचा असताना त्याच्या वडिलांना अटक करून तुरुंगात टाकण्यात आलं होतं. त्या प्रतिकूल परिस्थितीतही लियांगजिहाये गावात मन लावून केलेल्या कामामुळं गावातील लोक शी वर खूश होते. दैनंदिन खर्चासाठी पैसे मिळत नव्हते. विहिरीतून पाणी आणायचं, हे रोजचंच ठरलेलं. भात व पेजेवर तो दिवस काढत होता. सात वर्षांनंतर त्यानं बीजिंगमधील त्सिंगहुआ विद्यापीठातील रसायन तंत्रज्ञान शिक्षणक्रमात प्रवेश घेतला. हे विद्यापीठ चीनमधील सरकारी नोकरशहांच्या व उच्चभ्रूंच्या शिक्षणासाठी नावाजलेलं आहे. विद्यापीठात असताना व नंतर अनेक वर्षे जिनपिंग यानं कम्युनिस्ट पक्षात प्रवेशासाठी प्रयत्न केले; परंतु प्रत्येक वेळी त्याला विरोध होऊन अपयश येत होतं. याचं कारण, वडील झाँगशुन यांचे कम्युनिस्ट पक्षाबरोबर असलेले तीव्र मतभेद व दुराग्रहामुळं होणारा विरोध." एका मुलाखतीत बोलताना पूर्वायुष्यात झालेल्या कारवाया व अटका याबाबत शी म्हणाले, "सारं भावोत्कट होतं, त्या काळात तशी मनःस्थिती होती; पण सांस्कृतिक क्रांतीची उद्दिष्टं साध्य न झाल्यानं सारंच एक दिवास्वप्न ठरलं." अखेर १९७४ मध्ये शी जिनपिंगला पक्षाने प्रवेश दिला. ही माहिती इथे देण्याचे कारण, ते कोणत्या परिस्थितीचा सामना करीत सर्वोच्च पदावर पोहोचले, हे दाखविणे होय.




ज्या-ज्या वेळी चीन धमक्या देतो, त्या-त्या वेळी ''आमची लोकशाही वाचविण्यासाठी आम्ही सारे सामर्थ्य पणाला लावू,'' असा इशारा त्या देतात. त्यामुळे चीनपुढे पर्याय उरतो, तो तेथे चीनधार्जिण्या सरकारला आणणे व शांततामय एकत्रीकरण घडवून आणणे. गेल्या अनेक वर्षांत चीनला ते शक्य झालेले नाही. तैवानला अमेरिकेच्या सुरक्षेचे छत्र आहे, हे त्याचे दुसरे कारण. तैवानी कंपन्यांनी चीनमध्ये अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. त्यामुळे युद्ध करून प्रश्न सुटणार नाही. उलट सामोपचाराने पावले टाकावी लागतील. गेल्या वर्षापर्यंत 'चीन २०२७ पर्यंत तैवानला काबीज करणार', असे म्हटले जात होते; परंतु ''ते उद्दिष्ट चीनच्या स्वातंत्र्याला शंभर वर्षे पूर्ण होतील त्या २०४९ पर्यंत गाठायचे,'' असा नवा सूर आहे.

भारताला खटकणारी गोष्ट म्हणजे, २०२० मध्ये गलवानच्या चकमकीत जखमी झालेल्या ची फाबाओ या पीएलएच्या कमांडरची अधिवेशनातील उपस्थिती. भारतीय व चिनी सैन्यादरम्यान झालेल्या चकमकींची चित्रफीतही भव्य स्क्रीनवर दाखविण्यात आली. शी यांनी भारताचा थेट उल्लेख करण्याचे टाळले, त्याचबरोबर चीनच्या सैन्याचा दर्जा जगातील सर्वोत्कृष्ट सैन्य म्हणून करण्याचा निर्धार व्यक्त केला.

**साम्यवादी राष्ट्रांपैकी चीनएवढी प्रगती कुणीही करू शकलेले नाही**

डेंग झाव पिंग यांच्या काळात सुरू झालेल्या आर्थिक सुधारणांनंतर गेल्या चाळीस एक वर्षांत चीनची झालेली नेत्रदीपक प्रगती पाहता चीनच्या नेत्यांना चीनचा साम्यवाद कसा आदर्श आहे, हे जगाला दाखवून देणेही शक्य होत आहे. या साम्यवादाला ते ''सोशलिस्ट सिस्टीम विथ चायनीज कॅरॅक्टरीस्टिक्स,'' असे म्हणतात. याचाही उल्लेख शी जिनपिंग यांनी भाषणात केला. जगातील अन्य साम्यवादी राष्ट्रांकडे पाहिल्यास रशिया, व्हेनेज्युएला, क्युबा, उत्तर कोरिया, व्हिएतनाम व लाओस या साम्यवादी राष्ट्रांपैकी चीनएवढी प्रगती कुणीही करू शकलेले नाही. प्रत्यक्षात चीनच्या साम्यवादाचा

## 'बेल्ट अँड रोड' हा प्रकल्प म्हणजे चीनचा सापळा

रशियाने जसे युक्रेनमधून प्रथम क्रिमिया गिळंकृत केला व आता युक्रेनवर युद्ध लादून आणखी चार प्रांत गिळंकृत केले, तसे तैवानबाबत चीन करण्याची शक्यता नाही. हे चीनला परवडणारे नाही. चीन हा अमेरिकेची बरोबरी करू पाहणारा देश. तरीही, तो अमेरिकेइतका बलाढ्य नाही. तथापि, आपले प्रभावक्षेत्र वाढविण्याचा प्रयत्न शी जिनपिंग सत्तेवर आल्यापासून चीनने वेगाने चालविला असून, त्याचाच एक भाग म्हणून दक्षिण चिनी समुद्रावर चीनने सांगितलेला हक्क व त्यातील डझनभर बेटांचे चाललेले सशस्त्रीकरण, हे होय. याचा आणखी एक भाग म्हणून चीनने 'बेल्ट अँड रोड' प्रकल्प राबविण्याच्या उद्देशाने केलेली अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक व त्यात भाग घेण्यास पुढे आलले सत्तर देश. यावरून चीनच्या प्रभावाची कल्पना येते. पाश्चात्त्य देशांनी ''हा प्रकल्प म्हणजे, चीनचा सापळा'' असे वर्णन केले आहे. तो आरोप खोडून काढण्यासाठी अलीकडे चीनने काही देशांना कर्जमाफीही जाहीर केली आहे. या प्रकल्पामागचा चीनचा उद्देश आहे, तो जगाची बाजारपेठ काबीज करण्याचा.



स्वीकार करण्यासाठी कोणतेही राष्ट्र पुढे आलेले नाही, की चीनने आपल्या साम्यवादाचे रोपण अन्य देशात करण्याचा प्रयत्न केलेला नाही. या उलट, लोकशाहीचे रोपण करण्यासाठी अमेरिकेने इराक, लिबिया, अफगाणिस्तान आदी राष्ट्रांवर हल्ले करून तेथे राजकीय परिवर्तन घडवून आणण्याचा केलेला प्रयत्न सपशेल फसला आहे. पेट्रोलियम, नागरी विकास खात्याचे केंद्रीय मंत्री व भारताचे राष्ट्रसंघातील माजी कायमचे प्रतिनिधी हरदीप सिंग पुरी यांनी अमेरिकेचे 'इंटरव्हेन्शनिस्ट पॉवर' असे वर्णन केले आहे.

**अब्जाधीशांच्या संपत्तीनिर्मितीवर सरकारचा अंकुश**

शी जिनपिंग यांच्या भाषणातील चौथा महत्त्वाचा मुद्दा होता, तो भ्रष्टाचाराचे निर्मूलन करून समाजात समान प्रगती साधण्याचा. चीनमध्ये 'भांडवलशाही साम्यवाद आहे,' असे वारंवार म्हटले जाते. साम्यवाद असूनही अमेरिकेतील अब्जाधीशांची बरोबरी करणारे जॅक मा, लुओ लिगुओ, वेई जियानजुन, लियू हानयुआन, चेन बेंग, रिचर्ड लियूसारखे अब्जाधीश तेथे आहेत. परिणामतः एकीकडे अब्जाधीशांची संख्या व संपत्ती वाढतेय व दुसरीकडे गरिबी, असे विषम चित्र असल्याने त्यातून निर्माण होणारा असंतोष थोपविण्यासाठी व त्यांना सामाजिक जबाबदारी कळावी, यासाठी शी जिनपिंग सरकारने त्यांच्यावर काही निर्बंध घातले. अर्थात, तसे केल्याने समाजातील आर्थिक दरी वेगाने संपेल, अशी शक्यता नाही; परंतु अब्जाधीशांच्या संपत्तीनिर्मितीवर सरकार अंकुश ठेवत आहे, अशी भावना जनतेत निर्माण झाली आहे व ती सरकारला अनुकूल आहे.

चीनच्या राजकीय व आर्थिक धोरणाचे एक सूत्र



आहे. ते म्हणजे, जनतेला अप्रत्यक्षरीत्या असे सांगितले जाते, की तुम्हाला हवे ते चांगली राहणी, उत्तम रस्ते, शिक्षणाच्या व नोकरीच्या असंख्य संधी, व्यवसायांना अनुकूल वातावरण, उत्तमोत्तम वस्तू व अमेरिकन मॉल कल्चर, हे सारे काही सरकार देईल. त्या बदल्यात एकच अट आहे, की कुणीही कम्युनिस्ट पक्षाच्या राजकारणात, धोरण अंमलबजावणीत ढवळाढवळ करायची नाही, की त्याला विरोध करायचा नाही. तो करण्याचा प्रयत्न जो करील, त्याची धरपकड, तुरुंगवास ठरलेला. त्यामुळे आपण बरे आणि आपले कुटुंब बरे, ही भावना जनतेत रुजविण्याचा प्रयत्न सरकार करीत आले आहे. सोबतीला चीनचा प्रखर राष्ट्रवाद आहे.

**भ्रष्टाचारविरोधी मोहीमेचा विरोधकांनाही जोरदार फटका**

दरम्यान, गेल्या वर्षी चीनने जाहीर केले, की १९७८ ते २०२२ या काळात चीनमधील ७ कोटी ७७ लाख लोकांना दारिद्र्यातून वर काढले. शी जिनपिंग यांनी सत्तेवर येताच जोरदार भ्रष्टाचारविरोधी मोहीम हाती घेतली. चीनच्या कम्युनिस्ट पक्षानुसार, गेल्या दशकात तब्बल पन्नास लाख पक्षसदस्यांची भ्रष्टाचारासंदर्भात चौकशी करण्यात आली. त्यापैकी ५५३ लोकांविरुद्ध खटले भरण्यात आले. शिस्त व पाहणी समितीचे प्रमुख शाओ पेई यांनी पत्रकारांना सांगितले, की पक्षाच्या २ लाख ७ हजार सदस्यांना शिक्षा करण्यात आली. त्या मोहिमेत सुमारे एक लाख लोकांवर कारवाई करण्यात आली. ८० हजार पक्षसदस्यांनी आपल्या हातून नियमांचे उल्लंघन झाल्याचे गेल्या पाच वर्षांत कबूल केले. पक्षातून हाकलून देणे, तुरुंगात टाकणे आदी शिक्षा ठोठावल्या जातात. १२० उच्चाधिकारी, बारा ते तेरा उच्च सेनाधिकारी, सरकारी कंपन्यांतील अनेक अधिकारी व पाच राजकीय नेत्यांविरुद्ध कारवाई करण्यात आली. परिणामतः त्यांची प्रतिमा 'कठोर; परंतु जनतेला दिलासा देणारा नेता' अशी झाली आहे. नजीकच्या भविष्यात त्यांच्याविरुद्ध कट करण्याचे धाडस कुणी करू शकणार नाही. या मोहिमेचा शींच्या विरोधकांनाही जोरदार फटका बसलाय. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध बंड करणे त्यांना शक्य नाही.

ते अलीकडे उझबेकिस्तानमधील समरकंद या शहरात झालेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेहून परतल्यावर काही दिवस जनतेसमोर न आल्याने त्यांच्याविरुद्ध बंड झाल्याची बातमी जगभर पसरली. त्यांचे जनतेसमोर न जाण्याचे खरे कारण होते, त्यांनीच घालून दिलेल्या नियमाचे. त्या नियमानुसार, परदेशातून आलेल्या व्यक्तीला किमान काही दिवस कॉरंटाइन करणे आवश्यक होते. त्यामुळे त्यांनी स्वतःला कॉरंटाइन केले होते. ते संपल्यावर ते पुन्हा काम करू लागले व बातमी एकदम लुप्त झाली.

**...म्हणूनच 'झीरो कोविड' हे धोरण कायम ठेवण्यात आले**

चीनच्या अर्थव्यवस्थेकडे पाहता, राष्ट्राध्यक्ष जियांग झमीन व हू जिंताव यांच्या कारकीर्दीत चीनची घोडदौड झाली. सकल राष्ट्रीय उत्पन्नाचा वेग १० पेक्षा अधिक टक्क्यांवर जाऊन पोहोचला. त्याला एकाएकी ब्रेक लागला तो शी जिनपिंग यांच्या गेल्या पाच वर्षांच्या कारकीर्दीत. त्याचे प्रमुख कारण, कोरोना साथीचा चीनमधून झालेला उगम व त्याची जगात पसरलेली साथ. चीनच्या लोकसंख्येकडे पाहता, आज पुन्हा कोरोनाची साथ पसरली, तर तिला हाताळण्यासाठी चीनमध्ये पुरेशी रुग्णालये, लस व अद्ययावत यंत्रणा



यांची व्यवस्था नाही, ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच 'झीरो कोविड' हे धोरण कायम ठेवण्यात आले आहे. शी जिनपिंग यांच्यासह हान झेंग, ली झानशू, ली कशांग, वांग यांग, वांग हुनिंग व झाव लेजी हे सहा उच्चपदस्थ नेते आहेत. ली कशांग हे पंतप्रधान आहेत. २० व्या कॉंग्रेस अधिवेशनानंतर शी जिनपिंग त्यात फेरबदल करतील, काहींना जावे लागेल, तर काहींना मुदतवाढ मिळेल.

शी जिनपिंग यांच्यापुढे आव्हान आहे, ते चीनची विभागीय विषमता कमी करण्याचे, चीनची एकसंधता टिकवून ठेवण्याचे, अमेरिकेची बरोबरी करून महासत्ता होण्याचे व जागतिक राजकारणात व्यूहात्मक स्थान निर्माण करण्याचे. चीनच्या ३१ प्रांतांपैकी शांघाय, बीजिंग, झेझियांग, तियानजीन या प्रांतांत व शेंझेन, चेंगडू, ग्वांगझाव, शियान, चोंचिंग आदी शहरांतून जी सुबत्ता दिसते, तशी सिचुआन, युनान, चिंघाय, शिंजियांग आदी प्रांतांत पाहावयास मिळत नाही. त्यांचा विकास करून त्यांना सधन प्रांतांच्या बरोबरीला आणण्यास काही वर्षे लागतील. चीन मानवाधिकारांची फारशी चिंता करीत नाही. त्यामुळे, लोकशाहीतील या बाबतच्या अनेक अडचणी, चौकशा यांना सरकारला सामोरे जावे लागत नाही. सरकारला हवी तशी न्यायपालिका, पोलीस शासन व लष्कर असल्याने शी जिनपिंग यांना व त्या आधीच्या अध्यक्षांना शासन व राजकारण करणे शक्य झाले आहे.

सारांश, या अधिवेशनाने चीनची एकसंधता पुन्हा एकदा सिद्ध झाली असून, शी जिनपिंग हे सर्वेसर्वा असले, तरी चीनचा साम्यवाद भविष्यातही सामूहिक नेतृत्वाला बरोबर घेऊन वाटचाल करणार, असे दिसते.

**(लेखक दिल्लीस्थित ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**

# छोटा बच्चा जान के न कोई आंख दिखाना रे



संजय पवार

**केजरीवाल शाळा, दवाखाने या रचनात्मक कामातून व मोफत वीज व पाणी या नव्या नागरी सुविधांकडून चलनावर सरस्वती व गणेश प्रतिमा छापून त्यातून ढासळत्या अर्थव्यवस्थेला थेट देवांचा आशीर्वाद घेण्याची अर्थनिरक्षर, अवैज्ञानिक मागणी करतात, तेव्हा ते स्वत:ला मिळालेली छोटा मोदी ही उपाधी अधिक वास्तववादी करत नेताहेत! आप वा केजरीवाल हा नक्की कशाचा व कुणाला पर्याय याचा विचार काँग्रेस, भाजपला विटलेल्या व आपकडे आत्कृष्ट होत असलेल्या भारतीयांनी विवेकाने करावा; अन्यथा मोदींच्या तुलनेत हा छोटा मोदी अवघड जागचे दुखणे होऊन बसायचा.**

आम आदमी पार्टीचे सर्वेसर्वा आणि दिल्लीचे दुबार-तिबार मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे राजकारणात येण्याआधी आयआयटी शिक्षित व भारतीय प्रशासनाच्या रेव्हेन्यू किंवा तत्सम खात्यात सरकारी सेवेत होते. त्यांच्या याच पार्श्वभूमीची भुरळ तमाम भारतीयांना २०१३ साली भ्रष्टाचारमुक्त भारतासाठी जे आंदोलन उभारले, सिव्हिल सोसायटी, नागरिकांची सनद, लोकपाल आदी गोष्टी सार्वजनिक चर्चेत आणल्या तेव्हा जी पडली, ती नंतर त्यांनी राजकीय पक्ष स्थापन केल्यावर काहीशी कमी झाली. गडी मळवाटेने निघाला असे म्हणत अनेक स्वयंसेवी बाजूला झाले; पण रामलीला मैदानावर त्यावेळी जमलेल्या वा जमवलेल्यात राजकीय महत्त्वाकांक्षा असलेलेही बरेच होते, तसेच आणीबाणीविरोधात लढल्यावर, जनता पार्टी स्थापन झाल्यावर महाराष्ट्रात जशी युक्रांदमध्ये संसदीय की बिगर संसदीय, असा वाद झाला, तसाच केजरीवालांनी राजकीय पक्ष काढल्यावरही झाला. जनता पार्टीच्या वेळी जयप्रकाश नारायण होते. केजरीवालांनी अण्णा हजारेंना नॅशनल हीरो केले; पण त्यांच्या धूर्त बुद्धीने अण्णा म्हणजे जयप्रकाश नव्हेत, हे ओळखले होते. त्यामुळे राजकीय पक्षाचा प्रस्ताव अण्णांनी फेटाळताच केजरीवाल पडत्या फळाची आज्ञा घेऊन दिल्लीला गेले ते राळेगणसिद्धीसह अण्णांनापण विस्मृतीत टाकूनच आले. अण्णांचा नकार हा केजरीवालांना अपेक्षित होता व तो त्यांना उपकारकच ठरणार होता. त्यामुळे त्यांनी आग्रह वगैरेही केला नाही!

**मोदींनी अण्णांच्या पत्रांची पोचही दिली नाही**

जनता पार्टीत जी उपेक्षा जयप्रकाशजींची झाली त्यापेक्षा अधिक केजरीवालांच्या नव्या पक्षात अण्णांची झाली असती. अर्थात, २०१३ साली सेकंदाला ५५ उपोषणे वा धमक्या देणारे अण्णा २०१४ नंतर जे सायलेंट मोडवर गेलेत ते अजून तसेच आहेत. मोदींनी पत्रांची पोचही दिली नाही. अशा मुळूमुळू तक्रारीपलीकडे काहीही केलेले नाही. राज्यात सत्तांतरे झाली, दलबदल ते खोके मिरवले गेले. वाढती महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांचे हाल, अस्मानी संकटे, मंत्री, आमदार यांची भ्रष्ट प्रकरणे, स्त्रियांचे शोषण, शेकड्यांनी प्रश्न आणि सरकारी व राजकीय असंवेदना पसरलीय; पण राळेगणसिद्धीच्या यादवबाबा मंदिरातील संत मौनात आहे. असो.

तर अण्णांचे बोट सोडून थेट राजकीय पक्ष स्थापून दिल्लीत मुख्यमंत्री झालेल्या अरविंद केजरीवाल यांनी रामलीला मैदानावरच्या बहुतांश पहिल्या फळीला चाणाक्षपणे बाजूला करून ते स्वत: स्वयंसेवकांचे राजकारणी व जनआंदोलनाचा राजकीय पक्ष करून मोकळे झाले. अण्णा आंदोलनात बॅक बेंचर राहिलेले केजरीवाल आज एक राजकीय पक्ष स्थापून दोन राज्यांत सत्ता मिळवून, हळूहळू इतर राज्यांत पक्ष विस्ताराचा प्रयत्न करताहेत आणि त्या वेळचे स्टेजवरचे मोहरे किरण बेदी, प्रशांत भूषण, योगेंद्र यादव यांच्यासह अण्णा आज कुठे व कसे आहेत, हे आपण पाहतोच आहोत.

**केजरीवालांनी बिगर संसदीय आंदोलनातून केली जनआंदोलनाची शिडी तयार**

संसदीय लोकशाहीत सर्व प्रश्न सभागृहातच सोडवता येतात, कायदे बदलता वा करता येतात. तेव्हा बिगर संसदीय आंदोलने जनसंघटनाद्वारे करून राजकीय पक्षांवर अंकुश ठेवायचा, की थेट संसदीय राजकारणात राजकीय पक्ष म्हणून उतरायचे? ही महाचर्चा ७७ सालीच होऊन गेली. तरीही केजरीवालांनी २०१३ साली बिगर संसदीय आंदोलन उभे करून जनआंदोलनाची शिडी तयार केली व इतर आंदोलनकारींना राजकीय पक्षाच्या निर्मितीची गरज सांगत आपला अजेंडा रेटला. यात अण्णांसारखे काही अपवाद वगळता अनेक जण आपमध्ये आले; पण जनआंदोलनातील संघटनांतर्गत

लोकशाही राजकीय पक्षात चालणार नाही, हे केजरीवालांनी पक्ष स्थापताच ओळखले व मोदींच्या भाषेतील आंदोलनजीवी जनसंघटनावाद्यांची पक्षात कोंडी करत त्यांना पक्षाबाहेर पडावे, अशी परिस्थिती पक्षातच तयार केली.

दिल्लीत आप सर्वाधिक आमदार असलेला पक्ष झाला. मग काँग्रेसच्याच पाठिंब्यावर सरकार, त्यात सरकार म्हणून सतत रस्त्यावर येणे वगैरे प्रकारांतून बरखास्ती ओढवून घेतल्यावर केजरीवाल पठारावर आले व पुढील दोन निवडणुकांत आपल्यातील जनसंघटनवाला स्वयंसेवक बाजूला ठेवत राजकीय नेतृत्वाला आवश्यक असा राजकारणी घडवत ते आज राष्ट्रीय माध्यमात अशा प्रकारे चर्चेत राहताहेत, की इतर राजकीय पक्ष, राजकीय विश्लेषक, भाष्यकार ते त्यांचे थेट टीकाकार त्यांना छोटा मोदी संबोधू लागलेत! आपल्याला छोटा मोदी म्हटले जातेय यावर केजरीवाल काहीच म्हणत नाहीत. कदाचित मोदींनंतर वा मोदी नाही तर मग कोण? या प्रश्नाचे परस्पर उत्तर या प्रतिमेतून जनतेत जात असेल तर उत्तमच!

केजरीवालही संघाप्रमाणे पुढील पाच ते पंचवीस वर्षांचा अजेंडा ठरवताहेत असे दिसते. मोदी काँग्रेसमुक्त भारताची घोषणा करत सलग दोनदा पंतप्रधान झाले. त्याच तालावर काँग्रेस हा मत पक्ष आहे, त्यावर प्रश्न विचारून वेळ घालवू नका, असे हसतहसत केजरीवाल पत्रकार परिषदा अथवा छोट्या सभांत सांगतात. दिल्लीत दोनदा व अलीकडेच पंजाबात काँग्रेसला संपवत मोदींप्रमाणेच काँग्रेसच्या अखिल भारतीय अस्तित्वाला संपवत भविष्यात ती जागा व्यापण्याचा केजरीवालांचा दीर्घकालीन कार्यक्रम दिसतो. भाजपला भविष्यात राष्ट्रीय पर्याय बनण्याचे केजरीवालांचे धोरण संघ, भाजपच्या काँग्रेसमुक्त भारताच्या ब्ल्यू प्रिंटवरूनच उचललेय.

आजघडीला भाजपला सामोरे जाण्याइतपत राष्ट्रीय अस्तित्व केवळ काँग्रेसकडे आहे.जेव्हा भाजपविरोधात एखाद्या आघाडीची चर्चा सुरू होते वा बैठका सुरू होतात, तेव्हा नितीशकुमार, ममता बॅनर्जी, शरद पवार, केसीआर, स्टॅलिन, मायावती, अखिलेश यादव, अशी बरीच नावे चर्चेत येतात. केजरीवाल अशा प्रयत्नांपासून दूर राहतात. कारण त्यांची महत्त्वाकांक्षाच इतकी मोठी आहे, की त्यांना अनेकांतील एक बनण्यापेक्षा मोदींप्रमाणे एकमेव बनायचे आहे! आणि त्यांना तशी घाई नाहीए!

**...तर संघाने समतेला समरसता**
**व आदिवासींना वनवासी म्हणायचे!**

याच घटनाक्रमात दिल्ली दंगल, भाजपची भडकावू भाषणे, एनसीआरविरोधी आंदोलन वा किसान आंदोलन यापासून केजरीवाल कोसो दूर राहतात! ते जेएनयू वा अर्बन नक्सलवर ब्र काढत नाहीत! याउलट दिल्लीत विजय मिळाल्याबरोबर हनुमानदर्शन, चालिसा पठण व आता नोटेवर गणेश व सरस्वती प्रतिमेची मागणी! केजरीवालांनी वस्ती क्लिनिकला मोहल्ला क्लिनिक संबोधायचे, तर संघाने समतेला समरसता व आदिवासींना वनवासी म्हणायचे!

संघप्रमुख मुस्लिमांच्या कार्यक्रमात जातात व डीएनएबद्दल बोलतात. संघ भाजप सावरकर विवेकानंदांबद्दल बोलत असताना केजरीवाल सरकारी कार्यालयात भगतसिंह, आंबेडकरांच्या प्रतिमा लावून हळूच संघाने उशिरा प्रात:स्मरणीय केलेले गांधी कोपऱ्यात

## हा अनेकदा नुरा कुस्तीचा प्रकार वाटतो!

ज्या जनआंदोलनातून केजरीवाल देशाला माहीत झाले त्या आंदोलनातील संघ व भाजपचा छुपा हात सर्वसामान्यांना दिसला नाही तरी राजकीय पक्ष व विश्लेषकांना तो दिसलाच! आश्चर्य एकच वाटते तत्कालीन केंद्र सरकार, त्यांच्या यंत्रणांना हे संयोजन कळले नाही, की त्यातीलच अनेक त्यांना सामील होते? तेव्हाचा कॅगचा अहवाल, ज्यावर हे आंदोलन मोठे केले गेले, तो अहवालच नंतर फुसका बार ठरला! त्यामुळे मोदींप्रमाणेच आपले नेतृत्व, पक्ष व पक्षांतर्गत एकहाती पकड हे केजरीवाल हुबेहूब मोदींप्रमाणे गिरवताहेत. यात त्यांना हवा तसा अमित शहा मिळालेला नाही. मात्र, सिसोदियांची वाढती स्वच्छ प्रतिमा व कामांची प्रसिद्धी याचे कौतुक करतानाच केजरीवाल सिसोदियांवरच्या आरोपांविरुद्ध आंदोलन छेडतात तेव्हा त्यांना सिसोदियांना न्याय द्यायचाय, की त्यांची प्रतिमा गढूळ करून आपल्यात व त्यांच्यात १ ते १० चे अंतर ठेवायचेय? हाच प्रयोग अडवाणींवर वाजपेयींनी केला, हे आपण पाहिलेच आहे!

आज भाजप केजरीवाल व आपवर जो काही आरोपांचा व चौकशांचा ससेमिरा लावते तो अनेकदा नुरा कुस्तीचा प्रकार वाटतो; अन्यथा दिल्लीत सातच्या सात खासदार निवडून आणणारा भाजप दिल्ली विधानसभेत सपाटून मार खातो? हरीयाणात सत्ताधीश भाजप, पंजाबात पूर्वी अकाली दलासोबत राहूनही काँग्रेसला पर्याय न होता तिथे आप हा एक राज्य चालवणारा छोटा पक्ष सत्तेत येतो?

सरकवतात! संघप्रमुख ब्राह्मणांनी पापक्षालन करावे म्हणतात आणि त्यापाठोपाठ केजरीवाल ब्राह्मणी आस्थेच्या गणेश व सरस्वतीच्या प्रतिमांची थेट चलनावर प्रतिष्ठापनेची मागणी पंतप्रधानांकडे करतात. भिंतीवर भगतसिंह व आंबेडकर लावून केजरीवाल बौद्ध धर्म स्वीकारणाऱ्या व तो स्वीकारताना बाबासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा घेणाऱ्या दलित मंत्र्याची हकालपट्टी करतात! केजरीवाल या सर्व घटनाक्रमातून संघ भाजपने भारतीय संसदीय लोकशाहीत संविधानासह वा त्याला दूर सारत हिंदुराष्ट्राची मुहूर्तमेढ रोवलीच, तर त्यावर कळस चढवायचे काम करायला मी आहे हे संघ, भाजपसह देशातल्या बहुसंख्याकांना सांगायचा प्रयत्न करताहेत?

सत्तरच्या दशकात डावे, समाजवादी आपल्या जनसंघटनाद्वारे संघर्षात्मक काम उभे करून लढून लोकांना न्याय्य हक्क मिळवायला मदत करत होते, तयार करत होते. त्याच काळात संघपरिवार त्यांच्या जनसंघटनाद्वारे रचनात्मक कामाच्या नावाखाली आदिवासींना वनवासी संबोधत, शबरी, एकलव्य ही प्रतीके वापरत व पाड्यांवर मंदिर उभारत आदिवासी मुला-मुलींची जमात वैशिष्ट्य असलेली नावे बदलून त्यांना सुबोध हिंदू नावे देत असत!

केजरीवाल शाळा, दवाखाने या रचनात्मक कामातून व मोफत



वीज व पाणी या नव्या नागरी सुविधांकडून चलनावर सरस्वती व गणेश प्रतिमा छापून त्यातून ढासळत्या अर्थव्यवस्थेला थेट देवांचा आशीर्वाद घेण्याची अर्थनिरक्षर, अवैज्ञानिक मागणी करतात, तेव्हा ते स्वत:ला मिळालेली छोटा मोदी ही उपाधी अधिक वास्तववादी करत नेताहेत!

आप वा केजरीवाल हा नक्की कशाचा व कुणाला पर्याय याचा विचार काँग्रेस, भाजपला विटलेल्या व आपकडे आत्कृष्ट होत असलेल्या भारतीयांनी विवेकाने करावा; अन्यथा मोदींच्या तुलनेत हा छोटा मोदी अवघड जागचे दुखणे होऊन बसायचा.

**(लेखक ज्येष्ठ नाटककार व विचारवंत आहेत.)**

# केजरीवालांचा भूलभुलैया



बी.व्ही. जोंधळे

**देशात आज दारिद्र्य-बेकारी-महागाईने कहर केला आहे. कोरोनाकाळात अर्थव्यवस्था पार कोलमडून पडली आहे. अनेकांना रोजी-रोटी, काम-धंदा, नोकरीला मुकावे लागले आहे. शेतकरी आत्महत्या करीत आहेत, अतिवृष्टीमुळे सर्वत्र ओला दुष्काळ पडला आहे, दलित-महिलांवरील अत्याचार वाढले आहेत. या लोकजीवनाच्या प्रश्नांना न भिडता उच्चशिक्षित अरविंद केजरीवाल मतांच्या बेगमीसाठी भोंदूगिरीचे सवंग राजकारण करीत आहेत, ते लोकहिताचे नाही.**

भारतीय राजकारणाचा स्तर आता इतका हिणकस आणि खालच्या पातळीवर घसरला आहे, की सत्तेसाठी राजकारण्यांना कमरेचे सोडून डोक्याला गुंडाळताना कसलीही लाज लज्जा, शरम वाटेनाशी झाली आहे. सत्ताप्राप्तीसाठी लोकांच्या जीवन-मरणाच्या प्रश्नांचे भांडवल करावयाचे, अन्न-वस्त्र-निवाऱ्याच्या बाता करायच्या-बेकारी-दारिद्र्य हटविणाऱ्या खोट्या वल्गना करायच्या, राज्यघटनेच्या पावित्र्याच्या शपथा घ्यायच्या आणि एकदा सत्तेवर आले, की लोकांच्या जीवन-मरणाच्या बुनियादी प्रश्नांचे भांडवल कामी येत नाही, हे लक्षात येताच लोकांच्या भावनांना हात घालणारे जाती-धर्माचे राजकारण करून देशात फूट पाडायची व आपला सत्तासोपानाचा स्वार्थ साधून घ्यायचा. यात आपण काही तरी चूक करीत आहोत, असे आजच्या विद्यमान राजकारण्यांना वाटत नाही. यासारखी चीड आणणारी दुसरी बाब ती काय असू शकेल? आता हेच पाहाना- दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी अन्न-वस्त्र-निवारा-शिक्षण आदी लोकांच्या प्रश्नांचा गजर करीत दिल्लीत सत्ता मिळवली; पण आता गुजरातमध्ये होऊ घातलेल्या विधानसभेच्या निवडणुकीत भाजपच्या धर्माधिष्ठित राजकारणाचा मुकाबला करून सत्ता मिळवायची, तर लोकांच्या प्रश्नांना भिडण्यापेक्षा धर्माचा आधार घेऊन निवडणूक लढवावी, असा त्यांनी चंग बांधला व या धर्माधिष्ठित राजकारणाचा अवलंब करताना भारतीय चलनावर देवदेवतांचे फोटो छापले पाहिजेत, असा महान विचार बोलून दाखविला. गणपती आणि लक्ष्मीचे फोटो चलनावर छापले, तर देशातील दारिद्र्य दूर होईल, अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी देवांचे आशीर्वाद मिळतील, आपला रुपया डॉलरच्या स्पर्धेत उतरेल, असे तारे त्यांनी तोडले. आहे की नाही कमालच कमाल?



**गुजराती मतदारांना भुलविण्यासाठी!**

अरविंद केजरीवाल चांगले उच्चविद्याविभूषित आहेत. देशाने धर्मनिरपेक्ष संविधानाचा अंगीकार केलेला आहे. धर्माधिष्ठित राजकारण भारतीय राज्यघटनेला मान्य नाही. सर्व धर्मांचा आदर करावा; पण राज्यकारभार धर्मापासून मुक्त असावा, असे आपले संविधान सांगते. हे सत्य अरविंद केजरीवाल यांना माहीत नाही, असे नाही. नक्कीच माहीत आहे. अरविंद केजरीवालांसारखे उच्चशिक्षित हेसुद्धा चांगलेच जाणून आहेत, की भारतीय चलनावर कोणत्याही धर्माच्या देवदेवतांना बसविले, तरी देशातील गरिबी, महागाई, बेकारी हटणार नाही, तर लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी नियोजनबद्ध योजनांचाच अंगीकार करावा लागतो. तरीही केजरीवाल भारतीय चलनावर देवदेवतांचे फोटो छापण्याच्या बाता का करीत आहेत? का तर आगामी गुजरात विधानसभा निवडणुकीत भाजपच्या हिंदुत्ववादी राजकारणाशी स्पर्धा करून गुजराती मतदारांना भुलविण्यासाठी, हे उघड आहे.

**केजरीवालांचा भूलभुलैया त्यांच्याच अंगलट येण्याची दाट शक्यता**

अरविंद केजरीवाल गुजरातची आगामी लोकसभा निवडणूक नजरेसमोर ठेवून लोकांच्या देवभोळ्या

श्रद्धेला चुचकारण्याचे जे सवंग राजकारण आज करत आहेत, त्यात खरे तर नवे असे काहीही नाही. केजरीवाल यांनी प्रारंभी महात्मा गांधींचा वापर करून दिल्लीची सत्ता मिळवली. त्यानंतर त्यांनी गांधींना हटवून पंजाब विधानसभा निवडणुकीत शिखांची व दलितांची मते मिळविण्यासाठी शहीद भगतसिंग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो हाती घेतला. भगतसिंग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आणि अरविंद केजरीवालांचा तसा संबंधच काय? तसा जर तो असता, तर त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञांचा उच्चार केल्यामुळे त्यांच्या मंत्रिमंडळातील राजेंद्रपाल गौतम यांचा राजीनामाच घेतला नसता. अरविंद केजरीवालांना हे माहीत नाही काय, की बौद्ध धम्म स्वीकारणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर देव मानत नव्हते. मूर्तिपूजा नव्हे, तर विचारांचे ते पूजक होते. डॉ. बाबासाहेबांचे नाव घेऊन दलित मतदारांच्या भावनांना हात घालायचा व आपला कार्यभाग साधून झाल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वांना बाजूला सारायचे. हा जो किळसवाणा खेळ त्यांनी दिल्लीत खेळला, तोच खेळ गुजरातमध्ये हिंदूंची मते मिळविण्यासाठी ते आता खेळत आहेत. म्हणूनच देव-देवतांचा उमाळा त्यांना आता दाटून आला आहे; पण त्यांचा हा भूलभुलैया त्यांच्याच अंगलट येण्याची दाट शक्यता आहे.



**मतांच्या बेगमीसाठी भोंदूगिरीचे सवंग राजकारण**


अरविंद केजरीवाल यांना दिल्ली आणि पंजाबमध्ये मोठ्या प्रमाणात मतदान झाले, ते त्यांचे दिल्लीतील चांगले प्रशासन, उत्तम शाळा, आरोग्याच्या सुविधा, वीज, पाण्याची सोय यासाठी; पण आता सत्ता मिळविण्यासाठी यापुढे जाऊन महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शहीद भगतसिंग वा देवदेवतांचा सोयीनुसार ते जो वापर करीत आहेत, तो देश नि लोकहिताचा नक्कीच नाही. देशात आज दारिद्र्य-बेकारी-महागाईने कहर केला आहे. कोरोनाकाळात अर्थव्यवस्था पार कोलमडून पडली आहे. अनेकांना रोजी-रोटी, काम-धंदा, नोकरीला मुकावे लागले आहे. शेतकरी आत्महत्या करीत आहेत, अतिवृष्टीमुळे सर्वत्र ओला दुष्काळ पडला आहे, दलित-महिलांवरील अत्याचार वाढले आहेत. या लोकजीवनाच्या प्रश्नांना न भिडता उच्चशिक्षित अरविंद केजरीवाल मतांच्या बेगमीसाठी भोंदूगिरीचे सवंग राजकारण करीत आहेत, ते लोकहिताचे नाही, हे उघड आहे. तरीही मतांच्या सौदेबाजीसाठी केजरीवाल नको ते राजकारण खेळत आहेत; पण त्यांनी गुजरात विधानसभा निवडणुकीस सामोरे जाताना हे लक्षात घेतले पाहिजे, की गुजरातमधील १७५ जागांवर जे मतदान होणार आहे, त्या जागांवर गुजरातमधील उद्योगपतींची पकड आहे. हे सर्व उद्योगपती भाजपच्या पाठीशी धनशक्तीच्या रूपात उभे राहण्याचीच दाट शक्यता आहे. धनशक्तीत भाजपशी अरविंद केजरीवाल यांचा 'आम आदमी' पक्ष मुकाबला करू शकत नाही, हे उघड आहे. अशा स्थितीत लोकांच्या धार्मिक भवनांना हात घालून देवा-धर्माचे राजकारण केले, तर आपण विजयी होऊ. याशिवाय आपणाकडे निवडणुकीस सामोरे जाताना अन्य कोणता पर्यायच शिल्लक नाही, असे जर केजरीवाल यांना वाटत असेल, तर त्यांचा हा भूलभुलैया त्यांच्याच अंगलट येण्याची जास्त शक्यता आहे. तेव्हा 'तेलही गेले आणि तूपही गेले' अशी अवस्था येण्यापूर्वी अरविंद केजरीवाल यांनी लोकांच्या बुनियादी प्रश्नांवर निवडणूक लढविली, तर ते त्यांचे नेतृत्त्व व त्यांच्या पक्षाच्या भवितव्याच्या दृष्टीने इष्ट ठरेल; पण असे होणे नाही. कारण आज तरी केजरीवाल भोंदू राजकारणाच्या पूर्णपणे आहारी गेले आहेत. •••

## केजरीवाल सौम्य हिंदुत्वाच्या वाटेने जात आहेत

भाजपचे एक ठीक आहे. हिंदुत्व हाच त्यांच्या राजकारणाचा मूलाधार आहे. म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केदारनाथ, बद्रीनाथ, काशी विश्वनाथ, अयोध्या, मथुरेच्या दर्शनाला जाणे समजू शकते; पण भाजपच्या हिंदुत्ववादी राजकारणाशी स्पर्धा करताना सौम्य हिंदुत्वाचा अंगीकार केला, तर तो अंगलट येतो. याचा अनुभव काँग्रेसने २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत अनुभवला, हे कसे विसरता येईल? २०१९ च्या निवडणुकीत राहुल गांधींनी मंदिरांना भेटी दिल्या होत्या. आपण जानवेधारी दत्तात्रेयगोत्री ब्राह्मण आहोत, आपण शिवभक्त आहोत, असेही त्यांनी जाहीर केले होते; पण याचा फारसा लाभ तेव्हा काँग्रेसला झाला नाही. तरीही केजरीवाल भाजपच्या हिंदुत्ववादी राजकारणाशी स्पर्धा करताना काँग्रेसच्याच सौम्य हिंदुत्वाच्या वाटेने जात असल्यामुळे गुजरातमध्ये ते तोंडघशीच पडण्याची शक्यता अधिक आहे.

**(लेखक आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक आहेत.)**

## डॉ. रावसाहेब कसबे यांचे दुबईतील भाषण




# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विश्वव्यापी तत्वज्ञान

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विसाव्या शतकातील जागतिक कीर्तीचे एक महापुरुष होते. त्यामुळे जागतिक इतिहासात त्यांचे जीवन आणि कार्य ही एक महत्त्वाची ऐतिहासिक घटना होती. या घटनेला त्यांच्या जीवनकाळात फारसे महत्त्व दिले गेले नाही. कारण त्यांचा विचार केवळ भारतापुरताच सीमित ठेवला गेला होता; परंतु त्यांच्या तत्त्वज्ञानावर जसजसे संशोधन होऊ लागले, तसतशी त्यांची प्रतिमा वैश्विक बनली आणि आज त्यांची जयंती जगातील सर्व देशांत साजरी होऊ लागली आहे.

या ठिकाणी प्रश्न असा आहे की, महापुरुष कोणाला म्हणावे... त्याचे उत्तर आहे, 'महापुरुष ज्या युगाचा प्रतिनिधी असतो, त्या युगाची इच्छा काय आहे हे तो जनतेला समजावून सांगतो आणि ती इच्छा वास्तवात आणण्यासाठी जीवनभर कार्यरत असतो.' बाबासाहेब आंबेडकर त्यापैकी एक होते आणि त्यांच्या जीवनकार्याचा त्याच दृष्टिकोनातून विचार होणे आवश्यक आहे; परंतु या ठिकाणी एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवायला हवी की, महापुरुष ही एक असामान्य व्यक्ती असते हे खरे असले, तरी ती एकाच वेळी ऐतिहासिक प्रक्रियेचे अपत्य असते आणि आपल्या परिश्रमांनी ती इतिहासाची निर्मातीही असते. महापुरुष एकाच वेळी जगाचे स्वरूप व माणसांचे विचार यांच्यात बदल घडवून आणणाऱ्या सामाजिक शक्तींचा प्रतिनिधी व निर्माताही असतो. विसाव्या शतकात डॉ. आंबेडकरांनी या प्रकारच्या सामाजिक शक्तीला जन्माला घातले आणि तिचा विकास केला. आपण सर्व जण याच सामाजिक शक्तीची अपत्ये आहोत आणि देशोदेशी वास्तव्य करून आपले जीवन उन्नत आणि समृद्ध करीत आहोत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इतिहास शास्त्राला (Historicism) एक नवा सिद्धांत प्रदान केला. ते लिहितात की, 'History bears out the proposition that all political revolutions are preceded by religious and social revolution.' जगाचा इतिहास आपल्याला असे सांगतो की, जगातील सर्व राज्यक्रांतींचा पाया सामाजिक आणि धार्मिक क्रांती हाच असतो. ज्या राजकीय क्रांतीपूर्वी त्या समाजात धार्मिक चिकित्सा होत नसते, अंधश्रद्धांचा विचार होत नसतो, माणसांना कर्मकांडांत अडकवून दैवाधीन बनवलेले असते, तेथील माणसांच्या मनात आपण एक स्वतंत्र व्यक्ती असून, आपल्याला आपल्या मनाप्रमाणे जीवन जगण्याचा अधिकार आहे, याची जाणीवच निर्माण होत नसते. ज्या समाजात जात, वर्ग, लिंग, भाषा आणि प्रदेश यावरून विषमता असते, तेथील माणसांत आपल्या माणूसपणाची भावना निर्माण होत नसते. म्हणून ज्यांना राजकीय क्रांती करावयाची असते, त्यांना तिला पोषक ठरेल अशी धार्मिक आणि सामाजिक परिस्थिती निर्माण करण्यासाठी खूप मशागत करावी लागते. तरच राजकीय क्रांतीचा पाया भक्कम बनून तिची इमारत डौलाने उभी असते. रशियन राज्यक्रांती सत्तर-ऐंशी वर्षांत कोलमडून पडली; कारण त्यांनी ना व्यक्तींना स्वातंत्र्य दिले, ना समाजवादासाठी व्यक्तींच्या मनाची मशागत केली. म्हणून डॉ. आंबेडकरांनी रशियन





कम्युनिस्टांची कानउघडणी करताना सांगितले होते, 'Russion Communists have forgotten that Buddhism is an ultimate deed to sustain communism.' साम्यवादाच्या यशस्वीतेसाठी बुद्ध, धम्म हा एकमेव मदतनीस असतो, याकडे रशियन कम्युनिस्टांनी गांभीर्याने पाहिले नाही. कोणतीही क्रांतिकारी समाजव्यवस्था त्याच वेळी दीर्घकाळ टिकू शकते, जेव्हा तेथील माणसांच्या मनाचा, त्यांच्या आशा-आकांक्षांचा विचार केंद्रस्थानी येत असतो.

जगाच्या इतिहासासंबंधी इतिहासकारांनी आणि तत्त्ववेत्त्यांनी अनेक सिद्धांत मांडलेले आहेत. इतिहासाचा कर्ता हा ईश्वर असून, येथे जे घडते ते त्याच्या इच्छेनुसार, इथपासून ते ऐतिहासिक घटना योगायोगाने घडत असतात इथपर्यंत किंवा इतिहासातील घटना कार्यकारणभावाने घडतात इथपासून ते द्वंद्वात्मक भौतिकवाद (Dialectical Materialism) इथपर्यंतचे अनेक सिद्धांत आज अभ्यासकांसाठी उपलब्ध आहेत. कार्ल मार्क्स यांनी जगाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे या गृहीतकावर आपले तत्त्वज्ञान उभे केले. त्यांनी मांडलेला ऐतिहासिक भौतिकवादाचा सिद्धांत हा इतिहासाचा उलगडा करण्यास भरपूर साहाय्य करतो, हे त्यांचे विरोधकही काही वेळा मान्य करतात. इतिहासाच्या प्रत्येक ऐतिहासिक टप्प्यावर त्या वेळेच्या पिळल्या जाणाऱ्या आणि पिळवणूक करणाऱ्या वर्गात संघर्ष होत असतो आणि त्या संघर्षाच्या समन्वयातून एक नवी समाजव्यवस्था आकार घेत असते. म्हणून कार्ल मार्क्स यांनी इतिहासाची दिशा नागमोडी वळणांची असली, तरी ती सतत पुढे जाणारी आहे, असे मानले जाते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय इतिहासाबद्दल एक नवा सिद्धांत मांडला. त्यांनी लिहिले आहे, 'भारताच्या बहुतांश इतिहासाला मुळात इतिहास म्हणता येणार नाही. याचा अर्थ भारताला अजिबात इतिहास नाही, असे नाही. त्यालाही भरपूर मोठा इतिहास आहे; परंतु तो त्याचे स्वरूप गमावून बसलेला आहे. त्याला ब्राह्मणी लेखकांनी हेतूपूर्वक दंतकथांच्या पातळीवर आणून ठेवलेले आहे. त्यामुळे फार तर स्त्रिया आणि लहान मुलांची करमणूक होऊ शकेल.' भारताचा इतिहास समजून घेण्यासाठी म्हणूनच डॉ. आंबेडकरांनी एक नवे सूत्र मांडले आहे. ते म्हणजे, 'भारतीय इतिहास म्हणजे क्रांती आणि प्रतिक्रांती यांची अखंड विणत गेलेली शृंखला आहे.' या ठिकाणी मार्क्स आणि आंबेडकरांच्या मांडणीतील सूक्ष्म फरक नीट समजावून घेणे आवश्यक आहे. मार्क्स यांच्या इतिहास मीमांसेत उत्पादन साधने, उत्पादन साधनांची मालकी, उत्पादनांचे वितरण या भौतिक गोष्टींना प्राधान्य आहे, तर डॉ. आंबेडकरांच्या इतिहास मीमांसेत वेद, उपनिषदे, त्रिपिटके, भगवद्गीता, मनुस्मृती या प्राचीन; कबीर, तुकाराम, चोखोबा, दक्षिणेतील आलवार आणि इतर पंथांतील संत या मध्ययुगीन संतसाहित्याला महत्त्व दिलेले आहे.

प्राचीन कालखंडात आर्य आणि अनार्य यांच्या संघर्ष आणि समन्वयातून जी संस्कृती आणि समाजव्यवस्था निर्माण झाली, तिच्यातून यज्ञसंस्कृती, चातुर्वर्ण्य समाजव्यवस्था आणि पुढे जातिव्यवस्था निर्माण झाल्या. या व्यवस्थेने समाजातील प्रत्येक अंगात विषमता आणि पिळवणूक निर्माण केली. या व्यवस्थेला उलथवून टाकण्याचे काम, या व्यवस्थेत क्रांती करून नवी व्यवस्था स्थापन करण्याचे पहिले काम उपनिषदांनी सुरू केले. कठ, केन, छांदोग्य आणि बृहदारण्यक उपनिषदे ही बुद्धपूर्व आहेत, असे अनेक अभ्यासकांचे मत आहे. वेदांतील सारी सूक्ते ही भौतिक सुखासाठी प्राचीन माणसांनी केलेल्या प्रार्थना आहेत. दीर्घ आयुष्य, भरपूर संपत्ती, मेंढपाळांसाठी विस्तीर्ण कुरणे इत्यादी प्राप्त व्हावे म्हणून या प्रार्थना होत्या. वेदांचा सारा प्रवास हा माणसाच्या बाह्य विश्वाचा होता. उपनिषदे वेदांच्या पुढे गेली आणि माणसाच्या मनाचा विचार त्यांनी तत्त्वज्ञानाच्या केंद्रस्थानी आणला. त्यात महत्त्वाची भूमिका बजावली ती छांदोग्य उपनिषदाने. याच उपनिषदाने माणसाला जसे


पृथ्वी, आकाश, सूर्य, चंद्र, तारे आणि विद्युत नक्षत्रे एवढे विशाल बाह्य विश्व दिले आहे, तेवढेच त्याला अंतर्विश्वही दिले आहे. अगदी बाह्य विश्वासारखेच. त्याचप्रमाणे कठोपनिषदाने माणसाला याच जन्मात आणि याच धरतीवर अमरत्व किंवा ब्रह्मपद प्राप्त होऊ शकते, हा माणसाला दिलेला विचार फारच क्रांतिकारक होता. माणसाचे जीवन हे त्याचे बाह्य विश्व आणि अंतर्विश्व यांच्या समन्वयातून व्यतीत होत असते; परंतु दुर्दैवाने पुढील काळात काही उपनिषदांनी बाह्य जगाचे अस्तित्वच नाकारले आणि ती एकांगी बनली. तरीही त्यांनी वेदांना केलेला विरोध, यज्ञसंस्थेवर घातलेला घाला आणि मानवी शरीरासोबतच मानवी मनाचा केलेला विचार ही भारतीय तत्त्वज्ञानातील अभूतपूर्व क्रांतीची सुरुवात होती. ही क्रांती पुढे गौतम बुद्धांनी पूर्णत्वाला नेली. उपनिषदांना 'वेदान्त' म्हणजे 'वेदांचा शेवट' असा शब्द वापरला जातो; परंतु तो चुकीचा आहे. उपनिषदांची निर्मिती ही स्वतंत्रपणे केली गेलेली आहे. या क्रांतीच्या मुळाशी 'ब्राह्मण विरुद्ध क्षत्रिय' असा संघर्ष आहे. सगळी महत्त्वाची उपनिषदे ही क्षत्रियांची निर्मिती आहे आणि स्वत: तथागत बुद्ध आणि महावीर हे दोघेही क्षत्रिय होते.




तथागत गौतम बुद्धांनी वैदिक धर्माविरुद्ध केलेली क्रांती ही सर्वव्यापी होती. या क्रांतीने माणसाचा समग्रपणे विचार केला. त्यात माणसाच्या भौतिक जीवनाचा जसा विचार होता, तसाच त्याच्या अंतर्जीवनाचाही विचार होता. मानवी शरीराचा जसा विचार होता, तसा मानवी मनाचाही विचार होता. वैदिकांनी त्यांच्या धर्माचा आधार 'सत्-चित्-आनंद' ही तत्त्वत्रयी मानली, तर बुद्धांनी त्यांच्या धम्माला 'उपनित्य, अनात्म आणि दु:ख' या तत्त्वत्रयीवर उभे केले. बुद्धाच्या मते, या जगात काहीही शाश्वत नसते. कोणतीही गोष्ट अमर नसते. येथे प्रत्येक क्षणाला परिवर्तन आहे. विश्व प्रत्येक क्षणी नवा जन्म घेत असते. मानवी जीवनात दु:ख आहे, त्या दु:खाला कारणे आहेत, ती कारणे नष्ट केली की माणूस दु:खमुक्त होतो आणि त्यासाठी त्याला अष्टांगमार्गाने जीवन व्यतीत करावे लागते. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्ती आणि समाजजीवनात नीतीला फार महत्त्व दिले आहे. त्यांच्या मते, नीती हे धम्माचे केंद्र आहे. इतर धर्मांत ईश्वराचे जे स्थान आहे, ते बुद्ध धम्मात नीतीचे स्थान आहे. म्हणून त्यांनी नीतीला पवित्र (Sacred) मानले आहे. आत्मा आणि पुनर्जन्म या भाकडकथा असून, मुळात आत्माच अस्तित्वात नसेल तर त्याचा पुनर्जन्म कसा होऊ शकतो, असा प्रश्न उभा करून बाबासाहेब सांगतात, 'याच जन्मात आणि याच भूमीवर माणूस आपल्या प्रज्ञेच्या साहाय्याने आनंदी आणि सुखी जीवन जगू शकतो. त्यासाठी त्याला कोणतेही कर्मकांड करण्याची गरज नाही. तथागत बुद्धाने वैदिक चातुर्वर्ण्याविरोधी जी महान क्रांती केली, तिच्यातून सामाजिक समतेचा मार्ग मोकळा झाला. बुद्धांनी केलेल्या या क्रांतीचे वर्णन जागतिक पातळीवरील महापंडित मॅक्सम्यूलर यांनी ज्या शब्दांत केले, त्यावरून त्या क्रांतीची महत्ता संपूर्ण जगाला समजली. ते लिहितात,

**'बौद्ध धर्माचा ब्राह्मणी धर्माला असलेला तीव्र विरोध बौद्ध धर्म हा खास भारतीय भूमीतील धर्म आहे, हे सिद्ध करणारा आहे. खऱ्या अर्थाने ज्या क्षणी बौद्ध धर्माने धार्मिक सिद्धांताचे रूप धारण केले, त्या क्षणापासून जगाच्या इतिहासात बौद्धिकदृष्ट्या एका नव्या कालखंडाने जन्म घेतला. भारताने त्या वेळी ऐतिहासिकदृष्ट्या धर्मचिंतनातील सर्वोच्च शिखर गाठले. त्या वेळेचे वातावरण म्हणजे संपूर्ण विश्व प्रज्ञामय झाल्याचा काळ होता.'**

तथागत बुद्धाने केलेली क्रांती चक्रवर्ती राजा अशोक याच्या राजवटीत शिखराला पोहोचली; परंतु त्याच वेळी ब्राह्मणी धर्माने त्या क्रांतीविरोधात प्रतिक्रांतीची तयारी केली. इसवी सनपूर्व १८५ मध्ये बृहद्रथ या बौद्ध राजाचा ब्राह्मण सेनापती पुष्यमित्र शृंग याने सैन्याची पाहणी करत असताना खून केला आणि राजसत्ता बळकावली. तेथून पुढे ब्राह्मणी व्यवस्थेच्या प्रतिस्थापनेची सुरुवात झाली. यज्ञसंस्थेचे पुनरुज्जीवन करण्यात आले. व्हिन्सेन्ट स्मिथ या इतिहासकाराने स्पष्टपणे नोंदवून ठेवले आहे की, स्वत: पुष्यमित्राने अश्वमेध यज्ञ केला होता. बाबासाहेबांनी त्यांच्या 'रिव्हॉल्यूशन ॲण्ड काउंटर रिव्हॉल्यूशन इन एशन्ट इंडिया' या लिखाणात सुमती भार्गव या संशोधकाचा हवाला देऊन मनुस्मृतीचा कालखंड हा इसवी सनपूर्व ७० ते १५० या दरम्यानचा असावा, हे स्पष्ट केले. याचा



अर्थ पुष्यमित्राला मनुस्मृतीबद्दल निश्चितच माहिती असली पाहिजे. मनुस्मृती ही ब्राह्मणी धर्माची राज्यघटना होती. त्यामुळे पुष्यमित्राने तिचा अंमल आपल्या राज्यात सुरू केला. मनुस्मृतीने राज्यघटनेची गरज भागवली; परंतु बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा पराभव करणे अशक्य होते. तो करणे ही ब्राह्मणी धर्माची गरज होती. त्यासाठी सर्व ब्राह्मणी संप्रदाय एकत्रित आले आणि त्यांनी बौद्ध धम्माच्या तत्त्वज्ञानाविरोधात संयुक्त आघाडी निर्माण केली. तिलाच आजच्या काळात 'युनायटेड फ्रंट' असे नाव आहे. या सर्वांनी एकत्र येऊन भगवद्‌गीतेची निर्मिती केली. भगवद्‌गीतेचा कालखंड इसवी सनपूर्व १५० च्या दरम्यानच्या तीनशे वर्षांमधील सांगितला जातो. भगवद्‌गीतेत कोणतेही सूत्रबद्ध तत्त्वज्ञान नाही; परंतु ती अतिशय अलंकारिक संस्कृत भाषेत लिहिली गेल्यामुळे वाचक तिच्यात गुंतत जातो. ती त्याच्या मनाचा पूर्ण ताबा घेते. त्यामुळे तो तिच्यातील तत्त्वज्ञानाखाली असलेल्या आशयाकडे विवेकाच्या दृष्टीने विचार करू शकत नाही. भगवद्‌गीतेत एकीकडे निरीश्वरवादी सांख्याचे तत्त्वज्ञान आहे, तर दुसरीकडे ईश्वराच्या भक्तीचे गुणगानही आहे. एकीकडे ती कर्माची महती गाते, तर दुसरीकडे कर्मसंन्यासाची वाट दाखवते.

भगवद्‌गीतेने मनुस्मृतीच्या व्यवहाराला तत्त्वज्ञानाचा साज चढवलेला आहे. तिने पहिल्यांदा ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्यापासून वैश्य, शूद्र आणि सर्व वर्णांतील स्त्रियांना विभक्त केले आणि त्यांना 'पापयोनी' ठरवले. (गीता : ९-३२) त्यामुळे या तिन्हींचे शोषण करण्याचा अधिकार ब्राह्मण आणि क्षत्रिय पुरुषांना प्राप्त झाला. तेथून पुढे पितृसत्ताक पद्धती सुरू झाली आणि स्त्रीदास्याचा आरंभ झाला. त्याचप्रमाणे वर्णव्यवस्थेत ज्या वर्ण-जातींना जी कर्मे ठरवून दिलेली होती, तीच कर्मे म्हणजे कामे त्यांच्या वंशजांनी करावीत, असे तत्त्वज्ञान गीता सांगते आणि त्यासाठी मोक्षाचे आमिष दाखवते. गीतेने जरी चातुर्वर्ण्य हे गुणधर्मानुसार ठरतात असे सांगितले असले, तरी ते खोटे आहे. गुणधर्मावर उभी असलेली व्यवस्था कर्म करण्याचे स्वातंत्र्य देते; परंतु गीतेने ते दिलेले नाही. गीता स्पष्टपणे सांगते,

***एवं ज्ञाखा कृतं कर्म पूर्वेरपि मुमुक्षुत्रि।***
***करू कर्मेव तस्मात्वं पूर्वे पूर्वतर कृतम।। (४-१५)***

याचा अर्थ मोक्षाची इच्छा धरणाऱ्या तुझ्या पूर्वजांनी जे कर्म केले, तेच कर्म तू कर. म्हणजे वंशपरंपरागत व्यवसाय कर. गीता शेवटच्या अध्यायात वंशपरंपरागत व्यवसायाचा अधिक स्पष्टपणे पुरस्कार करताना म्हणते,

***सहजं कर्म कौंतेय सदोषमपि न त्यजेत।***
***सर्वारंभ हि दोषेण धूमेनाग्नीरिनावृत्ता: (१८-४८)***

याचा अर्थ सहज म्हणजे जन्मत:च जे कर्म तुझ्या वाट्याला आलेले आहे, ते सदोष असले तरी हे कौंतेया, ते कधीही सोडू नये. कारण ज्याप्रमाणे विस्तव धुराने व्यापलेला असतो, त्याप्रमाणे सर्व आरंभ म्हणजे उद्योग कोणत्या ना कोणत्या तरी दोषाने व्यापलेले असतात. यावरून भगवद्‌गीता वंशपरंपरागत व्यवसाय बदलाला मान्यता देत नाही, हे समोर येते. याचा परिणाम असा झाला की, भारतीय समाज पूर्णपणे कुंठित झाला आणि त्याच्यातील प्रगतीच्या सर्व भावना मृतप्राय झाल्या. भारत आजही त्या प्रतिक्रांतीची फळे भोगत आहे.

तथागत बुद्धाने केलेली क्रांती कमी-अधिक हजारभर वर्षे टिकली. भारतावर बाहेरून आलेल्या टोळ्यांची आक्रमणे वाढत गेली. त्यामुळे बौद्ध राजांना आपली सत्ता गमवावी लागली. प्रथम मिहिरकुल या हूण टोळ्यांच्या प्रमुखाने बालादित्याशी अनेक लढाया केल्या; परंतु बालादित्याने त्याला पराभूत केले. शेवटच्या लढाईत मात्र मिहिरकुल जिंकला. बालादित्य बौद्ध असल्याने मिहिरकुलाने हिंदू धर्माचा स्वीकार केला आणि बौद्धांचा नि:पात करण्याचे ठरवले. तो इसवी सन ५२८ मध्ये गादीवर आल्यानंतर त्याने उत्तर भारत आणि पंजाबमधील बौद्धांचे अनेक स्तूप आणि धर्मस्थळे उद्ध्वस्त केली. तेथून पुढे परधर्माची पवित्र स्थळे उद्ध्वस्त करण्याची परंपरा सुरू झाली, ती आजही कायम आहे. यानंतर पूर्व भारतात शशांकाने बौद्ध राजा हर्षाचा पराभव करून इसवी सनाच्या सातव्या शतकातील पहिल्या दशकात राज्य केले. तो शिवाचा उपासक बनला. त्याने बुद्धगयेत ज्या पिंपळाच्या झाडाखाली बुद्धाला ज्ञानप्राप्ती झाली, ते झाड खणून-उखडून टाकले आणि नंतर जाळले. त्याने हजारो बौद्ध भिक्षूंच्या कत्तली केल्या. त्यामुळे बौद्ध भिक्षू भारतातून जीवित रक्षणासाठी पळून गेले. भारताच्या इतिहासात सातवे शतक हे धार्मिक अन्यायाचे ठरले. पुढील काळात ब्राह्मणी प्रतिक्रांती यशस्वी होत गेली.

इसवी सन ७१२ मध्ये महम्मद बिन कासिमने सिंध प्रांतावर आक्रमण केले. त्याने दाहिर या तेथील ब्राह्मण राजाचा सहज पराभव केला. कारण कासिमने दाहिरच्या सेनापतीला प्रचंड लाच दिल्यामुळे



सेनापतीने सर्व योद्ध्यांना हत्यारे खाली फेकण्याचा आदेश दिला होता. तेव्हापासून भारतावर मुसलमानांच्या स्वाऱ्यांत भर पडत गेली. मध्य भारतात शहाबुद्दिन घोरीच्या नेतृत्वाखाली लढाया झाल्या. त्या काळात भारतातील अनेक छोटे मोठे राजे आपापसात लढाया करत होते आणि जिंकण्यासाठी मुसलमानांची मदत घेत होते. शेवटी मुसलमान त्यांनाही जिंकून त्यांचे राज्य हस्तगत करत होते. मध्ययुगातील बाबर ते औरंगजेब या मोगल सम्राटांनी भारतावर नऊशे वर्षे निर्धोकपणे राज्य केले. त्यांनी उच्चवर्णीय ब्राह्मणांना त्यांच्या प्रशासनात स्थान देऊन ब्राह्मणांना आपलेसे केले. आपल्या देशातील ब्राह्मणांना कधीही परकीय राजांबद्दल अवमानना वाटली नाही. राजकीय सत्ता कोणाच्या हातात आहे, याची त्यांना चिंता नव्हती. ब्राह्मणी चातुर्वर्ण्य व्यवस्था आणि जातिव्यवस्था कशी सुरक्षित राहील, याचीच त्यांना चिंता होती. जो शासक ती सुरक्षित ठेवेल, त्याच्या राज्याला प्रशासनात मदत करणे ते पसंत करत असत. मुसलमानांनी भारतावर दीर्घकाळ सत्ता राबवली, कारण त्यांनी काही अपवादवगळता हिंदूंची जबरदस्तीने धर्मांतरे केली नाहीत. कारण बहुसंख्य हिंदू शेतकरी होते आणि मुस्लीम शासन त्यांच्याकडून मिळालेल्या शेतसाऱ्यावर, करावर चालत होते. त्यामुळे त्यांना नाराज करणे मुस्लीम राज्यकर्त्यांना परवडणारे नव्हते.


उत्तर भारतात ज्या वेळी ब्राह्मणी धर्माची सत्ता तिच्या शिखरावर होती, त्याच वेळी दक्षिण भारतातील तमिळ प्रदेशात भक्ती चळवळीची एक वीज चमकली. ती केवळ ब्राह्मणी धर्माच्या प्रतिक्रांतीला रोखणारी नव्हती, तर त्या काळात जे ज्ञान-विज्ञान आणि धर्मचिंतन अस्तित्वात होते, ते जनभाषेत अभिव्यक्त करून सामान्य माणसापर्यंत पोहोचवणार होती. या चळवळीला नावच द्यायचे ठरले तर ती ब्राह्मणी धर्माविरुद्ध उभी राहिलेली धार्मिक जनक्रांती होती. त्याचप्रमाणे ती प्रचार आणि प्रसार करत असलेल्या धर्माला 'जनधर्म' म्हणता येईल. या धर्माने पहिले काम केले ते म्हणजे ब्राह्मणी धर्मातील सर्व कर्मकांडे नाकारली आणि माणसाच्या मनाची, चित्ताची शुद्धता धर्माच्या केंद्रस्थानी आणली. ज्याचे अंत:करण शुद्ध असते, त्याला ना तत्त्वज्ञानाची गरज असते ना कर्मकांडांची. त्यामुळे ब्राह्मणी धर्मातील पुरोहितांचा जो वर्ग जनतेतील अज्ञान आणि अंधश्रद्धेचा फायदा घेऊन बहुजन समाजाचे आर्थिक शोषण करीत होता, तो बेकार झाला. या धर्माने दुसरी गोष्ट केली ती म्हणजे स्त्री-पुरुषांमधील समानता. या चळवळीत स्त्रियांचा सहभाग इतका मोठा होता की, काही प्रदेशांत या चळवळीचे नेतृत्व स्त्रियांनी केलेले दिसते. तमिळ प्रदेशातील आंदळ, कर्नाटकातील अक्कमहादेवी, महाराष्ट्रातील जनाबाई, सोयराबाई, उत्तरेतील मीराबाई ही त्यांपैकी काही ठळक नावे. या चळवळीने तिसरी गोष्ट केली ती म्हणजे जाती आणि वर्णव्यवस्थेचा निषेध. या दृष्टीने कर्नाटकातील बसवण्णा थोर क्रांतिकारक ठरले. महाराष्ट्रातील तुकाराम आणि उत्तरेकडील कबीर यांनी बहुजन समाजाच्या मनात नवचैतन्य निर्माण केले. इतकेच नव्हे, तर मध्ययुगासारख्या अंधारलेल्या काळातही माणसाला जगण्याचे प्रयोजन दिले. ही चळवळ म्हणजे भारतातील शूद्रातिशूद्र आणि स्त्रिया यांनी ब्राह्मणी धर्माविरुद्ध केलेल्या धार्मिक क्रांतीची नांदी होती. हे फक्त भारतातच घडले असे नाही. याच काळात मूलतत्त्ववादी धर्म आक्रमक आणि हिंसक बनले होते. त्या सर्व धर्मांविरुद्ध बहुजन समाज आणि स्त्रियांनी विद्रोह केलेला होता. मध्य पूर्वेतील सुफी चळवळ याच प्रकारची होती आणि राबिया या नावाची एक गुलाम स्त्री या चळवळीच्या मध्यभागी होती. ख्रिश्चन धर्मातील गूढवादी, मिस्टिक तेच काम करत होते.

या संत मंडळातील काही संतांचे दोन-चार अभंग आपल्यासमोर ठेवले तर त्यांच्या चळवळीचे स्वरूप अधिक स्पष्ट होईल. ज्या श्रुती-स्मृती-पुराणोक्त ब्राह्मणी धर्माने स्त्रीदास्य निर्माण केले, त्यातून मुक्त झालेल्या जनाबाई म्हणतात,

'स्त्री जन्म म्हणून न व्हावे उदास।







साधुसंता ऐसे केले मज।।
संताचे घरची दासी मी अंकिळी।
विठोबाने दिली प्रेमकळा।।'

कबीरांनी तर वेदांना आणि पुराणांना आंधळ्यासमोर धरलेला आरसा म्हटले. ते म्हणतात,

**'अंध सो दर्पण वेद पुराना।**
**दवी कहा महारस जाना।।'**

त्याचप्रमाणे मनुस्मृतीची निर्भर्त्सना करताना कबीर म्हणतात,

**'वेद की पुत्री सुस्मृति भाई। सो जेवरी कर लेतही आई।।**
**आपुहि वरि अपना गर बाँधा। झूठा मोह काल को फंदा।।'**

म्हणजे वेदांची कन्या मनुस्मृती माणसासाठी कर्माचे फास घेऊन आलेली आहे. तिने चातुर्वर्ण्य आणि कर्मकांडांचे दागिने प्रत्येकाच्या गळ्यात एखाद्या फासाप्रमाणे अडकवले आहेत. ते सारे खोटे आहेत. हा 'काल का फंदा' आहे, म्हणून तिचे नियम तोडून टाकले पाहिजेत. मराठी संत कविश्रेष्ठ तुकाराम या सर्वांच्या पुढे गेले. ते वेद आणि ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल लिहितात,

**'तो वेद आम्हावरी रुसुनिया गेला।**
**आम्ही त्याच्या बाला धरले कंठी।।**
**तुका म्हणे वेद स्वप्नीचे चालणे।**
**ते काय होईल जागृतीशी।।''**

शेवटी तर तुकाराम पाश्चात्त्य देशात झालेल्या प्रबोधनाच्या चळवळीतील प्रबोधनकारांची भाषा बोलतात आणि ईश्वर ही माणसाची निर्मिती असून, ईश्वराऐवजी माणसाला केंद्रस्थानी आणताना म्हणतात,

**'आमुचिया भावे तुज देवपण। हे का विसरोन राहिलाशी।।**
**जेणे तुज आले रूप आणि नाव। पतित हे दैव तुझे पाही।।**
**नाही तरी तुज कोण हो पुसते। निराकारी तेथे एका एकी।।**
**तुका म्हणे आम्ही असोनिया जाण। तुज देवपण आणियेले।।'**

भारतातील भक्ती आंदोलन हे खास भारतीय पद्धतीचे पुनरुज्जीवन आणि प्रबोधनाचे रेनेसाँचे आंदोलन होते. हे आंदोलन ब्राह्मणी धर्माविरुद्ध तथागत बुद्धांनी जी क्रांती केली होती, तिच्या पुनरुज्जीवनाची तयारी होती. हे तुकारामांच्या शिष्या बहिणाबाईंनी अगदी स्पष्ट शब्दांत नोंदवून ठेवले आहे. त्या म्हणतात,

**'कलियुगी हरी बौद्ध रूप धारण करी।**
**तुकोबा शरीरी प्रवेशिला।।**


या भक्ती आंदोलनाकडे या देशातील प्रागतिक चळवळींचे दुर्लक्ष झाल्याचे अनेक दुष्परिणाम या देशाला भोगावे लागले; परंतु विसाव्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने या देशाला एक महात्मा मिळाला आणि त्याने ही पुनरुज्जीवन आणि प्रबोधनाच्या रेनेसाँची धुरा आपल्या खांद्यावर घेतली आणि बुद्ध धम्मातील चैतन्य आणि आधुनिक ज्ञान-विज्ञान यांचा संयोग करून या चळवळीला अधिक गतिमान करण्याचा प्रयत्न केला.

मोगल बादशहा औरंगजेबानंतर भारतीय समाज विस्कळीत बनला. त्यामुळे चोर आणि दरोडेखोरांची संख्या वाढू लागली. अनेक प्रदेशांत वेगवेगळ्या धटिंगणांनी आपापली छोटी राज्ये स्थापून ते एकमेकांशी लढू लागले. काही राजे तर बाजारपेठेवर धाडी टाकून व्यापारीवर्गाला लुटू लागले. पुण्यातील पेशव्यांनी तर स्वत:च पुणे सात वेळा लुटले. त्यातच ब्रिटिश, फ्रेंच आणि पोर्तुगीज यांचे भारतीय भूमीवर आगमन झाले. ब्रिटिशांनी भारताला कसे जिंकले आणि त्यांनी भारताला पुनर्निर्माण करणारा 'रिप्रॉडक्टिव्ह' देश कसा बनवला, हे सर्वज्ञात आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटिश शिक्षणाने बहुजन समाजात सुशिक्षितांचा एक वर्ग तयार झाला. शिक्षणाने त्यांना आत्मभान दिले आणि त्यातूनच ब्राह्मणी धर्म आणि त्याच्या सामाजिक वर्चस्वाविरुद्ध बहुजनांनी आपली स्वतंत्र चळवळ उभी केली. महाराष्ट्रात तिचे नेतृत्व महात्मा जोतीराव फुले यांनी केले, तर दक्षिण भारतात रामस्वामी नायकर यांनी. जागतिक पातळीवर भांडवलशाहीत अनेक परिवर्तने होऊन 'मोनोपॉली कॅपिटॅलिझम' स्थिर झाला. त्याचा फायदा बहुजन समाजाला बऱ्यापैकी झाल्याने भारतातील सर्व ब्राह्मणेतर चळवळींनी ब्रिटिश राज्याचे स्वागत केले. ब्रिटिशांच्या अमलाखालीच भारतीय शूद्रातिशूद्र समाज ब्राह्मणी वर्चस्वातून मुक्त होऊ शकेल, याची त्यांना खात्री वाटू लागली. म्हणून ते सामाजिक चळवळ अधिक गतिमान करत गेले. सामाजिक गुलामगिरीचा पाया असलेल्या ब्राह्मणी धर्माची चिकित्सा महात्मा फुले यांनी अतिशय अभ्यासपूर्ण आणि निधड्या छातीने केली. या सामाजिक बदलाच्या पार्श्वभूमीवर १९२० च्या दशकात भारताच्या राजकीय क्षितिजावर बाबासाहेब आंबेडकर हा एक नवा देदीप्यमान

तारा प्रकट झाला. त्यांनी तथागत गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा जोतीराव फुले यांना गुरू मानून आपल्या कार्याची सुरुवात केली. आंबेडकर जसे अर्थशास्त्रज्ञ होते, तसेच राज्यशास्त्रज्ञही होते, तसेच धर्मज्ञही; हे त्यांनी अमेरिका, इंग्लंड आणि जर्मनीतून मिळवलेल्या शैक्षणिक पदव्यांवरून स्पष्ट होते. त्यांच्या काळात त्यांच्या नावापुढे लिहिल्या जाणाऱ्या पदव्या इतक्या होत्या की, त्या पदव्या भारतातील कोणत्याही विद्वानाच्या अथवा राजकारण्याच्या नावापुढे नव्हत्या.

बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या कार्याची सुरुवात बहिष्कृत हितकारिणी सभा स्थापून केली. नंतर त्यांनी भारतीय स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला. त्यानंतर त्यांना शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची नाइलाजाने स्थापना करावी लागली. १९३२ सालच्या ब्रिटिश राजाने बोलावलेल्या गोलमेज परिषदेत अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून ते हजर राहिले. त्यांनी दलितांच्या राजकीय हक्कांसाठी महात्मा गांधींशी कडवा संघर्ष केला. शेवटी गांधीजींच्याच इच्छेमुळे त्यांच्याकडे स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्याचे कार्य सोपवण्यात आले. त्यासाठी त्यांना जागतिक पातळीवरील शांततावादी चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या म्युरिएल लेस्टर आणि राजकुमारी अमृत कौर या दोन विदुषींनी खूप मदत केली. दुसऱ्या गोलमेज परिषदेत महात्मा गांधी हे म्युरिएल लेस्टर यांच्याच आश्रमात उतरले होते आणि त्या डॉ. आंबेडकरांशीही संवाद साधत होत्या, हे त्यांच्या आत्मचरित्रावरून दिसते. बाबासाहेबांचे आद्य चरित्रकार चां. भ. खैरमोडे यांनी या गोष्टीला दुजोरा दिला होता. बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटना राजेंद्र प्रसाद यांना समारंभपूर्वक दिल्यानंतर काही दिवसांतच हिंदू कोड बिलावरील मतभेदामुळे डॉ. आंबेडकर केंद्रीय मंत्रिमंडळाचा राजीनामा देऊन बाहेर पडले. त्यांच्या मनात धर्मांतराचा विचार घर करून बसला. १९३५ साली येवला मुक्कामी त्यांनी केलेल्या 'मी हिंदू धर्मात जन्मलो असलो, तरी हिंदू म्हणून मरणार नाही' या घोषणेच्या परिपूर्तीसाठी त्यांनी बौद्ध धर्माची निवड केली. आणि बौद्ध धर्माचे बायबल वाटावे अशा 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाची निर्मिती केली. त्यांच्या मनात बौद्ध धर्माची कोणती कल्पना होती, हे त्यांच्या या ग्रंथात शब्दबद्ध झालेले आहे. धर्मांतराच्या वेळी जेव्हा पत्रकारांनी त्यांना विचारले की, 'तुम्ही बौद्ध धर्मातील हीनयान की महायान पंथात प्रवेश करणार आहात?' त्या वेळी बाबासाहेबांनी दिलेले उत्तर प्रत्येक भारतीय बौद्धाने आपल्या मनावर कोरून ठेवले पाहिजे. ते होते, 'ना मी महायान पंथाचा स्वीकार करणार ना हीनयान, माझा बौद्ध धर्म 'नवयान' असेल.' आंबेडकरांचे हे 'नवयान' म्हणजे पारंपरिक बौद्ध धर्म नव्हता. तर त्यात भगवान बुद्धाचे चैतन्य आणि आधुनिक ज्ञानविज्ञानाचा संगम होता. आजच्या जगाला त्याचीच आवश्यकता आहे, या निर्णयापर्यंत ते पोहोचले होते. म्हणून आपण शेवटी हे 'नवयान' काय आहे, हे समजून घेण्याचा प्रयत्न करू.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांचा बौद्ध धम्म भारताला आणि जगाला समजावून सांगण्यासाठी 'दी बुद्ध ॲण्ड हिज धम्म' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्यांनी बुद्ध आणि त्यांच्या धम्माला समजून घेण्याचे एक सूत्र दिले. ते सूत्र असे होते की, 'बौद्ध धम्माचे योग्य आकलन होण्यासाठी आवश्यक तीन ग्रंथांपैकी हा एक ग्रंथ आहे. त्याचप्रमाणे 'बुद्ध ॲण्ड कार्ल मार्क्स' आणि 'दी रिव्हॉल्यूशन ॲण्ड काउंटर रिव्हॉल्यूशन इन एशंट इंडिया' या आणखी दोन ग्रंथांचे अध्ययनसुद्धा बौद्ध धम्म समजून घेण्यासाठी आवश्यक आहे.' याचा अर्थ बाबासाहेबांनी बौद्ध धर्म समजावून सांगण्यासाठी एक




**बहिष्कृत हितकारिणी सभेतील छायाचित्र**

लेखनप्रकल्प हाती घेतला होता. त्याचे स्वरूप 'त्रिग्रंथी' (Triology) होते. त्यांनी पुस्तकाच्या प्रस्तावनेत 'डॉक्टरलोक मला 'विझती ज्योत' म्हणतात, परंतु माझ्या पत्नीने आणि डॉ. माळवणकरांनी उत्तम काळजी घेतली. त्यामुळे मी हे लेखन करू शकलो' असे म्हटले आहे. बाबासाहेब विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म भारताला आणि जगाला समजावून सांगत होते. त्यांना पारंपरिक बौद्ध धर्माची चिकित्सा करून तो आजच्या मनुष्यजातीचे प्रश्न कसे सोडवू शकतो, हे स्पष्ट करायचे होते. थोडक्यात त्यांना विज्ञाननिष्ठ, बुद्धिवादी आणि अखिल मनुष्यजातीला कवेत घेईल असा मानवतावादी बौद्ध धर्म निर्माण करावयाचा होता. बाबासाहेबांनी या सर्व गोष्टी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाला ६ एप्रिल १९५६ रोजी लिहिलेल्या प्रस्तावनेमध्ये नोंदवून ठेवल्या होत्या. हा ग्रंथ त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर १९५७ साली पीपल्स एज्युकेशन सोसायटीने प्रसिद्ध केला; परंतु त्यात बाबासाहेबांनी लिहिलेली प्रस्तावना छापली गेलीच नाही. परिणामी, बाबासाहेबांचा बुद्ध आणि त्याचा धम्म याबद्दलचा मूळ विचारच लुप्त झाला. आपले लोक पारंपरिक धर्मालाच बाबासाहेबांचा धम्म समजू लागले आणि कर्मकांडांत अडकले. बाबासाहेबांच्या मनात जी 'नवयाना'ची संकल्पना होती, तीच आपण बाद करून टाकली. हा बाबासाहेबांच्या अनुयायांनीच त्यांच्यावर केलेला फार मोठा अन्याय होता. त्यांनी बाबासाहेबांच्या क्रांतिकारी बुद्धाला पारंपरिक बुद्ध बनवले. त्यांना डोळे मिटून ध्यानस्थ बसलेला बुद्ध नको होता, तर सतत चालणारा, कार्यरत असलेला बुद्ध हवा होता. शेवटी बाबासाहेबांनी या ग्रंथाला लिहिलेली प्रस्तावना (Preface) त्यांच्या परिनिर्वाणानंतर २३ वर्षांनी म्हणजे १९८०

साली भगवानदास यांनी प्रसिद्ध केली. परंतु तोपर्यंत फार उशीर झाला होता.

बाबासाहेबांनी पहिली गोष्ट केली ती धर्म आणि धम्म यात कोणता फरक आहे, हे स्पष्ट केले. त्यांनी लिहिले आहे, ‘धर्म हा व्यक्तिगत असतो आणि तो व्यक्तिगतच ठेवावा, त्याचा उपयोग सामाजिक जीवनात करू नये. धम्म हा नेमका या विचाराच्या विरुद्ध आहे. धम्म हा सामाजिक आहे. तो मूलत: आणि तत्त्वत: सामाजिक (Social) आहे.’ परंतु बाबासाहेबांचा हा विचार कोणताही पारंपरिक बौद्ध धर्म स्वीकारत नाही. म्हणूनच बाबासाहेबांनी तथागत बुद्धाच्या तुलनेसाठी कार्ल मार्क्स यांची निवड केली असावी. त्यासाठी त्यांनी ‘बुद्ध ॲण्ड कार्ल मार्क्स’ हा छोटेखानी प्रबंध लिहिला. स्वत: त्यांनीच १९३७ मध्ये अहमदाबादच्या परिषदेत आपण समाजवादी आहोत, असे जाहीर केले होते. एकतर त्यांच्यावर ब्रिटनमध्ये असताना फेबियन समाजवादी संस्कार झाले होते. म्हणून ते कार्ल मार्क्स यांच्या शास्त्रीय समाजवादाच्या तत्त्वज्ञानाकडे गांभीर्याने परंतु चिकित्सक दृष्टीने पाहत होते.




बाबासाहेबांनी दुसरी गोष्ट केली ती म्हणजे बुद्धाचे पारंपरिक चरित्र बदलून बुद्धाला नव्या रूपात उभे केले. त्याच्या गृहत्यागाच्या कारणावर नवा प्रकाश टाकला. त्याचप्रमाणे ते गृहत्याग करताना पत्नी यशोधरा हिच्याशी संवाद साधून कसे गेले होते, हे प्राचीन बौद्ध साहित्याच्या आधारे स्पष्ट करून सांगितले. तथागत बुद्धांनी सत्याचा शोध घेताना केलेली उग्र तपश्चर्या आणि त्यांना प्राप्त झालेली ‘संबोधी’ अवस्था यांचे आधुनिक भाषेत निरूपण केले. ज्ञानप्राप्तीनंतर बाबासाहेबांचा बुद्धही मौनात गेला. परंतु त्याने मौनात न राहता जनतेला उपदेश करून मानवतेला दु:खमुक्त करण्याची विनंती त्याला अनेक जण करू लागले. ब्रह्म सहंपती ब्रह्मलोक सोडून बुद्धापुढे प्रकट झाले आणि त्यांना उपदेश करण्याची याचना करू लागले. परंतु बुद्ध म्हणाले ‘हे ब्रह्मा! मला जे सत्य सापडलेले आहे, ते मी इतर कोणालाही शब्दांत सांगू शकणार नाही. मी त्यांना जे सांगेल ते त्यांना समजणार नाही. त्यामुळे ते दु:खी होतील आणि मीही दु:खी होईल. मला त्यांना दु:खी करावयाचे नाही आणि मलाही व्हायचे नाही.’ तरीही ब्रह्माने हट्ट सोडला नाही. शेवटी ब्रह्म सहंपतीची विनंती मान्य करून बुद्धांनी उपदेश करण्याचे मान्य केले. बुद्ध आणि ब्रह्म सहंपती यांच्यातील संवाद त्यांच्या ‘बुद्ध आणि त्यांचा धम्म’ या ग्रंथात अतिशय सहृदयी अंत:करणाने वर्णन केलेला आहे. शेवटी बाबासाहेबांनी लिहिले आहे, ‘संन्यास घेणे निरर्थक आहे, याची बुद्धांना जाणीव झाली. जगापासून पळून जाणे व्यर्थ आहे. संन्याशालासुद्धा या जगापासून मुक्ती नाही. केवळ व्यक्तिगत मुक्ती आणि आत्मोन्नती यासाठी निष्क्रिय बसून, मौन धारण करून आत्मचिंतनात रमून जाणे योग्य नाही.’ शेवटी बुद्धांनी आपला निर्णय जाहीर करताना स्पष्ट केले की,

**‘आजपर्यंतच्या सर्व धर्मांचे प्रयोजन या जगाची उत्पत्ती कशी झाली हे समजावून सांगणे हे होते; परंतु मी जो धम्म शोधला आहे, त्याचे प्रयोजन हे जग कसे बदलायचे आणि त्याची पुनर्रचना कशी करायची, हे आहे.’** त्यामुळे बाबासाहेबांच्या बुद्ध धम्माचे प्रयोजन, त्याचे ध्येय हे जग आज जसे आहे त्यापेक्षा बदलणे आणि त्याची पुनर्रचना करणे, हे आहे. ज्यांना बौद्ध धम्म स्वीकारायचा आहे किंवा ज्यांनी तो स्वीकारला आहे, त्यांनी या ध्येयाचा, त्याच्या प्राप्तीचा प्रयत्न केला नाही तर त्यांना बौद्ध म्हणता येणार नाही. कार्ल मार्क्स यांनीही आपल्या तत्त्वज्ञानाचे सार सांगताना अगदी हीच भाषा वापरली होती. त्यांनी त्यांच्या काळातील फायरबाख या विचारवंतावर टीका करणारी काही विचारसूत्रे लिहून ठेवलेली आहेत. फायरबाखवरील अकराव्या सूत्रात मार्क्स यांनी लिहिले आहे,

‘The Philasophers have only interpreted the world in various ways; the point however is to change it.' (आजपर्यंत तत्त्वज्ञानी लोकांनी या जगाचे वेगवेगळ्या पद्धतींनी अर्थ लावले आहेत. तरीही महत्त्वाचा मुद्दा हे जग बदलण्याचा आहे.)

बाबासाहेब आणि कार्ल मार्क्स या दोघांनाही तत्त्वज्ञान हे जग बदलण्यासाठी असते, ते केवळ निष्फळ चर्चा करण्यासाठी नसते, हे मान्य दिसते. बाबासाहेबांनी बौद्ध धम्माचे प्रयोजन ज्या भाषेत सांगितले, त्याला त्रिपिटकात आधार असो अथवा नसो; परंतु तो खास बाबासाहेब आंबेडकरांचा बुद्ध आणि त्यांचा धम्म आहे. रशियन राज्यक्रांती १९९० साली विफल झाली. सोव्हिएतचे विघटन झाले. कारण ते कार्ल मार्क्स यांच्या तत्त्वज्ञानाचा जग बदलण्याचा गाभाच विसरले. एकाच देशात स्वत:ला मर्यादित करून त्याचीच प्रगती करू लागले; परंतु पुढे ते अमेरिकेसारख्या भांडवलशाही देशाचे स्पर्धक बनले आणि जी संपत्ती जग बदलण्यासाठी वापरायची, ती युद्धासाठी लागणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या निर्मितीवर खर्च करू लागले. रशियन कम्युनिस्टांकडून मार्क्सवाद आकलनाच्या ज्या अक्षम्य चुका झाल्या, तशा भारतीय बौद्धांच्या बाबासाहेबांच्या बुद्ध धम्माबद्दल, त्यांच्या ‘नवयाना’बद्दलच्या आकलनात होऊ नयेत. अन्यथा जे रशियन कम्युनिस्टांना भोगावे लागले, तेच भारतीय बौद्धांना भोगावे लागेल. त्यासाठी सर्वांनी सावध राहिले पाहिजे. प्रबोधनाच्या चळवळी अधिक गतिमान केल्या पाहिजेत. अशा प्रकारची संमेलने साजरी करून आपण त्यात सहभाग घेत आहात, याबद्दल आपल्या सर्वांचे आभार मानून आपल्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो. दुबईत बुद्ध, धम्म आणि आंबेडकर या विषयावर संमेलन भरवणाऱ्यांनाही धन्यवाद देतो.

●●●

## उत्तम कांबळे यांचे दुबईतील भाषण



# भगवान बुद्धाचे पहिले प्रवचन : एका समग्र परिवर्तनाचा प्रारंभ

मित्र हो, भारतातच नव्हे, तर जगाच्या पाठीवरही ऐतिहासिक ठरलेल्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा क्रांतिकारक वसा सांगणाऱ्या धम्मचक्र प्रवर्तनाच्या निमित्ताने आंतरराष्ट्रीय पातळीवर दुबईत होत असलेल्या संमेलनाचे किंवा समारंभाचे उद्‌घाटक आणि जागतिक पातळीवरील थोर विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे, अशा संमेलनाच्या पहिल्या महिला स्वागताध्यक्ष होण्याचा मान ज्यांना मिळाला त्या भारतातील प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्या डॉ. मनीषा जगताप, महाराष्ट्र आणि राज्यभर फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांचा व्रतस्थ आणि समर्पित भावनेने प्रचार-प्रसार करणारे डॉ. रोहिदास जाधव जे फुले-शाहू-आंबेडकर विचार प्रसार मंडळाचे अध्यक्ष आहेत; दुबईतील संमेलनाच्या संयोजनासाठी भारतात राहून समन्वयाचे खूप मोठे काम करणारे युवा उद्योजक आणि कार्यकर्ते आबासाहेब थोरात, संमेलन यशस्वी करण्यासाठी आणि ते आंतरराष्ट्रीय बनवण्यासाठी गेले काही महिने अहोरात्र प्रयत्न करणारे दुबईतील आणि भारतातील माझे सर्व धम्म बांधव, संमेलनात निबंधवाचन आणि परिसंवादात भाग घेण्यासाठी उपस्थित असलेले माझे सर्व मित्र आणि सर्व धम्म बंधू-भगिनींनो, सर्वांना जय बुद्ध आणि जय भीम. एका अतिशय महत्त्वाच्या संमेलनाचे अध्यक्षपद मला दिले याबद्दल मी आपल्या सर्वांना धन्यवाद देतो. भौतिक प्रगतीमध्ये जगात अग्रेसर असलेल्या दुबईत हे संमेलन होत आहे. या संमेलनामुळे दुबईतील निळे आकाश आणखी स्निग्ध होईल, याची मला आशा आहे. मित्रहो, आपण सारे एका धगधगत्या जगात पोहोचलो आहोत. अशा वेळी 'युद्ध नको, बुद्ध हवा' हे एका सुरात जगाला सतत सांगत राहण्याची गरज आहे. त्यासाठी संमेलनाला खूप महत्त्व आहे. संमेलन म्हणजे केवळ एकत्र येणे नसते, तर बुद्धाने दिलेला उजेड चौफेर उधळण्यासाठी पुन:पुन्हा प्रयत्न करणे असते. आपण पृथ्वीच्या पाठीवर कोणत्याही टोकावर असू आणि सोबतीला बुद्ध असेल, तर आपले जगणे आणखी सुंदर होते. शांततामय होते. सुरक्षित होते. पूर्वी भन्तेंच्या संगिनी भरत असत. आता त्या कमी होत गेल्या. त्याची जागा अशा संमेलनांनी घेतल्यास खूप चांगले होईल.

मित्रहो, माझ्यापूर्वी डॉ. कसबे यांचे बुद्धावर अतिशय सुंदर भाषण झाले आहे. बुद्ध आणि बाबासाहेब यांचे ते गाढे अभ्यासक आहेत आणि मी या सर्वांचा वाचक आहे. बुद्ध काही एका ग्रंथात, एका संमेलनात किंवा एका अध्यक्षीय व्याख्यानात मावणारा विषय नाही. तो नव्या माणसाच्या, नव्या उजेडाच्या आणि ज्ञानाच्या कणाकणात भरून पावला आहे. प्रज्ञा, शील, करुणा आणि बंधुतेवरची तो छत्रछाया आहे. अशा बुद्धावर सलग बोलण्याची वेळ आणि जागा ही नाही, याची मला जाणीव आहे. मित्रहो, बुद्धाला ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर त्याने जे पहिले प्रवचन दिले, त्याचाच विचार मी माझ्या अध्यक्षीय भाषणात करणार आहे. तो तुम्ही समजून घ्याल, अशी आशा आहे. तशी विनंतीही आहे.

दु:खाची कारणे शोधण्यासाठी, त्यासाठीचे ज्ञान शोधण्यासाठी सिद्धार्थ घराबाहेर पडला. सत्ता, संपत्ती, नाती आदींचा त्याने त्याग केला होता. अखंड प्रवास सुरू केला. या प्रवासात त्याने अनेक ऋषी-मुनींची भेट घेतली. त्यांच्यासोबत चर्चा केली. प्रश्नोत्तरे केली.

प्रसंगी वादविवाद केले; पण त्याला उत्तर सापडत नव्हते. जे सांगितले जात होते ते त्याला पटत नव्हते. त्याची भ्रमंती चालूच होती. तो आराड मुनीच्या आश्रमात गेला. मग उद्दक रामपुत्त ऋषीने केलेल्या उपदेशानुसार त्याने अभ्यास पूर्ण केला. शेवटची समाधी त्याला प्राप्त झाली होती. उद्दकनेही ते मान्य केले. सिद्धार्थाचे कौतुक केले. बोधिसत्त्व बनलेला सिद्धार्थ मात्र समाधानी नव्हता. आपल्याला समाधी साध्य झाली असली तरी ती पुरेशी नाही. आपल्याला निर्वाणाकडे जायचे आहे आणि त्यासाठी केवळ समाधीत राहून चालणार नाही. समाधीमुळे दुष्ट विकारांचे दमन होईल. ते दाबले जाऊ शकतात. पण विकार दाबण्यापुरता, दमनापुरता आपला प्रयत्न असू नये. तसे झाल्यास दबलेल्या दुष्ट मनोवृत्ती पुन्हा उफाळून वर येऊ शकतात. त्या आपल्यावर ताबा मिळवू शकतात. आपल्याला केवळ समाधीपर्यंत थांबायचे नाही. केवळ दमनापुरते थांबायचे नाही. निर्वाणापर्यंत पोहोचायचे आहे. त्यासाठी कोणाचा पंथ, मठ आपल्याला उपयोगी पडणार नाही, तर स्वतःच कष्टाने निर्वाणाचा मार्ग शोधून काढला पाहिजे, या निर्धाराने उद्दकचा निरोप घेऊन सिद्धार्थ बाहेर पडला. प्रवास करता करता तो एका रमणीय प्रदेशात पोहोचला.




नैरंजना नदीच्या परिसरात सिद्धार्थ पोहोचला. जी गयेजवळ उरुवेला प्रदेशात वाहत होती. नदीच्या दोन्ही काठांवर वनश्री सजली होती. जणू काही ती सिद्धार्थाच्या स्वागतासाठी उभी होती. पक्ष्यांचे गुंजन चालू होते. मोरांचे पिसारे दिसत होते. नदीचा मंद आणि संथ प्रवास मनाला भावत होता. मध्येच खळखळ व्यक्त करून आपली चाहूल देऊन नदी शांत व्हायची. जणू काही मौनात जायची. तिचे मौन भंग करण्यासाठी पक्ष्यांचे गुंजन सुरू व्हायचे. एक सुंदर खेळ सुरू होता. नदीपात्रावरून पक्षी विहार करत होते. ते एका काठावरून दुसऱ्या तीरावर जायचे. हिरव्यागार वनश्रीत लपायचे. पानाफुलांत स्वतःला लपेटून घ्यायचे. त्यांची चाहूल कुणाला लागायची नाही. गुंजनावरून वेध घेण्याचा प्रयत्न व्हायचा. वेगवेगळ्या रंगांतील, आकारांतील पक्षी होते. प्राण्यांच्या हालचाली दिसायच्या. सायंकाळी आणि सूर्योदयाच्या वेळी नदीच्या संथ प्रवाहावर, नाजूक लाटांवर सोनेरी किरणे अलगद उतरायची. क्षणभर खेळायची. नदीला सोनेरी वस्त्र देऊन पुढे सरकायची. नदीच्या दोन्ही तीरांवर आठ-दहा-वीस घरांची छोटी छोटी गावे वसली होती. या गावांनी नदीला पावित्र्य बहाल केले होते. अशा मोहक वातावरणात तपश्चर्या करावी, असे सिद्धार्थाला न वाटल्यास नवलच म्हणावे लागेल. त्याने या पवित्र आणि सुंदर नदीच्या काठावर तपश्चर्येला बसण्याचा निर्णय घेतलाही. विशेष म्हणजे, या रम्य परिसरात काही साधूही तपश्चर्या करत होते. पूर्वीही काहींनी ती केली होती. कठोर तपश्चर्येचा अवलंब केला की, ज्ञानकांडात सांगितलेले ब्रह्म प्राप्त होऊन मोक्षसिद्धी होते, असे हे साधू सांगत होते. इंद्रियाधिष्ठित त्रासापासून मुक्त होता येते. बंधमुक्त होऊन ब्रह्मात विलीन होता येते. आम्ही त्यासाठी तपश्चर्येला बसलो आहोत, असेही साधू सांगत होते. मोठ्या जिद्दीने ते तपश्चर्येत उतरले होते. मगध देशातील वनश्रीने सजलेली ही भूमी 'तपस्याभूमी' म्हणून ओळखली जात होती. सिद्धार्थाने घोर तपश्चर्येचा निर्धार केला.

सिद्धार्थाच्या आयुष्यातील अतिशय उग्र तपश्चर्येला प्रारंभ झाला. दररोज तो ओंजळभरच अन्न खाऊ लागला. पुढे दिवसातून एकदा आणि पुढे पुढे आठवड्यातून एकदाच तो अन्न खाऊ लागला. पुढे तर भिक्षेसाठी जाण्याऐवजी हिरव्यागार गवतासारख्या वनस्पती, ज्वारी-बाजरीसारखे नुकतेच उगवू पाहणारे धान्याचे कोंब, पाण्यातल्या वनस्पती आणि अजूनही असेच काही खायला त्याने सुरुवात केली. वाऱ्याने हलून झाडावरून पडलेली फळे, कंदमुळे किंवा रानटी फळे शोधून तो खाऊ लागला. अन्नापासून दूर दूर जाऊ लागला. डोक्यावरचे आणि दाढीचे केस त्याने हाताने उपटून टाकले. उभा राहिला की सतत उभाच राहायचा आणि मांडीचे आसन करून बसला की तसेच बसायचा. वैराग्याच्या एकेक पायऱ्या तो चढू लागला. अन्न आणि वस्त्र, अंघोळ त्याने सोडून दिली. तो जळालेल्या हाडांची उशी करे, उन्हा-पावसात, थंडी-वाऱ्यातही त्याने फक्त वैराग्याचा मार्गच पकडला. अन्न आणखी कमी करत त्याने ते तांदूळ किंवा डाळीच्या एका कणावर आणले. त्याने प्रचंड दुःख, यातना, पीडा भोगायला सुरुवात केली. त्याचे पोट मागे मागे जाऊन छातीला भिडले. चामड्याच्या मागे लपलेली शरीरातील सर्व हाडे दिसू लागली. प्रचंड अशक्तपणा जाणवू लागला. शरीरात त्राण राहिले नाही. ज्याची आस लागली होती त्या ज्ञानाचा उजेडही कोठे दिसेना. एवढे वैराग्य स्वीकारून, शरीराचा एवढा छळ करून, अन्न-वस्त्रांचा त्याग करून, सर्व तीव्र ऋतू झेलूनही काही घडत नव्हते. सिद्धार्थाच्या मनात प्रचंड अस्वस्थता, प्रचंड घालमेल चालू होती. तो जणू काही जगण्या-मरण्याच्या अरुंद सीमेवर पोहोचला होता. श्वासांचे आयुष्यही कमी झाल्यासारखे वाटत होते आणि हृदयाची स्पंदने, रंध्रे थंडावत चालल्यासारखी वाटत होती. डोळे खोल खोल

गेले होते. कोणे एकेकाळी अतिशय सुंदर, बलवान, सुंदर शरीरयष्टी आणि राजबिंडा असलेला सिद्धार्थ सापळ्यासारखा दिसू लागला. देहदंडन केल्याशिवाय मोक्षाकडे जाणार नाही, या सिद्धांताच्या सापळ्यातच तो अडकला होता. अनेकदा त्याला चक्कर यायची. तो कोसळायचा. पुन्हा वनस्पतींचा आधार घेऊन उभा राहायचा. कधी बेशुद्धावस्थेत जायचा.

एके दिवशी नेहमीप्रमाणे झाडाखाली चिंतनात मग्न झालेला असतानाच त्याच्या कानांवर कोठून तरी सतारीचे अतिशय गोड बोल येऊ लागले. डोळे न उघडताच ते तो ऐकू लागला. स्वरांच्या दिशेने कान टवकारले. सूर पसरवणारे वाद्य सतार होते की आणखी काही, याचाही विचार त्याला करावासा वाटला नाही. जे काही सूर होते ते त्याच्या मनात आणि काळजात खोल खोल जाऊ लागले. त्याच्या संवेदना बनू लागले. त्याला काहीतरी सांगू लागले. पुढे या स्वरांत तेवढेच गोड शब्द मिसळू लागले. कोणी तरी वनकन्या, कोणी तरी आदिवासी कन्या, कोणी तरी जंगलकन्या गाणे म्हणत जात असाव्यात. सतारीच्या स्वरांत त्या आपले गोड शब्द मिसळत होत्या. एक अवीट गोडीचे गाणे जन्माला येत होते.




त्या म्हणत होत्या, 'सतार खूप उंच लावू नका म्हणजे तिच्या तारा खूप उंच नेऊन ताणू नका आणि खूप तळाला नेऊ नका म्हणजे सैलही सोडू नका. सतार अशा एका अवस्थेत ठेवून वाजवली, की तिच्यातून बाहेर पडणारे बोल ऐकणाऱ्यांची मने जिंकून घेतात. त्यांना आपल्याकडे खेचतात. त्यांचे मन काबीज करून टाकतात. पण बरोबर त्याच्या उलटे झाले तर? म्हणजे सतारीच्या तारा खूपच ताणल्या की त्या तुटतात आणि खूपच सैल सोडून दिल्या की सतारीचा आवाजच बंद होतो. ती मुकी होते. सतारीच्या आवाजातील सौंदर्य-गोडवा खलास होतो.'

वनकन्या सांगत होत्या की, सतार सुंदर वाजवायची असेल तर ती मध्यम मार्गावर आणून ठेवायला हवी. फार ताणायची नाही आणि फार सैलही सोडायची नाही.

सिद्धार्थाने या लोकगाण्यातून जो बोध घ्यायचा तो घेतला असावा. आपण तपश्चर्येच्या, शरीरक्लेशाच्या मागे लागून स्वतःलाच गमावले तर काय उपयोग? अशा अवस्थेत काही ज्ञान मिळाले तरी त्याचा काय उपयोग? मिळालेले ज्ञान सांगण्यासाठी आपणच जिवंत राहणार नसू तर काय उपयोग? काहीतरी वेगळे असायला हवे. टोकाचे नको. या विवेचनाचा अर्थ असा नव्हे की, वनकन्यांनी गायिलेल्या गाण्यामुळे सिद्धार्थाला हे सुचले! मार्ग शोधण्यासाठी, ज्ञानाचा वेध घेण्यासाठी त्याची लढाई तर कधीपासून चालली होती. सिद्धार्थ स्वतःच असंख्य प्रश्न बनायचा, तोच या प्रश्नांची उत्तरे द्यायचा. त्याला हवे तसे उत्तर मात्र मिळत नव्हते. पण त्याने प्रयत्न मात्र सोडलेला नव्हता. या सर्व बाबतची घालमेल आणि तो उत्तरांकडे सरकला आहे किंवा उत्तर त्याच्याकडे सरकले आहे याबाबतचे एक सुंदर प्रतीक कृष्णराव अर्जुन केळूसकर यांनी तयार केले आहे ते त्यांच्या 'गौतम बुद्धाचे चरित्र' या ग्रंथात (पान ६९-७०) आहे. विशेष म्हणजे, बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांच्या विद्यार्थी अवस्थेत हेच चरित्र केळूसकर यांनी एका समारंभात भेट दिले. एका अर्थाने पुस्तकरूपी बुद्धच सापडला. बाबासाहेबांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपुरात आपल्या लाखो बांधवांसमवेत धम्म स्वीकारला. आपल्या बांधवांसाठी 'बुद्ध आणि त्याचा धम्म' हा ग्रंथ लिहिला. त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर १९५७ मध्ये तो प्रसिद्ध झाला. बाबासाहेबांचा हा ग्रंथ म्हणजे जणू काही एक महाकाव्यच म्हणावे लागेल. सुलभ पण सुंदर भाषा आणि प्रतिभेचा सुंदर संचार या ग्रंथात पाहायला मिळतो.

तपश्चर्येच्या काळात सिद्धार्थाची म्हणजे बोधिसत्त्वाची घालमेल मांडताना बाबासाहेबांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे की, सहा वर्षांच्या कठोर आणि उग्र तपश्चर्ये नंतर त्याचा देह इतका क्षीण आणि दुर्बल बनला, की त्याला हालचाली करता येईनात. त्याला प्रकाशाचा कवडसाही दिसत नव्हता. हा काही ज्ञानप्राप्तीचा किंवा तृष्णामुक्तीचा मार्ग असू शकणार नाही, असे सिद्धार्थाला वाटू लागले. उजेडाकडे जाण्यासाठी घेतलेली झेप, केलेले प्रयत्न यांना सिद्धार्थाने दोषी ठरवले नाही; पण हा पंखांशिवाय, आधाराशिवाय आकाशात उडण्याचा प्रयत्न आहे. शरीराला पीडा देणे, त्याला क्लेशाच्या चक्रव्यूहात पिळून काढणे याला धर्म कसे म्हणता येईल? काहीतरी वेगळे असायला हवे. जे आपल्याला सापडत नाही असे काही वेगळे असायला हवे. देहाला प्रचंड पीडा देऊनही ते दिसत नाही. देहपीडा आणि त्याचा काही संबंध असेल का? असा संबंध नसावा, असे सिद्धार्थाला वाटू लागले. शरीराला पीडा देऊन काही साध्य होणार नाही. पीडा देण्याच्या कार्यात विचार कुठे असेल आणि विचाराशिवाय हा मानवी देह कुत्र्यासारखा आहे. त्याला काही महत्त्व नाही आणि पावित्र्यही नाही. जो मुळातच भूक-तहानेने व्याकूळ, अतिकष्टाने आणि पीडेने भरलेले शरीर घेऊन त्रस्त आणि अतिदुबळा झाला आहे. शक्ती गमावून बसला आहे. ज्याचे चित्त शांत नाही अशा माणसाला उजेड कसा दिसणार? शेवटी सिद्धार्थाने तपश्चर्ये तून बाहेर पडायचे ठरवले. त्याने सुजाताने दिलेली खीर खाल्ली. तत्पूर्वी नदीत स्नान केले. तपश्चर्येसाठी बसलेला सिद्धार्थ तपश्चर्या सोडताना पाहून त्याच्याबरोबरचे पाच तपस्वी त्याला सोडून आणि दोष देऊन निघून गेले. अन्नग्रहण करून प्रफुल्लित झालेल्या सिद्धार्थाने सुजाताच्या सेविकेने आणलेले अन्नाचे भांडे निरंजना नदीत सोडले. मला जर ज्ञानप्राप्ती होणार असेल तर हे भांडे नदी प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने जाईल आणि ज्ञानप्राप्ती होणार नसेल तर ते प्रवाहातीत होऊन प्रवाहाबरोबर जाईल. भांडे प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने वाहत गेले. (बुद्ध आणि त्याचा धम्म, डॉ. आंबेडकर, पान ६०, प्रकाशक :

राइट थिंकर्स).

सिद्धार्थ उरुवेलातून गयेकडे गेला आणि पिंपळ वृक्षाखाली पद्मासन घालून बसला. आता आपले शरीर रक्तामांसाशिवाय कोरडे झाले काय किंवा देहावर त्वचा उरली नाही, मज्जा, हाडे उरली नाहीत तरी हे स्थान सोडून देणार नाही, असा निर्धार करून त्याने ४० दिवस ध्यानसाधना केली. आपल्या अंतर्जगाचे जणू काही मैदान करून लाखो मारांशी युद्ध केले. ज्ञानप्राप्तीसाठी त्याला चार आठवडे लागले. या कालावधीत त्याचा विवेक, एकाग्रता, मनोनिग्रहाशी संयोग झाला. समचित्ताचा मनोनिग्रहाशी आणि पावित्र्याचा समचित्ताशी संयोग झाला.

सिद्धार्थ उजेडात न्हाऊन निघत असताना आणि आपल्याला काहीतरी गवसले आहे, या भावनेत असताना माराच्या एका योद्ध्याने त्याला प्रश्न विचारला, 'हे बोधिसत्त्वा, तू दानपारमिता पूर्ण केलीस याला साक्षी कोण?' त्यावर बोधिसत्त्व आपला उजवा हात पृथ्वीकडे करून म्हणाला, 'हे मार, (किंवा मारा) माझ्या पुण्यकर्माला इथे कोणी जिवंत साक्षीदार मिळणे कठीण आहे; पण ही सर्व सहाव्यापी वसुंधरा माझ्या पुण्यकर्माला साक्ष देईल.' (बुद्ध चरित्र, धर्मानंद कोसंबी, पान ६१). बोधिसत्त्वाने हे शब्द उच्चारताच भयंकर गर्जना झाली. पृथ्वी दुभंगली. त्यातून एक सुंदर देवता प्रकट झाली. ती माराला म्हणाली, 'होय मारा, मी बोधिसत्त्वाच्या पुण्यकर्माला साक्षी आहे. आता पुन्हा साक्ष काढू नकोस. याने याचकाच्या हातावर सोडलेल्या पाण्याने भिजलेले माझे केस अद्याप ओले आहेत.' शेवटी वसुंधरेने आपले ओले केस पिळताच पाण्याचा एक प्रचंड मोठा महापुरासारखा प्रवाह तयार झाला. तो इतका जोरदार होता, की मार, त्याची सेना आणि त्यांचा गिरिमेखल हत्तीही वाहून गेला. मार पुरते नष्ट झाले किंवा सिद्धार्थाकडून युद्धात पराभूत होऊन गेले. सिद्धार्थ आता बुद्ध झाला होता. उजेडाचा नवा आविष्कार झाला होता. तो कोणत्याही माराशिवाय जगणार होता. बुद्ध एक विचार, एक मार्ग बनला होता. असा मार्ग जो त्याने स्वतःच बनवला होता. असा मार्ग जो त्याच्या पावलांतून तयार झाला होता. असा मार्ग जो मारसेनेच्या पराभवातून तयार झाला होता. असा मार्ग पृथ्वीच्या पाठीवर प्रथमच तयार झाला होता. ज्या मार्गावर फक्त बुद्धाचीच पावले होती. रस्त्याच्या दुतर्फा उभी राहिलेली झाडे तोच होता. झाडांची रम्य सावलीही तोच होता. अथांग पसरलेल्या निळ्याशार आकाशात चकाकणारे तारे तोच होता. तोच होता प्रकाश आणि वाटेवरचे मैलाचे दगड! आता त्याला अंधाराची भीती नव्हती. कोठून उसना उजेड घेण्याची गरज नव्हती. तो स्वतःच उजेड बनला होता. त्याच्या अंतरंगातील रंध्रारंध्रांचे रूपांतर लाखो दिव्यांत झाले होते. त्याची पावले उजेड, त्याच्या सावल्या उजेड, त्याची दृष्टी उजेड, त्याचे स्मित उजेड, त्याचे शब्द उजेड... एक विलक्षण उजेड पृथ्वीतलावर अवतरला होता. स्वतःतल्या सर्व विकारांवर, मारांवर, तृष्णेवर, लालसेवर मात करणारा मुक्त उजेड होता. इतर ग्रहांना लागते तसे ग्रहण या उजेडाला लागणार नव्हते. अखंड तेवत राहणारा, हवाहवासा, मंद, स्निग्ध असा हा उजेड सारे जग पाहणार होते. हा नवा ज्ञान उजेड, शील उजेड बघण्यासाठी देवलोकांनी पिंपळाच्या वृक्षाखाली गर्दी केली. खरे तर एव्हाना पिंपळाला नवे अजरामर नाव मिळाले होते- बोधिवृक्ष



! या बोधिवृक्षाखाली जमलेल्या देवदेवतांनी बुद्धावर फुले उधळली. त्याचा जयजयकार केला. त्याच्यासमोर ते नम्र झाले. पृथ्वीवर देवदेवतांचा जन्म काही नवा नव्हता; पण स्वतःला विकारमुक्त, भयमुक्त, लालसामुक्त, स्वार्थमुक्त करून जन्माला आलेला बुद्धरूपी उजेड विरळाच होता. हा सर्व उत्सव बघून बुद्ध स्वतःशीच पुटपुटला, असे कोसंबींनी लिहिले आहे. त्यांनी बुद्धाच्या या उद्गाराचा मराठी अनुवाद केला आहे. (बुद्धलीला सार संग्रह, पान ६२)

अनेकजातिसंसारं संघविस्सं अनबिस्सं गहकारकं गवेसन्तो दुकखा जाति पुनप्पुनं।

गहकारकं दिट्ठोऽसि पुन गेइं नकाहसि सब्बा ते फासुका
भग्गा गहकूटं विसंखितं विसंखारगतं चितं तन्हानं स्वयमज्झगा।

**जन्मजन्मींची संसृती अपार,**
**धावता मी पावलो कष्ट अपार,**
**कोण कर्ता या देह मंदिराचा,**
**श्रांत झालो लाविता शोध याचा**
**बोध कर्त्याचा आज मला झाला,**
**पुनः घरटे बांधिता नये त्याला**
**सर्व त्याची साधने झालि भिन्न,**
**देहगेहाचें कूट तसे छिन्न,**
**टाकुनिया संस्कार चित्त माझे,**
**लोभ तृष्णेचे दूर कमी ओझे,**
**मार सेनेची भीती नसे आता**
**ज्ञानलाभ होईल जगताला**

उजेड बनलेल्या बुद्धाने स्वतःच स्वतःला हे सांगितले आहे. ज्ञानप्राप्तीच्या प्रक्रियेत त्याचे काय आणि कसे झाले, याचे एक सुरेख वर्णन या स्वसंवादात आहे. खरे तर स्वतःच स्वतःशी बोलणे श्रेष्ठ, सुंदर आणि विलोभनीय असते. बुद्ध बऱ्याच वेळा त्याच्या सुंदर स्मितातून, आसनातून, टपोऱ्या डोळ्यांतून, रुंद कपाळातून, हाताच्या लांबसडक बोटांतून बोलत असतो. अनेकदा हे बोलणे शब्दांपेक्षा

सामर्थ्यवान ठरते.

ज्ञानप्राप्तीपूर्वी सिद्धार्थ गौतम बोधिसत्त्व होता. ज्ञानप्राप्तीनंतर तो बुद्ध झाला असे सांगत डॉ. बाबासाहेब म्हणतात की, जीवनाच्या दहा स्थित्यंतरांतून बोधिसत्त्व पुढे जात असतो. त्या अवस्था संक्षिप्त स्वरूपात अशा :

१) पहिल्या अवस्थेत स्वतःतले विकार काढण्याच्या प्रयत्नात तो आनंदी होतो. ढगांतून बाहेर पडलेल्या चंद्राप्रमाणे तो प्रकाश देतो. २) दुसऱ्या अवस्थेत त्याला विमलता म्हणजे शुद्धता प्राप्त होते. ३) तिसऱ्या अवस्थेत त्याची बुद्धी आरशासारखी स्वच्छ झालेली असते. तो स्वतः तेजस्वी बनतो. ४) चौथ्या अवस्थेत तो विलक्षण बुद्धी प्राप्त करून घेतो. ५) पाचव्या अवस्थेत तो विजयी होण्यासाठी परिस्थिती प्राप्त करून घेतो. ६) सहाव्या अवस्थेत तो अभिमुखी होतो. या ज्ञानामुळे अविद्येने अंध झालेल्या सर्व प्राणिमात्रांविषयी त्याच्या अंतःकरणात अगाध करुणा उत्पन्न होते. ७) सातव्या अवस्थेत तो अनंताशी एकरूप होतो. जगातील मोहांपासून दूर होतो. ८) आठव्या अवस्थेत त्याला धर्माचे ज्ञान होते. सन्मानावरून त्याला कोणी परावृत्त करू शकत नाही. ८) आठव्या अवस्थेत तो अचल होतो. जे जे चांगले ते करण्यात तो यशस्वी होतो. ९) नवव्या अवस्थेत तो साधुमति म्हणजे कालातीत होतो. १०) दहाव्या अवस्थेत त्याला दिव्यदृष्टी प्राप्त होते. बोधिसत्त्वाचा बुद्ध होतो.

ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर बुद्ध पुन्हा एका पेचात अडकतो. अर्थात, हा पेच बाहेरून तयार झालेला नाही, तर त्याच्या मनातच तयार झालेला आहे. काही करावे की न करावे, आपल्याला जे प्राप्त झाले आहे ते लोकांना सांगावे की न सांगावे, दुसऱ्याला उपदेश करावा की स्वतःला पूर्णावस्था प्राप्त करून घेण्यासाठी आयुष्य खर्च करावे, आपल्याला लाभलेले तत्त्वज्ञान सामान्य माणसालाच नव्हे, तर बुद्धिमान माणसाला हे लवकर कळणार नाही किंवा त्याला ते आचरणात आणता येणार नाही, परमेश्वर आणि आत्मा यातून सुटका करून घेणे, श्रद्धेचा त्याग करणे, कर्मवादापासून मुक्तता करून घेणे, आत्म्याला स्वतंत्र अस्तित्व नाही आणि तो मृत्यूनंतर अस्तित्वात राहत नाही हा माझा सिद्धांत मान्य करणे लोकांना कठीण जाईल, स्वार्थ सोडून सदाचरणाचा मार्ग पकडणे सामान्य माणसाला कठीण जाईल, जर मी लोकांना शिकवण दिली आणि ती त्यांना समजली नाही, जर समजल्यावर त्यांनी मान्य केली नाही आणि मान्य करूनही त्यांनी आचरणात आणली नाही तर त्यांना आणि मलाही त्रासच होईल. त्याऐवजी जगापासून दूर राहून, एक संन्याशीच बनून मी स्वतःचे तरी कल्याण करून घेऊ शकेन, कशाला बोलू मी? बुद्धाच्या मनात जे तीव्र स्वरूपाचे द्वंद्व सुरू होते त्याला 'विषादयोग' म्हणतात. माणूस एका मोठ्या गुंतागुंतीच्या पेचात अडकतो. 'होय किंवा नाही' याच्या कात्रीत सापडतो. बुद्धाची ती अवस्था पाहून ब्रह्म सहंपती विचार करतो की, खरोखरच जग नष्ट होत असल्याच्या काळात जर सम्यक बुद्ध निष्क्रियतेकडे झुकतील तर जगाचा विनाश होईल. ब्रह्म सहंपती परत परत बुद्धाला विनंती करतो, आळवतो, प्रार्थना करतो, विषादयोगातून बाहेर पडण्यासाठी वेगवेगळी उदाहरणे देऊन विनंती करतो. पर्वत-शिखरावर उभा राहणारा माणूस ज्याप्रमाणे खाली उभ्या असलेल्या भोवतालच्या लोकांकडे पाहतो, त्याप्रमाणे प्रज्ञेच्या शिखरावर उभ्या असणाऱ्या भगवंताने दुःखाच्या सागरात बुडालेल्यांकडे बघावे. 'हे विजयी वीरा उठ, जगाकडे जा. पाठ फिरवू नको...' - बुद्धाने शेवटी ब्रह्म सहंपतीची विनंती मान्य केली आणि आपली शिकवण जनतेला देण्याचा निश्चय केला.

बुद्ध शिकवण देणार, ही गोष्ट ब्रह्म सहंपती ओरडून सांगत होता. धावत होता. जगातील सर्व दुःखी लोकांनो, जगण्यासाठी झगडणाऱ्यांनो, न्यायासाठी तळमळणाऱ्या जिवांनो, शुभवार्ता ऐकून आनंदी व्हा... जखमी झालेल्यांनी आपल्या जखमा बऱ्या झाल्या असे समजावे, भुकेले राहिलेल्यांनी आपले पोट भरले असे समजावे, तहानलेल्यांनो आपली तहान भागवून घ्या. बुद्धाचा धम्म म्हणजे सत्य, पूर्ण सत्य, केवळ सत्य आहे. जगातील सर्व दुःखांचे आणि पापांचे मूळ बुद्धांनी शोधून काढले आहे. त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग त्यांना सापडला आहे. ब्रह्म सहंपती मोठ्या आनंदाने हे सारे सांगत सुटला होता. असंख्य विनंत्या करून त्याने बुद्धाला विषादयोग सोडण्यास भाग पाडले होते.

बुद्ध शिकवण देण्यास तयार झाला. आपल्याला मिळालेले ज्ञान, तत्त्वज्ञान हे लोकांसाठीच आहे. ते त्यांच्याच मालकीचे आहे. त्याद्वारे आपल्याला एक नवा समाज, नवा माणूस घडवायचा आहे, असा निर्धार बुद्धाने केला. सारे आयुष्य याचसाठी खर्च करण्याचे ठरवले. बुद्ध म्हणजे ज्ञानाचा नवा सूर्य. जगाच्या भल्यासाठी तो आता मंद किरणांनी झळाळणार होता. सारे जग बुद्धाच्या पहिल्या प्रवचनाची वाट बघत होते.

प्रवचन देण्याचा म्हणजे आपल्याला जे काही अतिशय खडतर प्रवासात, चिंतनात लाभले आहे ते जनतेसमोर व्यक्त करण्याचा निर्णय तर झाला; पण सर्वप्रथम कुणाला उपदेश करायचा, कुणाला शिकवण द्यायची, कुणाला सांगायचे, हा प्रश्न होताच. शिवाय कसे व्यक्त व्हायचे, हाही प्रश्न होताच. जेव्हा एखाद्याला नवे काही लाभते ते व्यक्त करण्यासाठी जुनी भाषा चालत नाही. त्यासाठी नवी भाषा, नवी शैली कमवावी लागते. तसे झाल्याशिवाय मौनातून प्रवचनाकडे वळता येत नाही. सामान्याला समजेल अशी साधी, सोपी आणि सुंदर भाषा, सामान्यांची शैली, त्यांच्या पर्यावरणात खोल खोल शिरणारी आणि त्यांचे मन घेऊन वर वर येणारी भाषा आवश्यक असते. आतापर्यंत ज्यांनी ज्यांनी ज्ञान संपादन केले, ते ते त्यांनी अवघड भाषेत सांगितले. लोकांना न समजणाऱ्या संस्कृतमधून, वेदांमधून सांगितले. बुद्ध तसे करणार नव्हता. खळाळती, प्रवाही, सोपी आणि सामान्यांची जीवनशैली किंवा त्यांच्या जीवनाचे अविभाज्य अंग बनलेली भाषा तो वापरणार होता. जे जे साधे असते ते सुंदर आणि सामर्थ्यवान असते, तेच नैसर्गिक असते, हे तत्त्व जर मान्य केले तर बुद्धाची शिकवण किती सुंदर आणि सामर्थ्यशाली भाषेत होती, हेही आपल्या लक्षात आल्यावाचून राहत नाही. तर मग बोलायचेही ठरले आणि तेही लोकांच्या काळजात वास करणाऱ्या भाषेत बोलायचे ठरले. पण सर्वप्रथम ही अमृतवाणी, नवजीवनवाणी, तत्त्ववाणी कुणासमोर व्यक्त करायची, हा प्रश्न तयार झाला. त्यावर बुद्धानेच उत्तर शोधले.

बुद्धाने सर्वप्रथम आलरकालामचा विचार केला. त्याच्या मते आलरकालाम विद्वान, शहाणा आणि चांगले आचरण करणारा होता.

त्याचा शोध घेता कळले, की तो निधन पावला आहे. असाच अनुभव उद्दक रामपुत्ताच्या बाबतीतही आला. दुर्दैवाने त्याचेही निधन झाले होते. त्यानंतर बुद्धाच्या समोर उभे राहिले ते त्याचे जुने पाच सोबती. नैरंजना नदीवर तपश्चर्येच्या काळात त्यांनी बोधिसत्त्वाला मदत केली होती. काळजी घेतली होती. शोध घेतला असता कळले, की ते सारनाथला ऋषिपतनाच्या मृगदाय वनात राहत आहेत. बुद्ध तेथे गेला. तपश्चर्या सोडून गेलेला माणूस म्हणून प्रारंभी या पाच जणांनी बुद्धाचा तिरस्कार केला. त्याला मानसन्मान द्यायचा नाही, असे ठरवले. पण ज्ञानपुरुष बनलेल्या, उजेड बनलेल्या बुद्धाचा त्यांच्यावर इतका परिणाम झाला, की त्यांनी आपला निर्णय बदलला. बुद्धाच्या चेहऱ्यावरून वाहणाऱ्या तेजात त्यांनीही न्हाऊन घेण्याचा निर्णय केला. या पाच जणांशी बुद्धाची आपल्याला ज्ञानप्राप्ती कशी झाली, त्याचे स्वरूप कसे आहे, दुःख काय, मध्यममार्ग काय, तपश्चर्या आणि आत्मपीडा व्यर्थ कशी आहे, केव्हाही दोन अतिरेकी टोके टाळावीत आणि मध्यममार्ग स्वीकारावा आदी गंभीर विषयांवर चर्चा झाली. माझा धम्म मार्ग मीच शोधून काढला आहे आणि म्हणूनच मी कोणाचा शिष्य आहे हे मला सांगता येणार नाही, असे बुद्ध म्हणाला. ही गोष्टही खूप महत्त्वाची आहे. कोणत्याही गुरूशिवाय बुद्धाने नव्या ज्ञानाचा शोध लावला होता. तोच स्वतःचा गुरू आणि स्वतःचा शिष्य बनला होता. त्याने स्वतःलाच असंख्य प्रश्न विचारले होते आणि स्वतःच त्यांची उत्तरे दिली होती. उत्तरे चूक की बरोबर, हे स्वतःच तपासले होते. सर्व काही तो स्वतःच होता.

पहिल्या प्रवचनात बुद्धाने आपल्या धम्माचे सार वेगवेगळ्या टप्प्यांत सांगितले. त्याविषयी तयार होणाऱ्या आणि त्या पाच परिव्राजकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरेही त्यांनी दिली.

जगातल्या सर्व धर्मांचा म्हणजे धम्माचा उच्चार होईपर्यंतच्या आणि नंतर आलेल्या धर्मांचा देवाशी, आत्म्याशी संबंध असतो. मरणानंतरही जगता यावे यासाठी आत्म्याला जन्माला घातले गेले आहे. स्वर्ग-नरक यांसारख्या कल्पना जन्माला घातल्या आहेत. बुद्धाचा धम्म यापैकी काहीही मान्य करत नाही. देव, आत्मा वगैरे गोष्टींपासून तो धम्माला अलग ठेवतो. ज्याला प्रारंभ आहे त्याला शेवट आहे, असे तो सांगतो. मरणोत्तर जीवनाशी धम्माला काही देणेघेणे नाही. कर्मकांडांशी घेणेदेणे नाही. धम्म प्रारंभापासून शेवटापर्यंत फक्त माणसाभोवती फिरतो. माणूस हाच त्याचा केंद्रबिंदू आहे. माणूस आणि माणसाशी असलेले त्याचे नाते याचाच तो विचार करतो. माणसाच्या अंतरंग आणि बाह्यरंगाला तो भिडतो. तो आतून विचार करायला लागतो आणि त्याची दृश्ये बाहेर पाहायला सांगतो. धम्म असा जगातला पहिला आहे, की ज्याचे अधिष्ठान माणूस आहे. बुद्ध त्याला आपल्या धम्माचे पहिले अधिष्ठान आहे, असे सांगतो.

सारे जग आणि त्यातील माणूस सतत एकाच गोष्टीने त्रस्त असतो. ती गोष्ट म्हणजे दुःख! दुःख कोणालाच नको असते. ते चुकवण्यासाठी पृथ्वीवरच्या माणसांनी आणि त्याच्या धर्मांनी नाना तऱ्हेचे प्रयत्न सांगितले. दुःखाचा जन्म वेगवेगळ्या ठिकाणी शोधला. पाप-पुण्य, पूर्वजन्म-पुनर्जन्म, स्वर्ग-नरक, आत्मा-परमात्मा, जात-पंथ वगैरे अनेक गोष्टींना दुःखाचे गर्भाशय म्हणून सांगितले जात होते. दुःखातून सुटका करून घेण्यासाठीही वेगवेगळे चित्रविचित्र मार्ग सांगितले जात होते. दुःखातून मुक्त होण्यासाठी सर्वांची धडपड होती; पण त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग सापडत नव्हता. बुद्धाने आपल्या पहिल्याच प्रवचनात दुःखाची चिकित्सा करून त्याविषयीचा सिद्धांत मांडला. 'चार आर्यसत्ये' या नावाने तो जगभर पसरला. दुःख असतेच आणि त्यापासून कोणाला पळ काढता येत नाही. दुःख वास्तव असते, केवळ कल्पना नसते. दुःख जीवनाच्या सर्वच भागांत पुरून उरलेले असते. दुःख असते एवढेच मान्य करून चालत नाही, तर त्यामागे कारणे असतात. ही कारणेही वेगवेगळी असतात. जन्म-मरण, लालसा, पीडा अशी असंख्य कारणे असतात. कारणे असतात एवढेच मान्य करून चालत नाही, तर ती नष्टही करता येतात आणि अर्थातच नष्ट करण्याचे मार्ग असतात. दुःखावर उतारा सांगणारी आणि माणसाला दुःखमुक्तीचे आश्वासन देणारी ही चार तत्त्वे आहेत. आर्यसत्ये आहेत. हीच तत्त्वे धम्माचा पाया आहेत. या अतिशय मूलभूत गोष्टी आहेत. माणूस सतत दुःखाच्या आसपास, आत-बाहेर जगत असतो. कधी तो दुःख चुकवण्याचा, तर कधी ते पचवण्याचा प्रयत्न करतो. प्रश्न दुःखाचे अस्तित्व मान्य करण्याचा, त्याची कारणमीमांसा करण्याचा आणि ते नष्ट करण्याचा आहे. ज्यावर धम्माने सर्वप्रथम मार्ग सांगितला. जगभर धम्म पसरण्याला हे तत्त्वज्ञानच उपयोगी ठरले आहे. बुद्ध 'दुःखापासून दूर पळा' असे सांगत नाही, तर ते संपवण्याचे मार्ग सांगतो आणि ते संपवता येते याचे सुंदर आश्वासन देतो. जे यापूर्वी कोणी केले नव्हते. या अतिशय प्राथमिक वाटणाऱ्या गोष्टींचा जो धर्म स्वीकार करत नाही तो धर्मच नाही, असे बुद्ध सांगतो. अगदी आग्रहाने सांगतो.

दुःख नष्ट करता येते आणि त्याचे मार्ग आहेत एवढ्यावरच बुद्ध थांबला नाही, तर त्याने नेमकेपणाने दुःखमुक्तीचे मार्ग सांगितले. जो पावित्र्याचा, चांगले आचरण करण्याचा आणि शीलमार्गाचा अवलंब करतो तो दुःखमुक्तीकडे जातो. म्हणजेच या तीन तत्त्वांतून दुःखमुक्तीकडे जाता येते. म्हटले तर हा अतिशय सोपा मार्ग आहे. कुणालाही तो स्वीकारता येतो. जात-पात, गरीब-श्रीमंत, उच्च-नीच, स्त्री-पुरुष, बालक-म्हातारा असे कसल्याच प्रकारचे बंधन नाही. जो जो माणूस आहे तो तो दुःखमुक्तीच्या मार्गावरून चालत जाऊ शकतो. इथे कुणाच्या नावाने गंडादोरा बांधायचा नाही, कोणत्या अमानवी शक्तींवर विश्वास ठेवायचा नाही. स्वतः चालत राहायचे आहे. कसल्याही कर्मकांडाच्या मागे न लागता चालत राहायचे आहे. या सगळ्याचा साधा-सरळ असा अर्थ होतो की, आपण कोणत्या वाटेवरून चालतो यावरच आपण कुठे पोहोचणार, हे ठरणार असते. रस्ता महत्त्वाचा. चालत राहणे महत्त्वाचे. मुक्कामाचे ठिकाण कोणते आणि तेथे काय आहे, हे पाहणेही महत्त्वाचे. बुद्धाने याबाबतीत माणसाला परावलंबी ठेवलेले नाही, तर त्याला स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न केला आहे. माणसाला परावलंबी, दैववादी, कर्मकांडवादी बनवणाऱ्या सर्व गोष्टी अगदी खरडून खरडून काढल्या आहेत. त्यामुळेच बुद्धाचे पहिले प्रवचन निखळ माणसासाठीचे आणि त्याच्या उद्धारासाठीचे ठरते. हा उद्धार केवळ भौतिक किंवा वस्तुवादी नाही, तर तो माणसाचे माणूसपण आणि त्याचे स्वत्त्व जागवणारा आणि त्याचेच मंगलगीत गाणारा आहे. **.... (उर्वरित भाग पुढच्या अंकात)**

# ॥ एक अभिजात आत्मकथन ॥




इंद्रजित भालेराव

काळ्यानिळ्या रेषा म्हणजे माराचे वळ. राजू बाविस्कर आणि त्यांच्या समाजाला प्रस्थापित व्यवस्थेकडून जे भोगावं लागलं त्याचे आयुष्यावर उठलेले वळ म्हणजे हे आत्मकथन. वळ कुरवाळण्यातही एक सुख असतं. या लेखनातून ते सुख लेखकाला नक्कीच मिळालं असणार. शिवाय लेखक हा दुःखदारिद्र्याचा ख्यातिप्राप्त चित्रकार आहे. त्या अर्थानंही त्याच्या चित्राच्या रेषा या काळ्यानिळ्या रेषाच आहेत.

अर्थात, हे लेखन म्हणजे पारंपरिक दलित आत्मकथनासारखं दुःखाचं रडगाणं नाही. सुरुवातीच्या काही दलित आत्मकथनांना हे रडगाणं शोभूनही दिसलं; पण चतुर प्रकाशकांनी व्यवसाय यशस्वी करण्याचं साधन म्हणून काही लेखकांना हे रडगाणं गायला लावलं तेव्हा मात्र ते आरण्यरुदन झालं. त्यामुळंच पुढं दलित आत्मकथन लेखनाला उतरती कळा लागली. या पार्श्वभूमीवर आलेलं हे 'काळ्यानिळ्या रेषा' म्हणजे एका चित्रकारानं घेतलेला आपल्या चित्रप्रतिमांचा शोध आहे. तिथंच या आत्मकथनाचं वेगळेपण आहे. आपल्या चित्रातून येणाऱ्या रेषा, आपल्या चित्रातून येणारे आकार, आपल्या चित्रातून येणाऱ्या प्रतिमा, आपल्या आयुष्यातल्या कुठल्या अनुभवातून झिरपत आलेल्या आहेत, हे जेव्हा राजू बाविस्कर सांगतात तिथं या आत्मकथनाची उंची वाढते. अशा जागा या लेखनात खूप आहेत.

हे आत्मकथन वाचताना बहिणाबाई चौधरी यांच्या कविता सतत आठवत राहतात. राजू बाविस्कर यांच्या आईचे संवाद वाचताना बहिणाबाईच बोलत आहेत, असं वाटतं. या बोलीतलं इतकं समर्थ गद्य याआधी माझ्यातरी वाचनात नव्हतं. इथं जे काही संवाद येतात त्यातून त्या भाषेचा गोडवा, आशय व्यक्त करण्याचं सामर्थ्य तर येतंच; पण त्यासोबतच या सामान्य माणसांना जगण्याचं सार कसं समजलं होतं तेही कळतं. बहिणाबाईंनी गद्य लिहिलं असतं तर ते असंच लिहिलं असतं. जगण्याचं तत्त्वज्ञान तिनंही गद्यात मांडलं असतं, हे लक्षात येतं. 'ही माझ्या एकट्याची कहाणी नाही. ती माझ्या संपूर्ण समाजाची कहाणी आहे' असं जरी दलित आत्मकथनं म्हणत असली तरी ते तसं नसायचं; पण हे आत्मकथन म्हणजे खऱ्या अर्थानं संपूर्ण समाजाची आणि समाजातल्या इतरांचीच कहाणी जास्त आहे. १०० ओळी लिहिल्या तर लेखक ९९ ओळी इतरांविषयी आणि एक ओळ स्वतःविषयी लिहितो. त्यामुळं यात आयुष्यात आलेल्या माणसांची इतकी व्यक्तिचित्रं आलेली आहेत की, जणू हे आत्मकथन नसून, हा एक व्यक्तिचित्रांचा संग्रह आहे, असंच वाटतं.




ही व्यक्तिचित्रं रेखाटताना लेखक ती इतकी रेखीव करतो, की ती एक स्वतंत्र अभिजात कलाकृतीच होऊन जाते. ही व्यक्तिचित्रं केवळ मातंग समाजाचीच नाहीत, तर ती भिल्ल, तडवी, सवर्ण समाजातल्या माणसांचीही आहेत. या व्यक्तिचित्रांतली प्रत्येक व्यक्ती आपल्या काळजावर ठसूनच बसते. या व्यक्तिचित्रांत निसर्ग आणि प्राण्यांचीही व्यक्तिचित्रं आहेत. झडी शीर्षकाचा लेख म्हणजे पावसाचं एक जिवंत व्यक्तिचित्रच आहे, तर खंड्या हा कुत्र्यावरचा लेख केवळ अप्रतिम झालाय. गोरगरीब माणसं मुक्या प्राण्यांना कसा जीव लावतात त्याचा प्रत्यय इथं येतो. शेळ्या, मेंढ्या, कुत्री, कोंबडी या प्राण्यांचं विश्व इथं सविस्तर साकार झालेलं आहे. शिवाय भिलाटीमागचा सातपुड्याचा पहाडही फार जिवंतपणे इथं येत राहतो. त्या पहाडाविषयी इथं आलेले सगळे संदर्भ एकत्रित जुळवून घेतले, तर त्यातून या पहाडाचंही एक व्यक्तिचित्र साकार होईल. इतर दलित आत्मकथनांत कधीच न येणारा, भला-बुरा, छळणारा-पोसणारा निसर्ग हे या आत्मकथनाचं

आणखी एक वैशिष्ट्य म्हणून आपणाला सांगता येईल.

झडी हा लेख फारच सुंदर उतरलाय. हा लेख वाचताना मला अनंतराव पाटील या खानदेशी लेखकाचं 'झडीचे दिवस' हे पुस्तक आठवू लागलं. पाटलांच्या पुस्तकात भिलाटी नावाचाही एक लेख आहे. बाविस्करांच्या आत्मकथनातही सतत भिलाटी डोकावत राहते. बाविस्करांनी झड इतक्या अंगांनी उभी केलीय, की या संग्रहातला तो सर्वांत मोठा म्हणजे २८ पानांचा लेख झालेला आहे. त्यात झडीचं वर्णन, झोपडीतलं वर्णन, गरिबांचे होणारे हाल, झडीविषयीच्या दंतकथा, कथा, किस्से, मंत्र, लोकगीतं, असा सर्व पसारा येतो, तेव्हा झड लेखकाच्या अंगांगात कशी मुरलेली आहे, तेच आपल्या लक्षात येत जातं.

बैलाचं आंड ठेचण्याचं मराठी साहित्यात कुठंच न आलेलं वर्णन इथं तपशीलवार आलेलं आहे. यानिमित्तानं येणारी आणखी एक गोष्ट इथंच नमूद करतो. इतर आत्मकथनासारखा कंठाळी आवाजातला विद्रोह इथं कुठंही दिसत नाही; पण नीट लक्ष देऊन वाचलं, तर इथला विद्रोहही अभिजात स्वरूपाचा आहे. बैल अंडी ठेचण्याचं वर्णन संपल्यावर लेखक म्हणतो, माजलेला गोऱ्हा अंडी ठेचण्याचं काम, आडदांड बैलाला पासलं पाडून बाप करायचा; पण बैलाच्या आडदांड मालकापुढं मात्र त्याची नांगी पडायची. त्यानिमित्तानं वडील कसे घाबरट होते आणि आई कशी धीट होती, ती वडिलांना वेळोवेळी कसं धैर्य द्यायची, तेही लेखकानं लिहिलं आहे.

खंड्या कुत्र्याच्या व्यक्तिचित्रातही या अभिजात विद्रोहाची चुणूक आपणाला पाहायला मिळते. हा तगडा कुत्रा सवर्ण वस्तीतल्या कुत्र्यांना सहज चीत करायचा, लोळवायचा; पण त्याचा मालक म्हणजे लेखकाचा बाप मात्र सवर्ण वस्तीतल्या माणसांपुढं सतत शेपूट घालायचा. या प्रत्येक वेळी बापानं विद्रोही व्हायला पाहिजे होतं, असं हा कोवळा नायक सुप्तपणे, सूचकपणे मांडत जातो.

या आत्मकथनातले अनुभव लेखक आठवतील तसे नुसता मांडत गेलेला नाही. त्यानं प्रत्येक अनुभवाचं चिंतन केलंय, त्यावर तात्त्विक भाष्य केलंय. प्रत्येक अनुभवाच्या चिंतनातून त्यानं जीवनाचं सार काढलंय. संपादक, प्रकाशकांनी मजकुराची मांडणी करताना त्या-त्या प्रकरणाचं सार सांगणाऱ्या चार ओळी प्रकरणाच्या सुरुवातीला टाकल्यात. त्यातून ती आठवण लिहिण्यामागचा लेखकाचा उद्देश आपल्या लक्षात येतो. बऱ्याचदा असं जगण्याचं सार लेखकाच्या आईच्या संवादातूनही आपणाला सापडतं. त्या-त्या वेळी लेखकाची आई आणि बहिणाबाई यांच्यातील साम्य आपल्या लक्षात येतं.

थोडाफार सुधारकी अवस्थेत जगणारा गाव आणि संपूर्ण आदिम अवस्थेत जगणारा मांगवाडा आणि भिलाटी यांचे सविस्तर तपशील लेखक देत जातो. जणू आदिम जंगल आणि गाव यांच्यातला दुवा म्हणजे मांग, भिल्ल आणि तडवी. ते जंगलात जातात, शिकार करतात, जंगली वस्तूपासून जीवनावश्यक साधनं तयार करून गावाला पुरवतात. वेळप्रसंगी चोऱ्यामाऱ्याही करतात. गिरिकंदारातल्या सिकंदर काका या तडवी माणसाचं एक सविस्तर व्यक्तिचित्र इथं येतं. तो एका बाजूला आदिमानव वाटतो आणि त्याचवेळी तो मोठा कलावंतही आहे. त्याचं लेखकानं उभं केलेलं व्यक्तिचित्र मोठं रसरशीत झालेलं आहे.

राजू बाविस्कर हे आता ख्यातकीर्त चित्रकार आहेत. त्यामुळे आतापर्यंत त्यांनी अनेक पुस्तकांची मुखपृष्ठं केलेली आहेत. पुस्तकांच्या सजावटीही केलेल्या आहेत. या पुस्तकाचं मुखपृष्ठ मात्र त्यांनी केलेलं नाही. स्वतः राजू बाविस्कर ट्रंपेट हे बँडमधलं वाद्य वाजवताना काढलेला फोटो इथं वापरण्यात आलेला आहे. हे छायाचित्र निशंक बाविस्कर यांनी काढलेलं आहे. पुस्तकाच्या शीर्षकाचं सुलेखन विजय जैन यांनी केलेलं आहे. मुखपृष्ठाची रचना विकास मलारा यांनी केलेली आहे. हे सगळंच खूप चांगलं आहे; पण तरीही वाटतं की राजू बाविस्कर यांचं एखादं पोर्ट्रेट मुखपृष्ठासाठी घेतलं असतं, तर अधिक चांगलं झालं असतं. कारण त्यांचं एखादं रंगीत चित्र या पुस्तकासोबत लोकांच्या पाहण्यात आलं असतं. लोकांना त्यांच्या चित्रकारितेतल्या कामाचा अंदाज आला असता; पण प्रकाशकांनी कदाचित व्यावसायिक बाजू पाहिली असावी.

सुदैवानं आतली सगळी रेखाटनं मात्र बाविस्कर यांनीच काढलेली आहेत. प्रत्येक प्रकरणाला एक पानभर रेखाटन वापरलेलं आहे. प्रकाशकांनी त्यात मात्र कंजुषी केलेली नाही. प्रत्येक रेखाटनाला स्वतंत्र पान दिलेलं आहे. रिकाम्या जागेत रेखाटनांची बोळवण केलेली नाही. नेहमी मजकूर लिहिणारा एक आणि चित्र काढणारा दुसरा असतो. इथं मात्र दोन्ही एकच असल्यामुळं रेखाटनं नेमकी उतरलीत. चित्रकार दुसरा असता तर त्याला मजकूर वाचून, कल्पना करून चित्रं काढावी लागली असती. इथं मात्र चित्र काढणाऱ्याच्याच डोक्यातल्या आठवणी असल्यामुळं त्यानं अचूक रेखाटनं काढलेली आहेत. शिवाय त्या निमित्तानं लेखकाच्या चित्रकारितेचाही अंदाज येतो.

या आत्मकथनाचं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे मराठी साहित्यात अनोखं असलेलं बँड वाजवणाऱ्यांचं भावविश्व इथं प्रथमच येत आहे आणि ते इतक्या चौफेर आलंय की त्यात सगळे जीवनकंगोरे येतात. त्यांच्या रिहर्सल, रियाज, वाद्य, त्या वाद्यांची वैशिष्ट्ये, वाजवणाऱ्यांचे स्वभाव, त्यांच्यातली स्पर्धा, असूया ही सगळी मानवी अंगं लेखकानं इथं रेखाटलेली आहेत. बँडमध्ये काम करणाऱ्यांचं कुणी असं आतलं भावविश्व मराठीत तरी रेखाटलेलं नव्हतं.

या आत्मकथनातलं शेवटचं, शिक्षण नावाचं प्रकरण म्हणजे लेखकाच्या आयुष्याची रूपरेषाच आहे. या २३ पानांच्या प्रकरणात लेखकाचं, त्याच्या कुटुंबाचं संपूर्ण चरित्र आलेलं आहे. खरं तर हे प्रकरण कचरू नावाच्या मोठ्या भावाचं व्यक्तिचित्र आहे. त्याच्या रूपानं मांग समाजात तालुक्यात पहिला पदवीधर नोकर झाला. त्याची प्रेरणा घेऊन लेखकही तोच मार्ग निवडतो आणि आयुष्याचं सोनं करून घेतो. ●●●


**(लेखक हे सुप्रसिद्ध साहित्यिक आहेत.)**

**पुस्तक .......... काळ्यानिळ्या रेषा**
**लेखक .......... राजू बाविस्कर**
**प्रकाशक ........ राजहंस प्रकाशन**
**मुल्य ............ ५५०रू.**




# आप नावाच्या टोळीचा हिंदुत्ववादी चेहरा

हिंदुत्ववाद्यांनी जवळपास शंभर वर्षं विणकाम करून एक मायावी जाळं निर्माण केलं आहे. ते वापरत वापरत ते संसदेत दोन वरून दोनशेवर गेलं आहे. या जाळ्यातून बाहेर बघितलं, की मतांच्या पेट्या दिसतात. देवादिकांच्या सावल्या दिसतात. झालंच तर हिंदुराष्ट्रही दिसायला लागतं. या गोष्टी खऱ्या की खोट्या यावर चर्चा होऊ शकते. हिंदुत्ववाद्यांना खरंच हिंदुराष्ट्र हवं आहे, की तोही एक चकवा आहे, असा प्रश्नही काही शहाणी माणसं उपस्थित करू शकतील. मुद्दा हा आहे, की ज्यांच्याकडं जाळे आहे, त्यांच्याकडं आकर्षण सुरू आहे. राजकीय उद्धारापोटी अनेक पाखरं जाळ्याकडं सरकली किंवा ओढली गेली. काहींनी स्वतःच असं जाळं तयार करण्याचा प्रयत्न चालवला. भारतीय राजकारणात काही मिळवायचं असेल किंवा तग धरून राहायचं असेल, तर धर्मस्थळांच्या चौकटीवर जाऊन देवासाठी कॉल बेल दाबावीच लागते, असा काहींचा भ्रम किंवा समज झालाय. काही हुशार पाखरं अशी आहेत, की ज्यांच्याकडं पूर्वीपासून जाळं होतंच; पण त्यांनी ते शुभ्र टोपीखाली लपवलं होतं. संतासारखा किंवा संत बनायच्या प्रयत्नात अयशस्वी ठरलेल्या एकाचा या पाखरानं पद्धतशीर वापर केला. दिल्लीत आणि बाहेर त्यांना घेऊन इव्हेन्ट घेतले. स्वच्छतेची भाषा वापरली आणि जाळ्याशिवाय हे पाखरू काही ठिकाणी सत्तेत पोहोचलं. नंतर त्याच्या लक्षात आलं, की संतसदृश माणसामुळं आपली अडचण होतेय. शिवाय सत्ताही मिळालीय. नवस पूर्ण झाला होता म्हणून त्यांची गरजही कमी झाली होती. हे सर्व घडत असतानाच 'जे रामजादे नाहीत, ते हरामजादे' आहेत, अशी घोषणाही राजकारणात हिट ठरली. धर्मस्थळे हिट ठरली आणि देशभराच्या मतपेट्या हिंदुत्ववाद्यांकडं आकर्षित झाल्या. पांढऱ्या टोपीच्या पाखरानं पंजाबात डॉ. आंबेडकरांचं कार्ड बेमालूमपणे वापरलं. अतिशय साधं; पण श्रद्धांवर स्वार होणारं ते कार्ड होतं. सर्व शासकीय कार्यालयांत बाबासाहेब आणि भगतसिंग यांचे फोटो वापरण्याचं ते कार्ड होतं. कार्डानं मतपेट्या जिंकून दाखवल्या. पंजाबनंही 'जय भीम' आणि 'सत श्री अकाल' म्हणत या पाखराला सत्तास्थानापर्यंत नेलं. हिंदुत्ववाद्यांना खूप बरं वाटलं. ते स्वतः पराभूत झाले होते; पण त्यांचा शत्रू असणारी काँग्रेसही पराभूत झाली होती. भारतीय क्रिकेटसारखं झालं. पाक क्रिकेटला कुणीही हरवलं, तरी आपण फटाके फोडतो. जिथं आपण काँग्रेसला हरवू शकत नाही तेथे तिला

हरवणाऱ्या कुणाशीही गुफ्तगू करण्यास हिंदुत्ववादी म्हणजे भाजप तयार झाला. तिथं त्याच्या सावलीत राहून देशात अनेक ठिकाणी बी टीम तयार करण्यात आल्या. भाजप म्हणजे ए टीम आणि तिचा शत्रू पराभूत करणाऱ्या किंवा त्यासाठी भाजपला मदत करणाऱ्यांची तयार झाली बी टीम. या टीमनं भाजपविरुद्ध रात्रंदिवस टीका करायची आणि त्याला आतून सशक्त करायचं. प्रसंगी काँग्रेसला नामोहरण करून स्वतः सशक्त व्हायचं, असा हा मामला. आपण जिंकलो काय किंवा बी टीम जिंकली काय, परिणाम एकच होता आणि तो म्हणजे भाजपचा शत्रू क्षीण किंवा पराभूत होणार होता. बी टीमला ए टीम सर्व प्रकारची रसद पुरवते आणि 'लगे रहो मुन्नाभाई' असं प्रोत्साहन देते. अशा अनेक बी टीम आहेत. काहींनी ट्वेन्टी-ट्वेन्टीचा गेम खेळला, तर काहींनी टेस्ट मॅचचा. उत्तर प्रदेश असो, आंध्र असो, तामिळनाडू असो किंवा महाराष्ट्र असो, अनेक ठिकाणी भाजपचे छुपे क्लोन आपल्याला दिसतात. म्हणजे वरून कीर्तन आणि आतून तमाशा... काहींना तमाशाचा फड दिसतोही. पांढऱ्या बगळ्याची नजर आणि चोच कुठं स्थिर झालीय, हेही कळतं. थोडा उशीर लागतो, हे खरं आहे; पण जेव्हा बी टीम ए टीमचा अजेंडा वापरायला लागते तेव्हा तर कळूनच चुकतं.

बरेच दिवस धर्मनिरपेक्षतेची टोपी वापरणाऱ्या आम आदमी पार्टीनं शेवटी आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर टोपी हलवली आणि आश्चर्य टोपीखाली वेगवेगळ्या श्रद्धांची गर्दी दिसायला लागली. श्रद्धा व्यक्त करताना 'आप'नं म्हणजे बी टीमनं टीम एचीच भाषा वापरली. 'इस देश में रहना होगा तो 'जय श्रीराम' कहना होगा', अशी ती भाषा होती आणि आहे. म्हणजे या देशात राहण्यासाठी पूर्वअट आहे आणि ती म्हणजे 'जय श्रीराम' म्हणण्याची. तीच अट 'आप'नं उचलत आणि आपण मुळात हिंदुत्ववादी आणि त्यातही सर्व हिंदुत्ववादी संघटनांपेक्षा कडवे हिंदुत्ववादी आहेत, हे स्पष्टपणे सांगितलं. भाजपनं राम घेतला 'आप'नं अरविंद केजरीवाल यांनी पहिला बार उडवला आणि नोटंवर गणपती आणि लक्ष्मीचा फोटो छापलाच पाहिजे, अशी मागणी केली. थेट ती देशाच्या मोठ्या कारभाऱ्यापर्यंत पोहोचवली. आता धर्माचं कार्ड भाजपच्या हातात असताना हे नवं कार्ड का काढलं जात आहे. रामाऐवजी गणपती आणि लक्ष्मीची भाषा का बोलली जातेय, असा प्रश्न सामान्य माणसाला पडला. 'आप'चे लोक कधी-कधी गांधीवादी असतात म्हणून त्यांनी गांधींना हात घातला नाही. गणपती आणि लक्ष्मीचं नाव घेऊन भाजपसमोर पेच तयार केला जातोय, असं सामान्य माणसाला वाटत होतं; पण प्रत्यक्षात भाजपला, अन्य हिंदुत्ववाद्यांना जे वाटतं होतं तेच 'आप'नं बोलायला सुरुवात केली. 'आप'चे काही नेते इतके आक्रमक झाले, की जर हा प्रस्ताव मान्य नसेल, काही अडचण असेल, तर त्यांनी खुशाल पाकिस्तानात जावं, असं खडसावून सांगितलं. बरं आहे, की आपला शेजारी पाकिस्तान आहे. कुणालाही तिथं जा असं सांगता येतं; अन्यथा पंचाईत झाली असती. 'आप' गणेश-लक्ष्मीबाबत खूपच आक्रमक झालाय आणि हा मुद्दा निवडणुकीत मांडण्याच्या प्रयत्नात आहे. गंमत ही आहे, की 'आप'च्या दिल्लीतील एका मंत्र्यानं डॉ. बाबासाहेबांनी बौद्ध धम्म स्वीकारताना म्हणावयाच्या बावीस प्रतिज्ञांचं वाचन केलं म्हणून त्यांना मंत्रिपद गमवावं लागलं, तर पंजाबात बाबासाहेबांचा फोटो वापरून मतं गोळा करण्यात आली. दिल्लीत बावीस प्रतिज्ञा वाचणं, हा पक्षीय गुन्हा ठरवण्यात आला.

'आप'नं गणेश आणि लक्ष्मी या देवतांना निवडणुकीत वापरावयाच्या अस्त्राप्रमाणं बाहेर काढलं. बाकीचे पक्षही अशाच अस्त्रांचा विचार करत असल्यास नवल वाटायचं काही कारण नाही. भारत भुकेच्या निर्देशांकात पाक-बंगालपेक्षा वर का गेला, बेकारांची संख्या कोट्यवधी उड्डाणे का घेत आहे, शिक्षण आणि जगणंही महाग का होत आहे, घटनात्मक संस्थांची विश्वासार्हता कमी का होत आहे, औषधाविना कोरोनात मरण पावलेल्या लोकांबद्दल जबाबदार कोण, असे अनेक प्रश्न आहेत. देवांच्या संख्येपेक्षा त्यांची संख्या कमी असेल कदाचित म्हणून काय तिकडं बघायचं नाही. 'आप'नं दिल्लीत शाळा आणि दवाखान्याचं एक अल्पकालीन मॉडेल तयार केलं हे खरं; पण त्याला चोहोबाजुंनी गंज चढतो आहे, हे कोणी पाहत नाही. काहीही असो, आपण देवाधर्माच्या नावानं कुठं तरी वेगळ्या ठिकाणी नेलं जात आहोत का, असा प्रश्न तयार होतो आहे. त्याचं उत्तर शोधायला हवं. ते न शोधल्यास राजकारण मोकाट सुटेल आणि दुर्बलांचा आक्रोश ऐकण्याऐवजी घंटा ऐका, असं सांगितलं जाईल.

# तासाला तीन बलात्कार, किती ऐकायचे चीत्कार...

भारत आणि बलात्कार यात आता काहींना नवे वाटत नसणार म्हणून काही हा विषय दुर्लक्षित करता येत नाही. महिलांची प्रतिष्ठा, आत्मसन्मान, बंधुता, स्वातंत्र्य, कायदा आणि सुव्यवस्था, असे अनेक घटक बलात्कारामुळं दुर्बल झाल्यासारखे वाटतात. राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण विभागानं (एनसीआरबी) दिलेल्या माहितीनुसार राजधानी दिल्लीत जे आपल्या लोकशाहीचं माहेरघर मानलं जातं, तिथं दिवसाला पाच बलात्कार होतात. देशभराच्या आकडेवारीचा एकत्रित विचार केल्यास हा आकडा दर दिवसाला सत्याऐंशी इतका मोठा म्हणजे तासाला तीनहून अधिक घटना घडतात. विशेष म्हणजे, बलात्काराचा आलेख दरवर्षी, दरतासाला वाढत जाताना दिसतोय. अतिशय काळजी वाटावी अशी ही गोष्ट आहे. महिलांच्या सुरक्षिततेविषयी जसा प्रश्न निर्माण होतो, तसाच तो वाढत चाललेल्या विकृतीकडेही लक्ष वेधायला लागतो. गेल्या अनेक वर्षांपासून बलात्कार रोखण्यासाठी कायदे, प्रबोधन, शिक्षण याद्वारे प्रयत्न झाले नाहीत असं नाही; पण ही वाढती विकृती या सर्व प्रयत्नांना मागं टाकत पुढं निघाल्याची दिसते. बलात्कार

करणाऱ्याला होणारी शिक्षा सातवरून दहा वर्षांपर्यंत वाढवण्यात आली. बलात्कारात महिलेचा मृत्यू झाल्यास वीस वर्षे शिक्षा किंवा फाशीही होऊ शकते. तशी कायद्यात तरतूद आहे. महिलांचा कोणत्याही कारणानं लैंगिक छळाची व्याख्या वाढवत नेण्यात आली आहे. घरात होणाऱ्या हिंसाचाराविरोधातील कायदे कडक करण्यात आले. बालिका रक्षणाचे कायदे कडक करण्यात आले; पण तरीही बलात्कार नावाची अमानवी, निर्दयी, घृणास्पद विकृती कमी का होत नाही, हा प्रश्न उरतो.



बलात्काराच्या घटनांमध्ये महाराष्ट्र मागं नाही; पण राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, दिल्ली ही काही राज्यं खूपच आघाडीवर आहेत. जवळपास उत्तर भारत बलात्काराच्या घटनांनी ढवळून निघतो. गेल्या वर्षी राजस्थानात ६,३४२ म्हणजे रोज १७, मध्य प्रदेशात २,९४७ म्हणजे रोज आठ, उत्तर प्रदेशात गेल्या वर्षी २,८४५ आणि दिल्लीत १,२५२ घटना घडल्या आहेत. विशेष म्हणजे, यातील काही काळ कोरोनाचा होता. घराबाहेर पडणं अवघड होतं. याचा परिणाम घराबाहेर होणाऱ्या लैंगिक छळाच्या घटना घडल्या; पण घरातील छळाच्या घटना वाढल्या. याचा अर्थ असाही होतो, की महिला कोठंही असली तरी तिच्या वाट्याला छळ येतोच आणि ही गोष्ट पुरुषी वर्चस्वाशी, त्यातून येणाऱ्या विकृतीशी जोडली गेलेली आहे. महिला म्हणजे वर्चस्व गाजवण्याची आणि भोगाचीच गोष्ट आहे. या मानसिकतेतून बाहेर पडायला पुरुषप्रधान व्यवस्था तयार नाही. उत्तरेकडील महिला अजूनही वेगवेगळ्या जाळ्यांत अडकवून ठेवली जात आहे. पुरुष तिचा मालक आहे. पुरुषाची ती संपत्ती आहे आणि पुरुषासाठी ती केवळ भोगावयाचं साधन आहे. या मानसिकतेमध्ये अजून अनेक पुरुष अडकले आहेत, हेही या गोष्टींवरून दिसते. ज्यांना आपण गुन्हेगार जाती मानतो, आदिवासी मानतो त्याठिकाणी महिलांवर बलात्कार होण्याच्या घटना तुलनेनं कमी होतात. होतच नाहीत असं म्हणता येणार नाही. समृद्ध आणि प्रगत मानल्या जाणाऱ्या घटकांमध्ये मात्र अशा घटना उफाळून येतात, हेही आकड्यांवरून दिसतं. ज्या घटकांमध्ये महिलांना थोडीफार प्रतिष्ठा आहे, मूल्य आहे, मातृप्रधान व्यवस्थेचा आदर आहे, तिथंही अशा घटना कमी आढळतात. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या महानगरी मुंबईत बलात्काराच्या घटनांत जवळपास दोनशे, तर विनयभंगाच्या घटनांमध्ये दीडशे टक्क्यांनी वाढ झाली आहे. हे खरं असलं, तरी नागपूरनं अशा घटनांत मुंबईला मागं टाकलं आहे. अन्य गुन्ह्यांच्या बाबतीतही नागपूर आघाडीवर आहे. गेल्या वर्षी एका नागपूरमध्ये चोवीस हजार दखलपात्र गुन्ह्यांची नोंद आहे.

बलात्कार एका मोठ्या विकृतीचं रूप घेऊन सर्वत्रच पसरतो आहे. त्यातून मग महिलांसाठी सुरक्षित ठिकाणं कोणती यावर चर्चा सुरू झाली. ती अयोग्य आहे, असं नाही; पण मूळ प्रश्न उरतोच आणि तो म्हणजे वाढत्या विकृतीचं काय करायचं, ती संपवायची कशी, यावर खूप मोठ्या गांभीर्यानं आपण विचार करत नाही. कायदे बदलून, शिक्षा वाढवून, भरपाईची रक्कम वाढवूनही बलात्काराचा आलेख कमी होत नाही. याचा अर्थ कायदा कितीही कडक केला, तरी तो एकटा काही करू शकत नाही. तो भीती किंवा दहशत निर्माण करू शकतो; पण मूळ रोग संपवण्यासाठी कायद्याबरोबरच अन्य काही गोष्टींचा, मार्गांचा विचार करावा लागेल. महिलांना हक्क दिले; पण त्याची अंमलबजावणी कशी होतेय, तिच्यासाठी कायद्यात बदल केले; पण त्याच्या अंमलबजावणीचं काय, विकृत बनलेल्या लोकांचं प्रबोधन कसं आणि किती चालू आहे, स्त्रीमध्ये केवळ मादीच नसते, तर आई, बहीण आदी सुंदर नातीही असतात, हे कसं सांगत असतो आपण, संस्काराच्या पातळीवर काय होतं, मुक्त जीवनाचा अर्थ आपण नेमका कसा घेतो, बंधुभाव आणि भगिनीभाव याचा जागर आपण किती करतो, अशा अनेक गोष्टी आहेत. कायदा आणि या गोष्टी हातात हात घालून चालल्या, की प्रश्न हलके, सैल व्हायला लागतात. आपण प्रबोधन पर्व संपवून बसलोय आणि थेट कृतीपर्वाला हात घालतोय. अनेक ठिकाणी गफलती होतात. बलात्कारात आघाडीवर असलेली दिल्ली नोटावरील चित्रांचा विचार करते; पण महिलांत वास करणाऱ्या विविध नात्यांचा विचार करत नाही. फोफावणारा बलात्कार रोखण्याचा अधिक प्रयत्न केला नाही, तर जगात भारताची ओळख अन्य कारणानं पण होऊ शकते, हे ध्यानात ठेवायला हवं.

●●●

**– पंक्चरवाला**

# कोण वाघ, कोण शेळी

खूप भांडलो
आता म्हणाले समजून घेऊ
त्यांचे कुळाचार आपले म्हणून
आता पुनः घरी नेऊ

समजले आहे म्हणाले
वाघही गवत का खातो ते
वाघाकडे राहूनच त्या
शिकलो आहे म्हणाले ते

ज्या जंगलात आहे
राहायचे त्याला
ते वाघभक्षक
झाले आहे

आधी ते
वाघांचे होते
आता अशा माणसांचे
झाले आहे

वाघांनी सोडून दिले आहे
डरकाळणे
ते काम अशा
माणसांकडे आले आहे

नरभक्षक तेच
झाले आहेत
वाघ झाले
शाकाहारी

जुळवून घेऊ
म्हणतात
आणू सन्मान
आपल्या दारी

हयातीत तरी आपल्या
म्हणाले
स्थिती बहुधा
अशीच राहणार

आपण गेल्यावर
कोण वाघ, कोण शेळी
कोण विचारणार,
कोण पाहणार ?

**– श्रीपाद भालचंद्र जोशी**

# मास्तर !


**मास्तर...**
शाळेत शिकवलेले ते धडे
आज समाजात आंधळे झालेत
तो मानवतावादी सिद्धांत आजही
चौकाचौकांत ठोकरा खातोय

**मास्तर...**
तुमच्या हातातील छडीने घडवलेले संस्कार
आम्ही विकलेत मतदानाच्या पेटीत,
दारूच्या दुकानांत, रांडांच्या बाजारात
तरीही अभिमान आहे माणूस असल्याचा

**मास्तर...**
तुमच्या नजरेतून हा समाज
आम्ही कधी बघितलाच नाही
तो तुमचा चष्मा आम्ही फोडलाय केव्हाचाच
त्याच्या काचा विखुरल्या नोटांच्या पानापानात

तुम्ही लढलात आमच्या पिढीसाठी
उद्याच्या भविष्यासाठी
आजही लढताय
गरिबाच्या स्वातंत्र्यासाठी
ज्योतिबाच्या सावित्रीसाठी
घटकाभर पाण्यासाठी
भाकरीच्या गाण्यासाठी
एकतेच्या हाकेसाठी
समतेच्या मानासाठी...

आणखी किती सांगू, कशासाठी लढताय तुम्ही
जर थकला असाल तर हार मानू नका
तुमची शिकवण घेऊन मी
पुन्हा नव्याने लढेन!



**हेमंत दिनकर सावळे**
**जि. वाशिम**
**मो. ७८७५१७३८२८**

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2020-22
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

With Best Compliments





Sos. Agrotech Pvt.Ltd

